# महाभारत

## खंड २२ : अज्ञातवासपर्व ५

मराठी अनुवाद :

श्री. अशोक कोठारे



# महाभारत

## महाभारत खंड बाविसावा

## अज्ञातवास पर्व भाग पांचवा

## उद्योग पर्व (पुढे चालू)

अशोक कोठारे

**ई साहित्य प्रतिष्ठान**

विशेष सुचना - महाभारताचे सर्व खंड वाचण्यासाठी कृपया खालील लिंक वर जा.

http://www.esahity.com/23092343238123512366234023812350.html

# महाभारत

## मराठी अनुवादक : श्री. अशोक कोठारे

ashokkothare@gmail.com

या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क अनुवादकाकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण वा नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी अनुवादकाची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई होऊ शकते.

**ई साहित्य प्रतिष्ठान**

G1102, Eternity, Eleventh floor

Eastern Express Highway. Thane, 400604

**www.esahity.com**

**esahity@gmail.com**

©esahity Pratishthan®2018

• विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध.

• आपले वाचून झाल्यावर आपण हे फॉरवर्ड करू शकता.

• हे पुस्तक वेबसायटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापूर्वी साहित्य प्रतिष्ठानची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे.

**प्रकाशन : १० नोव्हेंबर २०१९**

## - अनुवादकाचे दोन शब्द -

हिंदू मान्यतेत ज्या कांहीं रचना सर्वमान्य आहेत त्यातील एक महाभारत आहे. हिंदूंच्या सगळया परंपरा, चालीरिती, संस्कार ह्यांची मुळं महाभारतात आहेत. चौकस हिंदू व्यक्तिला बऱ्याच वेळा अमुक प्रथा कां प्रचारात आली असा प्रश्न पडतो परंतु, त्याचे समाधानकारक उत्तर मात्र त्याला मिळत नाही. चार जण चार कल्पना सांगतात व त्याचा गोंधळ उडतो. ते होऊ नये व त्या वहिवाटी, प्रथा ह्यांचे मूळ कोठे आहे ते लक्षात यावे ह्यासाठी हा प्रयत्न आहे, हा अनुवाद वाचला कीं, त्या प्रश्नांची समाधानकारक उत्तरं मिळतील अशी माझी अपेक्षा आहे. म्हणून, मी महाभारत ह्या महाकाव्याचा मराठीत अनुवाद करण्याचे ठरवले. आता पर्यंत महाभारतावर बरेच लिहीले गेले आहे व ह्यापुढेसुद्धा पुष्कळ लिहीले जाईल पण महाभारत, जसें आहे तसें, एक शैक्षणिक माध्यम म्हणून वाचकांना मिळणे आवश्यक आहे व ते ह्या भाषांतराने मी वाचकांना देत आहे.

महाभारत हे एक महाकाव्य आहे. असें म्हणतात, हा सर्वात मोठा ग्रंथ आहे. मी मात्र अनुवाद करतांना तो गद्यात केला आहे कारण, मला कवितेचे अंग नाही. महाभारताच्या उपलब्ध प्रतिंत कांहीं भेद आढळतात. त्यासाठी सगळे भेद भाषांतरात घेतले आहेत म्हणजे, कांहीं राहून जावू नये. त्या शिवाय, सामान्य वाचकांना कथाभाग अधिक चांगल्या प्रकारे समजावा म्हणून कांहीं टीपा दिल्या आहेत.

माझे वाचक साधे मराठी आहेत ज्यांचे ज्ञान मोजके आहे असें गृहीत धरून मी अनुवादाची भाषा बाळबोध मराठी ठेवली आहे, त्यामुळें कोणालाही ते सहजपणे वाचता येईल व समजेल. कांहीं लेखक अशा ग्रंथाचे अनुवाद करतांना प्राचीनतेचा अनुभव यावा म्हणून मुद्दाम प्राचीन (Archaic) शब्दप्रयोग वापरतात परंतु, माझा असा अनुभव आहे किं, बहुतेक वाचकांना ते वाचण्यास त्रास होतो. म्हणून भाषा आपली नेहमीचीच ओघवती ठेवली आहे.

महाभारताचे अठरा पर्व आहेत व त्या आधीचा असा आदिपर्व म्हणून एक जोडला आहे. आदिपर्वामुळे महाभारतातील मुख्य कथाभागाचा पूर्वेतिहास वाचकांना समजेल. आदिपर्वात हिंदूंच्या अनेक पुराणांच्या मुळसुत्राची कल्पना येते. म्हणून तो माझ्यामते फार महत्वाचा आहे.

मी मात्र अनुवाद करण्याच्या सोयीसाठी संपूर्ण महाभारत चाळीसांपेक्षां जास्त खंडांत विभागून दिले आहे. त्यामुळें इंटरनेटवर चढवतांना व उतरवतांना सोपे जाईल अशी अपेक्षा आहे. त्यातील हा बाविसावा खंड आपण आता वाचणार अहात, त्यात कर्ण विवाद पर्व, सैन्य निरयन पर्व, उलूक दुताभिगमन पर्व, रथ तीर्थ संख्यान पर्व, अम्बोपाख्यान पर्व आपण पहाणार आहोत.

महाभारत कधी लिहीले गेले असा प्रश्न नेहमी ते वाचणाऱ्याच्या मनात डोकावतो म्हणून त्याबद्दल थोडे लिहीत आहे. महावीर व गौतम बुद्ध आपल्याला माहीत आहेत, साधारणपणे इसवीसन पूर्व ५५० वर्षे ते दोघे महानुभाव होऊन गेले. जर महाभारताची रचना त्या आधीची असती तर त्याचा उल्लेख त्या काळातील जैन व बुद्ध साहित्यात निश्चितच आला असता. बुद्धाला सांख्यमुनी असें संबोधतात. कारण, त्याचे तत्त्वज्ञान सांख्य विचारावर आधारीत आहे. व्यासांची भगवत गीता वेदांताचे तत्त्वज्ञान मांडते जे तुलनेने अर्वाचीन आहे व सांख्य विचार हा हिंदू तत्त्वज्ञानातील पहिला म्हणजे, सर्वात जास्त जुना समजला जातो. जर ते बुद्धाच्या आधीचे असते तर निश्चितच त्याचा प्रभाव बुद्धाच्या विचारांवर झालेला दिसला असता. विशेष करून हे दोघे राजघराण्याचे होते म्हणजे त्यांचे शिक्षण त्या काळातील सर्वोत्तम असणारच मग त्याच्या अभ्यासात गीता, कृष्ण हे आले असते. विशेषकरून जर ते दोघे धर्मावर काम करत होते तर हे अपेक्षित आहे. परंतु, प्रत्यक्ष असें दिसते किं, त्या दोघाच्याही तत्कालिन साहित्यात तो उल्लेख आढळत नाही. ह्याचा अर्थ महाभारत त्या नंतरच्या काळात रचले गेले असावे. दुसरा अंदाज असा कीं, वेदांत तत्त्वज्ञान लिहीणारे व्यास व महाभारतकार व्यास एकच व्यक्ति होती असें साधार मानले जात आहे. वेदांताचा सार महाभारतातील गीतेत आहे. वेदांत तत्त्वज्ञानाचा उगम त्याच सुमारास झाला हे सर्वमान्य आहे. महाभारत लिहीणारे व्यास सांगतात, वेदांचा विसर पडत चालला आहे तरी ते ज्ञान सोप्या भाषेत सामान्यानां समजावे म्हणून कथारुपातून ते उपलब्ध व्हावे ह्यासाठी त्यांनी महाभारत ही काल्पनिक रचना केली आहे. असें सर्व पहाता आपण अंदाज करू शकतो किं, महाभारत इसवीसन पूर्व ४००च्या सुमारास म्हणजे, सम्राट अशोकाच्या आधी लिहीले गेले असावे.

महाभारतात स्वतः व्यास एक पात्र अशी भूमिका करतांना दिसते. त्याप्रमाणे कृष्ण म्हणून जे पात्र आहे त्याचे सगळे कर्तव्य पहाता व्यास ज्यांचे खरे नांव कृष्ण द्वैपायन आहे, तेंच

करीत आहेत असे वाटते. म्हणजे महाभारतकार व्यास त्यांच्या रचनेत दोन भूमिका करतांत असें म्हणावे लागेल. त्यामुळें असे समजण्यास हरकत नसावी कीं, महाभारत त्यांच्या कल्पनांचाच एक भाग आहे. कदाचित असें म्हणता येईल कीं, महाभारत हा एक दंतकथांचा संग्रह आहे व त्याद्वारा नैतिकमुल्ये शिकवण्याचा प्रयत्न झाला आहे.

माझ्या मते, अशा चर्चेत वेळ व्यर्थ न घालवतां हिंदूंनी महाभारतातील कथांतून काय सांगावयाचे आहे ते पहावे. एक ऐतिहासिक दस्तऐवज म्हणून महाभारत उपयोगी येईल असें वाटत नाही. महाभारतातील कथा पहाता, त्यातील अतिरंजित प्रसंग हेंच सांगतात किं हे सगळे कपोलकल्पित आहे. परंतु, त्यांतून जे शिकवण्याचा प्रयत्न झाला आहे तो अप्रतिम आहे.

आपल्याकडे इंग्रजांनी सांप्रतची शिक्षण पद्धती आणली त्या आधी हिंदूंतील द्विज, पाठशाळांतून प्राथमिक शिक्षण घेत असतं. त्यात प्रथम, अक्षर ओळख नंतर गणित व महाभारत शिकवले जाई (पुरोहित ब्राह्मणांच्या पाठशाळांतून त्याशिवाय कर्मकांडाच्या पोथ्या शिकवल्या जात) हे लक्षात घेतले पाहिजे. कारण, महाभारतातून माणसाला जीवन कसे जगावे त्याबद्दलचे मार्गदर्शन मिळते. महाभारत हे एक शैक्षणिक माध्यम म्हणून वापरात होते. आपल्या शिवाजी राज्यांचे शिक्षण महाभारतातूनच झाले होते. त्यातून जे नितीशास्त्र शिकवले आहे तेंच आपले शिक्षण होते. माझ्या मते, हांच उद्देश वाचकांनी डोळ्यासमोर घेऊन महाभारत वाचावे, धार्मिक ग्रंथ समजून भाबडेपणे वाचू नये कारण तो धार्मिक ग्रंथ नाही असे माझे मत आहे. महाभारतात अनेक बौद्धीकं आहेत जसें भगवत गीता, विदूर गीता, कणिक गीता, व्याध गीता वगैरे. ते सगळे जीवनाचे ज्ञान आहे म्हणून प्रत्येक शहाणा हिंदू, महाभारत वाचण्यात ठेवेल तर त्याचे भले होईल. त्यांना ते सहजपणे मिळावे म्हणून हा प्रपंच आरंभला आहे. ई-साहित्य त्याचे विनामुल्य वितरण करणार आहेत म्हणून त्यांना शतशः धन्यवाद.



अशोक कोठारे

माझा ई-मेल –

ashokkothare@gmail.com

ashokkothare@yahoo.co.in

ह्या वरून आपण माझ्याशी संपर्क करू शकता.

ह्या पुस्तकाचे मुद्रण करण्यासाठी अनुवादकाची आधी परवानगी घेणे आवश्यक आहे. न घेतल्यास तो गुन्हा ठरेल व त्यावर योग्य कारवाई होईल.

ह्या ई-पुस्तकाचे विनामुल्य वितरण ई-साहित्य करणार आहेत परंतु, हे ई-पुस्तक कोणीही कोणालाही विनामुल्य भेट देऊ शकतो.

**माझे ब्लॉग –**

Ashok Kothare, http://ashokkotharesblog.blogspot.com/ for stories

I reckon, http://kotharesviews.blogspot.com/ for philosophy

Ideas and tips on any subject, http://kotharay.blogspot.in/ for intelligent discussions.

Freedom of Expression, http://kothare-thinks.blogspot.in/

My Marathi Blog, http://kothare-marathi.blogspot.in/ मला असे वाटते

# कर्ण विवाद पर्व (सुरू)

## भाग एकशे चाळीसावा

धृतराष्ट्र विचारतात, "अरे संजया, भर सभेतून कृष्ण कर्णाला घेऊन कोठे शहराबाहेर गेला ते सांग. गोविंद त्या राधासुताला समजावणीचे काय बोलला ते मला सांग. कृष्ण कर्णाशी कसा बोलत होता ते सांग. तो त्याला रागात बोलत होता कीं, समजावणीच्या शांत आवाजात बोलत होता, कसे बोलत होता ते मला सांग.

संजय सांगतो, एका राजन्, मी सगळे नीटपणे सांगतो आपल्याला, मी कृष्णाचे दम देण्यासाठीचे व समजावण्यासाठीचे असें जे उद्गार जे राधासुताशी बोलतांना होते ते त्या क्रमाने आपल्याला सांगणार आहे. वासुदेव राधासुताला बोलले, "तू अनेक ब्राह्मणांची पुजा केली आहेस जे वेदशास्त्र जाणत आहेत. त्यांच्याकडून तू सत्य समजून घेण्याचा प्रयत्न केला आहेस त्यामुळें वेदात जे अंतिम सत्य आहे त्याची माहीती दिली आहे ती तू समजला आहेस. तुला सुक्ष्म सुचना ज्या वेदात दिल्या आहेत त्यासुद्धा जाणत आहेस. त्याप्रमाणे कुमारीमातेला दोन प्रकारचे पुत्र होऊ शकतात. कनीन आणि सहोद असें त्यांना बोलतात. त्या बालकांसाठी पुढे त्या कुमारीकेचा नवरा त्यांचा पिता समजला जातो. अरे कर्णा, तू अशाप्रकारे जन्मला आहेस. त्यामुळें नैतिकदृष्ट्या पंडु तुझा बाप ठरतो. त्याप्रमाणे तू राजपुत्र ठरत होतास पहिल्यापासूनच. त्याप्रमाणें तुझ्या पित्याला कुंतीपासून म्हणजे तुझ्या मातेपासून आणखीन मुलं झाली आहेत. म्हणून ती तुझी भावंड ठरतात. तुझी आई वृश्नी घरातील म्हणून तूसुद्धा एक वृश्नीच आहेस. म्हणजे आपण फार जवळचे आप्त आहोत हे प्रथम लक्षात घे. आता पांडवांना समजू दे कीं, तू त्यांचा भाऊ आहेस जो तिला युधिष्ठीराच्या आधी झाला आहे. तू सर्वात मोठा पुत्र आहेस पंडुचा म्हणून ते सगळे पांडव, त्यांची मुलं आणि सुभद्राची मुलं तुझे पाय धरण्यास योग्य ठरतात. पांडवांच्या मदतीसाठी जमलेले सगळे राजे, त्याप्रमाणे अंधक आणि भोज, वृश्नी तुझ्या पायाशी येतील. ते सगळे राजे, त्यांच्या राण्या चांदीच्या कलशातून सुगंधी पाण्याने त्याशिवाय रत्न, वनस्पती, असें सगळे तुझ्या राज्याभिषेकासाठी तयार असतील. त्याच वेळी द्रौपदीसुद्धा तुझी पत्नी म्हणून तुला मिळेल. ब्राह्मण धौम्य तुझ्यासाठी अर्घ्य देतील. सगळे पांडवांचे पुरोहित तुझ्या राज्याभिषेकाचा विधी संपन्न करतील. आम्ही सगळे तुला पृथ्वीच्या राज्याचा अधिपती म्हणून घोषित करू त्यात मीसुद्धा असेन. युधिष्ठीर तुझ्या शिरावर छत्री धरील. तुझ्या मागून तो त्याच्या रथाने येईल. तुझा अभिषेक झाल्यावर कुंतीचा मुलगा महारथी भिम तुझ्या शिरावर शुभ्र छत्री धरेल. अर्जुन तुझ्या रथाचे

सारथ्य करील. त्यानंतर नकूल आणि सहदेव द्रौपदीचे पांच पुत्र, पांचाल परिवार, शिखंडी, अंधक, वृश्नी तुझ्या रथाच्या मिरवणूकीत त्या मागून चालत असतील. तू तुझ्या सत्तेचा आनंद भोगत रहा. तुझे बंधू तुझ्या आज्ञेचे पालन करतील. तुझ्या सन्मानार्थ पांडव विविध पुजा, जप, यज्ञ करतील. सगळे दशर्ह आणि दशर्ना तुझे नातेवाईक म्हणून तुला मदत करतील. ते द्रविड, कुंतल, आंध्र, तलाचर, शुचुप आणि वेणूप सगळे प्रजाजन तुझ्या मागून जातील. पांडव वसुसेनाच्या विजयाच्या घोषणा करतील. त्यामुळें तुझी जन्मदात्री संतुष्ट होईल. तुझ्या मित्रांना आनंद होऊ दे व तुझे शत्रू तडफडत राहू देत. आजच्या दिवशी तुम्हा भावंडांच्या मिलनाचा दिवस म्हणून साजरा होऊ दे.

कर्ण विवाद पर्व भाग एकशे चाळीसावा संपला.

# कर्ण विवाद पर्व

## भाग एकशे एकेचाळीसावा

कर्ण ते ऐकून बोलतो, "निःसंशय अरे केशवा, तू तुझ्या प्रेमापोटी हे मला सांगत आहेस. माझे भले व्हावे अशी तुझी इच्छा आहे हेसुद्धा मला समजले. अरे वृश्नीच्या घराण्यातील कृष्णा, तू जे सांगत होतास ते सगळे मला माहीत आहे. नैतिक दृष्ट्या मी पंडुचा मुलगा आहे आणि वेदातील आदेशानुसार मी कुमारीकेचा मुलगा आहे. मी सूर्यापासून तिच्यात जन्म घेतला आहे हे मला माहीत आहे. सूर्याच्या परवानगीने ती मला नदीत सोडते हेसुद्धा मला समजले आहे. मी अशाप्रकारे ह्या जगात आलो आहे. परंतु, कुंतीमातेने माझ्या भवितव्याचा विचार केला नव्हता जेव्हां ती मला त्या नदीत सोडत होती. ती फक्त तिच्या इभ्रतीचा विचार करत होती. हेसुद्धा मी जाणतो. त्याउलट सुत अधीरथ व माझी आई राधा ह्यांनी मला पहाताच नदीच्या पात्रातून बाहेर काढले त्याचवेळी माझ्या आईच्या स्तनात दूध भरले व मी त्या दुधाचा पहिला घोट पिऊन मोठा झालो हे मी कसे विसरू, अरे कृष्णा, तिने माझे हगणे मुतणे काढले आहे, तू सांग तसे उपकार कांहीं भोगांसाठी विसरू शकतो कां? माझ्यासारख्याला ते शोभणार नाही. मी तिचे दुध पिऊन तिच्या सुत पिंडाचा झालो आहे. त्याच प्रमाणे माझे पिता अधीरथ त्यांने माझे काय लाड केले, मला वळण लावले, माझ्या शिक्षणासाठी ते कुरु राजाच्या पदरी सेवक झाले. मला द्रोणाचार्यांच्या गुरूकुलात घातले, किती किती त्यांनी माझ्यासाठी केले ते मी कसे विसरू आता. ते ज्यांने धर्मशास्त्राचा अभ्यास केला आहे त्याला तसले वागणे शोभेल कां? असेंच करून मी माझ्या पालक मातापित्यांचे ऋण फेडावे असें तुला वाटते कां? माझे सगळे लहानपणाचे विधी त्यांनी त्यांच्या सुत घराण्याच्या रिवाजानुसार केले आहेत व यथावकाश माझे लग्नसुद्धा त्यांच्या घराण्याच्या मुलीशी लावले आहे. आता मी ते संस्कार कसे सोडू? त्या लग्नापासून मला मुलं आणि नातवंडं झाली आहेत. ती नाती मी कशी विसरू? हे सगळे आता असें पक्के झाले आहे कीं, ते बदलणे शक्य नाही. मला त्या पांडवांच्या गादीचा लोभ नाही. माझे सुत नातेवाईक मला जास्त प्रिय आहेत. मी कधीही कृतघ्न होऊ शकणार नाही. कोणतेही प्रलोभन मला ते करू देणार नाही. अगदी पृथ्वीचे राज्यसुद्धा मला ते करण्यास भाग पाडू शकणार नाही. दुसरे असें कीं, गेली तेरा वर्षे मी राजसत्ता भोगत आहे दुर्योधनाच्या मुळें, त्यात मला समाधान आहे. मी त्या काळात अनेक यज्ञ केले आहेत. सुतांच्या पद्धतीचे ते यज्ञ मी करत आलो आहे. माझ्या घराचे सगळे विधी सुतांच्या रितीरीवाजानुसार होत आले आहेत, ते एकदम मी कसे बदलू? माझे सगळे आप्त सुत कुळीन आहेत ते मी कसे सोडू? माझ्या ताकदीवरच तर दुर्योधनाने पांडवांना आव्हान दिले आहे. त्याचे माझ्यावर किती उपकार आहेत ते तू जाणतोसच. मी अर्जुनाचा प्रतिस्पर्धी रहाणार आहे हे निश्चित आहे. मृत्यू येवो अगर कांहीं होवो ते युद्ध तर होणारच. आता मी दुर्योधनाला दगा देऊ शकणार नाही. तू कोणतेही प्रलोभन माझ्यापुढे ठेव त्याचा कांहींही परिणाम होणार नाही. मी

दुर्योधना बरोबरच रहाणार आहे शेवट पर्यंत. जर मी व अर्जुन द्वंद्व करू शकलो नाही तर ते आम्हा दोघांच्या नांवाला काळिमा फासण्यासारखे होईल. मला माहीत आहे तुझा उद्देश हितचिंतकाचा आहे परंतु, तूसुद्धा माझी बाजू समजून घे. पांडव तुझे सर्वस्वी ऐकतात त्यांमुळें तू जे बोललास तसे सगळे तू करून घेशिल त्यांच्या कडून ह्यात मला शंका नाही. मी तुला विनंती करतो की, हा जो संवाद आपल्यात झाला त्याची इतर कोणालाही खबर होऊ देऊ नकोस. त्यातच सर्वांचे भले आहे. जर युधिष्ठीराला समजले कीं, मी त्यांचा सर्वात मोठा बंधू आहे, तर तो सर्वात प्रथम मला येऊन माझ्या पाया पडेल, ते मला योग्य वाटत नाही. त्यामुळें माझी मोठी पंचाईत होईल. त्याच वेळी जर हे अफाट साम्राज्य माझे झाले तर ते मी दुर्योधनाला देऊन टाकीन, जेसुद्धा अयोग्य ठरेल कारण तुला माहीत आहेच. माझी इच्छा आहे कीं, ह्या युद्धानंतर युधिष्ठीरच सार्वभौम राजा म्हणून गादीवर बसला पाहिजे, तोंच खरा लायक आहे त्यासाठी कारण, तो शंतनुंच्या परंपरेचा खरा प्रतिनिधी आहे मी नाही, हे तू समजू शकतोस. माझ्या सारख्याने अशा घनघोर युद्धात विरगती मिळवणेंच श्रेयस्कर आहे. अरे कृष्णा, ही वेळ आहे मी द्रौपदीची माफी मागण्याची, मला माहीत नाही ती मला माफ करणार आहे की नाही. तिला सांग, हा राधासुत तिच्या क्षमेची भीक मांगत आहे. ज्यांना हृषिकेष मार्गदर्शक आहे तेंच जिंकले पाहिजेत. त्यासाठी युधिष्ठीरा बरोबर भिम, अर्जुन, नकूल व सहदेव त्यांची मुलं आणि द्रौपदी हेंच त्या गादीसाठी योग्य आहेत. माझ्या सारख्या अभाग्याने मरणेच योग्य कारण मला माझ्या जन्मदात्या आईने टाकले त्याला असें मरणेंच शोभते. शंतनुच्या घराण्याचे संस्कार असलेल्या पांडवांत मी जाऊन बसणे शोभणार नाही ज्याच्यावर सुतांचे संस्कार झाले आहेत. मी त्यांच्या योग्यतेचा राहिलो नाही. तुमचे सगळे साथी जे सत्चरित्र आहेत, त्यात दृष्टद्युम्न आहे, पांचाल देशाचा राजपुत्र, सत्यकी आहे, उत्तमानस आहे, युधमन्यू आहे, सोमकाचा राजपुत्र आहे, छेड्डीचा राजा, शिखंडी, केकया, कुंतीभोज, सेन्यजित, विराटाचा शंक, आपण स्वतः हे सगळे पुण्यप्रभावी अहात तेंच जिंकले पाहिजेत हे मी समजू शकतो. मला वाटते युधिष्ठीर आधीच जिंकला आहे व त्याचे राज्य आलेसुद्धा आहे फक्त कांहीं वेळाचा अवधी उरला आहे. एक महान यज्ञ होणार आहे हे मी पहात आहे. जनार्दन त्याचे उपद्राहत्री असणार, अध्यार्यू सुद्धा, त्या यज्ञात चिलखत नेसलेला कपीध्वज असलेल्या रथात होत्री असेल, त्यांचे गांडीव यज्ञाची शिडी असेल, त्यात मरणारे योद्धे त्या यज्ञात हवन असतील. युद्धातील आयुधं ऐंद्र, पशुपत, ब्रह्मा, स्थुनकर्ण, जी अर्जुन वापरणार आहे, त्यांना मंतरून घेईल ते यज्ञाचे मंत्र असतील. अर्जुन त्याच्या जन्मदात्यासारखा अथवा त्याही पेक्षा जास्त हिम्मतवान असेल. अभिमन्यू मुख्य मंत्र असेल. तो हत्तींचा चुराडा करणारा मोठ्याने ओरडणारा, भयंकर लढणारा भिम त्या यज्ञात उद्गत्री असेल आणि प्रस्तोत्री सुद्धा. सदैव जपात व ध्यानात रमणारा युधिष्ठीर स्वतः ब्रह्म असेल त्या यज्ञासाठी. रणवाद्ये ज्यांचा आवाज आकाशात जाईल ते आमंत्रण असेल यज्ञासाठी. क्षात्रतेजाने चमकणारे नकूल व सहदेव यज्ञात आहुती देणारे व्याध असतील. रंगीबेरंगी रथ अरे गोविंदा, वधाचे पशु बांधण्याच्या जागा ठरतील. काटेरी बाण, भाले यज्ञात चमच्याचे काम करतील. ज्यातून विजयाचे

अमृत पांडव त्यांच्यांना पिण्यास देतील. विविध साधनं इतर कामात वापरली जातील त्या यज्ञात. मरणाऱ्या योद्ध्यांचे रक्त तुपाचे काम करत असतील. द्रोण, कृप व त्यांचे शिष्य सदस्यांचे काम करणार आहेत. गांडीवातून मारलेले बाण आणि इतर क्षेपणास्त्र सोम वाटणाऱ्या वाटकांचे काम करतील. सत्यकी प्रमुख अध्वर्यूचे काम करत असेल. दुर्योधनाला मुख्य कर्ता म्हणून उभे केले जाईल. ते त्याचे सैन्य त्याची पत्नी असेल. जेव्हां रात्री त्या यज्ञाचे विधी सुरू होतील घटोत्कच त्यावेळी व्याधाची भूमिका करत असेल. दृष्टद्युम्न जो यज्ञातून आला तो ह्या यज्ञाचे मुख असेल. कृष्णा (द्रौपदी) त्या यज्ञाची दक्षिणा असेल. अरे कृष्णा, मी हे माझ्या मनापासून सांगत आहे. मला माझ्या कुकर्माचा पश्चात्ताप होत आहे. जे माझ्या कडून झाले ते मी बदलू शकत नाही. पण मी तुला सांगतो जे घडले ते माझ्याकडून अनवधानाने झाले हे तरी तू मान्य करशिल. दुर्योधनाच्या उपकारा खाली मी इतका दबलो गेलो आहे कीं, त्यामुळें जे घडले ते घडले माझ्या कडून. अरे कृष्णा, तू पहाशिल मी अर्जुनाच्या बाणांनी मेलेला असेन, त्यावेळी ह्या यज्ञाची पुनच्छिती सुरू होईल. जेव्हां कुंतीचा दुसरा पुत्र दुःशासनाचे रक्त पित असेल, तो सोम पिण्यासारखा असेल. जेव्हां दृष्टद्युम्न आणि शिखंडी द्रोण व भिष्माला मारतील तेव्हां ह्या यज्ञाचा विधी कांहीं काळासाठी थांबवलेला असेल. जेव्हां महाबली भिम दुर्योधनाचा वध करील तेव्हां हा यज्ञ जो धृतराष्ट्राच्या मुलांनी प्रारंभ केला, संपेल. मेलेल्या कौरवांच्या विधवा गांधारी बरोबर जेव्हां त्या रणभूमिवर आक्रोश करत असतील तेव्हां गिधाडं, कोल्हे आणि लांडगे तेथील मृतांचे देह खात असतील तेव्हां अरे कृष्णा, ह्या यज्ञानंतरचे स्नान केले जाईल. अरे कृष्णा, मी तुला प्रार्थना करतो, त्या प्राचीन परंपरेत वाढलेल्या क्षत्रिय कुळांचा अशारितीने नाश होऊ देऊ नकोस. कुरुक्षेत्री ते क्षत्रिय त्यांच्या आयुधाने एकमेकांना ठार माऽणार आहेत. तुझ्या मनात काय आहे, ते तू साध्य करणार आहेस हे मी जाणतो. जे मरतील त्यांना तू स्वर्गात जागा देण्याची कृपा करावीस अशी मी तुझ्याकडे प्रार्थना करतो. जोपर्यंत ते डोंगर आणि त्या नद्या आहेत तोपर्यंत ह्या युद्धाची कथा अजरामर राहिल असें वाटते. ब्राह्मण ह्या युद्धाची कथा सांगत असतील. युद्धात जे क्षत्रिय मिळवतात ती त्यांची खरी संपत्ती असते. युद्धाच्या वेळी तुझ्या अर्जुनाला माझ्या समोर आणून ठेव आणि हे आपले संभाषण कोणाला समजणार नाही असें पहा.

कर्ण विवाद पर्व भाग एकशे एकेचाळीसावा संपला.

# कर्ण विवाद पर्व

## भाग एकशे बेचाळीसावा

संजय बोलतो, कर्णाचे ते ऐकून कृष्ण स्मित करत विचारतो, "अरे कर्णा, तुला मी दिलेले पृथ्वीचे राज्य खरोखरच नको कां"? पांडवांचा विजय निश्चित आहे. त्याकरता आता दुर्योधनाला सोडून तू त्यांच्यात आलास तर ते तुझ्या सुत कुटूंबाच्या भल्याचे होणार आहे. पांडवांत आलास म्हणून तू तुझे सुत आप्त सोडावेस असें मी सुचवत नाही. अरे तुझी माता, मी स्वतः आपण सगळे सुतच आहोत. पांडवांचा ध्वज फडकत रहाणार आहे. ह्याबद्दल शंका नको. दैवी कारागीर भौमनाने त्यासाठी रथाचा स्तंभ तयार केला आहे. त्यावर विविध स्वर्गीय प्राणी खेळत आहेत असे दाखवले आहे. तो ध्वज इंद्राच्या ध्वजासारखा देखणा आहे. तो पांडवांचा जय दाखवत आहे. त्याचा व्याप एक योजन इतका आहे. तो सर्वत्र पसरलेला आहे. अर्जुनाचा तो स्तंभ तेजाने चमकत आहे. त्याला कोणी अडवू शकणार नाही. तो तुला युद्धाच्या वेळी दिसेल. तो स्तंभ कशानेही अडवला जाणारा नाही. जेव्हां युद्ध होईल तू पहाशिल अर्जुनाचा रथ त्याते शुभ्र घोडे खेचत असतील. अर्जुन त्याची विविध दैवी आयुध वापरत असेल. ऐंद्र, अग्नेय, अफ्रुत अशी ती असतील. जेव्हां गांडीवाचा टणत्कार तुला ऐकू येईल तेव्हां आकाशात ढगांचा गडगडाट झाल्यासारखे होणार आहे. त्यावेळी कृत, त्रेता आणि द्वापार युगाची लक्षण नाहीशी होतील व फक्त कलीयुग दिसेल. कारण ह्या युद्धापासून कलीयुगाचा आरंभ होणार आहे. जेव्हां तू पहाशिल युधिष्ठीर तप व जप सामर्थ्याने सज्ज असा त्याच्या सैन्याचे माग्रदर्शन करत आहे तेव्हां कृत, त्रेता आणि द्वापार युगांची लक्षण नाहीशी होतील व फक्त कलीयुग आढळेल. जेव्हां तू पहाशिल भिमसेन त्याच्या गदेने संहार करत दुःशासनाचे रक्त पित आहे तेव्हां कृत, त्रेता आणि द्वापार युगांची लक्षण नाहीशी होतील व फक्त कलीयुग आढळेल. जेव्हां तू पहाशिल अर्जुन द्रोणांना शह देत आहे, शंतनुची मुलं, दुर्योधन, जयद्रथ, सगळे लढण्यासाठी एकमेकांवर तुटून पडत आहेत, तेव्हां कृत, त्रेता आणि द्वापार युगांची लक्षण नसतील फक्त कलीयुग आढळेल. जेव्हां तू पहाशिल मांद्रीची दोन मुलं शत्रूपक्षाच्या रथांचा चुराडा करत आहेत, धृतराष्ट्राच्या सैन्याचा विद्ध्वंस करत आहेत, तेव्हां कृत, त्रेता आणि द्वापार युग नसतील फक्त कलीयुग असेल. अरे कर्णा, परत जाशिल तेव्हां द्रोण आणि कृपांना सांग, कीं, हा महिना फार प्रसन्न करणारा आहे. खाद्य पेयांची कांही कमी नाही. झाडे फळांनी डवरलेली आहेत, माशा कुठेच घोंघावत नाहीत. रस्ते चिखलाने बरबटलेले नाहीत. पाण्याची रुची चांगली आहे. हवा फार उष्ण अथवा थंडसुद्धा नाही. सात दिवसानंतर नवा चंद्र उगवणार आहे, त्या मुहूर्तावर हे युद्ध प्रारंभ करू. कारण त्या दिवसांवर इंद्राचे प्राबल्य असेल. तेथे सभेत जमलेल्या सगळया राजांनासुद्धा सांग, जे दुर्योधनाचे दोस्त आहेत, त्यानीसुद्धा लढण्याची तयारी करावी.

कर्ण विवाद पर्व भाग एकशे बेचाळीसावा संपला.

# कर्ण विवाद पर्व

## भाग एकशे त्रेचाळिसावा

संजय पुढे धृतराष्ट्राला सांगतो, ते माधवाचे हितकारक व उपयोगाचे बोलणे ऐकल्यावर कर्ण कृष्णाची पुजा करतो व त्याला बोलतो, "तुला सगळे माहित असतांना, मला पटवण्याचा प्रयत्न तू कां करत होतास"? शकूनी, मी स्वतः, दुर्योधन आणि दुःशासन व इतर कौरव अशा आमच्या कारणानें ते युद्ध तू आयोजत आहेस, ज्यात सारी क्षत्रिय प्रजा मरणार व पृथ्वी रक्ताने माखली जाणार आहे. ज्यात पांडव आणि कौरव त्यांच्या दोस्त राजांच्या मदतीने ते युद्ध करणार आहेत. ते सगळे यमाच्या दारी जाणार आहेत. भिववणारी दृष्य दिसत आहेत. ती दृष्य पहाणाऱ्याचे रोमांच ताठ उभे झाले आहेत. ते दाखवते कीं, त्या युद्धात पांडव जिंकणार आहेत व कौरव हरणार आहेत. शनी ग्रह रोहीणी नक्षत्रात अडकला आहे. त्या परिस्थितीत पृथ्वीवर आकांत होतो. ग्रह मंगळ, ज्येष्ठा कडे सरकत आहे, आणि अनुराधाजवळ सुद्धा जात आहे, ह्याचा अर्थ पृथ्वीवर मोठा नरसंहार होणार आहे. ग्रह गुरू चित्रा नक्षत्राला सह देत आहे, चंद्रावरील डागांच्या जागा बदललेल्या आहेत, राहू सूर्याकडे झुकलेला आहे, अशनि आकाशातून पावसासारखे पडत आहेत, त्यांचे भयंकर आवाज होत आहेत, हत्ती भयंकरपणे चित्कार करत आहेत. घोडे रडत आहेत, त्यांचे खाण्याकडे लक्ष दिसत नाही, ही सगळी महाभयंकर अरिष्टाची लक्षणं आहेत. कौरवाच्या सैन्यातील हत्ती व घोडे कमी खातात पण जास्त हगतात, हे पराजयाचे लक्षण मानले जाते. त्याउलट पांडवांच्या छावणीतील हत्ती व घोडे मजेत असल्याचे दिसते. सगळे शुभशकूनी पक्षी, मोर, हंस, करकोचे, चितक, जिवजीवा पांडवांच्या छावणीकडे दिसतात परंतु, कौरवांच्या छावणीकडे अशुभ पक्षी जसे, गिधाड, कावळे, घुबड, कोल्हे, लांडगे, माशा आढळत होते. कौरवांच्या छावणीत नगारे वाजत नव्हते, पांडवांच्या छावणीतील नगारे न वाजवता वाजत होते. सूर्याच्या भोवती काळे खळं पडलेली होती. दुर्योधनाच्या छावणीतील विहीरींतून मोठे आवाज येत होते. ती हरण्याची लक्षणं आहेत. संध्या व उषःकाली तसे दिसणे वाईट समजले जात होते. कोल्हेकुई हैराण करत होती. काळी पंख व लाल पाय असलेले पक्षी रात्रीच्या प्रहरी कौरवांच्या छावणीवर घिरट्या घालत होती. ही सगळी हरण्याची लक्षणं होती. दुर्योधन ब्राह्मणांचा तिरस्कार करतो व त्याशिवाय शिक्षकाचा व त्यांच्या सेवकांचा सुद्धा मान राखत नव्हता. दुर्योधनाच्या छावणीच्या पूर्वेकडील क्षितीजावर रक्त रंग आकाशात दिसत होते. दक्षिणेकडे शस्त्रांचा व पश्चिमेकडे मातीचा रंग दिसत होता. जणू काय मृत्यू त्या छावण्यांभोवती घुटमळत आहे. पुढे संजय सांगतो, त्याला असें दृष्य दिसले त्यात युधिष्ठीर त्याच्या भावांबरोबर हजार स्तंभ असलेल्या वाड्यात जात आहे. त्यांच्या अंगावर पांढरे वस्त्र होते व त्याच्या डोक्यावर शुभ्र शिरवस्त्र होती. ते नंतर त्यांच्या आसनांवर बसलेले दिसत होते. त्याच दृष्यात त्याला दिसते कीं, जनार्दनाला मी पहातो कीं, सगळी पृथ्वी लाल झाली आहे. युधिष्ठीर हाडांच्या ढीगारावर

चढत आहे. तो मजेत दुध पितांना मला दिसत होता. दुसऱ्या दृष्यात मी पहातो कीं, कृष्णाने दिलेली पृथ्वी युधिष्ठीर गिळत आहे. मला वृकोदर त्याच्या गदेसह दिसला कीं, एका शिखरावरून कोणाला तरी आव्हान देत आहे. तोसुद्धा पृथ्वी खात होता. तो सगळयांना ठार मारणार असें वाटत होते. आणखीन एका दृष्यात मी पहातो कीं, अर्जुन त्याच्या गांडीवासह शुभ्र रंगाच्या हत्तीवर कृष्णाबरोबर बसला आहे. त्या अवस्थेत तो खूप सुंदर दिसत होता. मला खात्री आहे कीं, तू अरे कृष्णा, दुर्योधनाचे सगळे राजे व त्यांचे सैन्य नष्ट करणार आहेस. मला दिसते कीं, नकूल व सहदेव सत्यकी बरोबर एका सुंदर रथात बसले आहेत तो रथ माणसे खेचत होती. त्यांच्या हातात जिंकल्यानंतर जशी कंकण घालतात तशी होती. त्यांच्या डोक्यावर छत्री माणसांनी धरलेली होती. मला आणखीन असें दिसले कीं, कौरवांच्या बाजूचे तिघे, अश्र्वत्थामा, कृप, कृतवर्मन त्यांच्या डोक्यावर पांढऱ्या रंगाचे टोप होते. इतर राजांच्या माथ्यावर मात्र लाल रंगाचे टोप होते. मला आणखीन असें दिसले कीं, भिष्म व द्रोण उंटाने ओढलेल्या गाडीत बसले होते, त्यांच्या पुढून मी व धृतराष्ट्राचा पुत्र चालत आहेत व आम्ही अगस्त्याच्या आश्रमाकडे जात आहोत. त्याचा अर्थ आम्हाला लवकरच यमाच्या घराकडे जावे लागणार आहे. मला असें दिसते कीं, सगळा क्षत्रिय वर्ण त्या गांडीवाच्या माऱ्यात सापडणार आहे. पृथ्वीचा नाश होणार आहे. ते ऐकून कृष्ण बोलतो, अरे सगळया पृथ्वीचा नाश माझ्या आज्ञेने होणार आहे. जेव्हां नाश होणार असतो तेव्हां अशी दृष्य दिसतात. कर्ण त्याला बोलतो कीं, त्या युद्धात सगळे नष्ट झाल्यावर आपण पुन्हा येथे भेटू. नाहीतर स्वर्गात निश्र्चितच भेटू. ते सांगितल्यावर संजय पुढे सांगतो, कर्ण कृष्णाला घट्ट मिठी मारतो. त्यानंतर तो त्याच्या रथातून उतरतो, स्वताच्या रथात बसतो, त्यानंतर तो निराश मन असलेला राधासुत आमच्या बरोबर परत येतो.

कर्ण विवाद पर्व भाग एकशे त्रेचाळिसावा संपला.

# कर्ण विवाद पर्व

## भाग एकशे चव्वेचाळिसावा

वैशंपायन पुढे सांगतात, कृष्णाची शांततेसाठीची शिष्ठाई अयशस्वी ठरल्यानंतर कृष्ण पांडवांच्या ठिकाणी निघतो तेव्हां विदूर कुंतीला बोलतो, "अहो दैवी पुत्राची माता, आपण जाणता कीं, माझा कल सदैव शांततेकडेच असतो. मी किती ओरडलो तरी दुर्योधनाचे कान उघडत नाहीत. युधिष्ठीराकडे छेड्डी आहेत, पांचाल आहेत, केकया आहेत, भिम, अर्जुन, कृष्ण स्वतः, युयुधन, माद्रीची दोघे आणि त्यांचे दोस्त राजे आहेत. ते अजून उपप्लव्यातच रहात आहेत. त्या सगळयांचा उद्देश चांगुलपणा वाढवण्याकडे आहे. राजा धृतराष्ट्र वृद्ध झाला आहे पण त्याला शांतता नको असें दिसते, त्याचा लोभ व गर्व त्याला ते करू देत नाही. त्याच्याकडे सगळे वाईटपणात रमणारे जमले आहेत. त्यात जयद्रथ आणि कर्ण प्रमुख आहेत. त्या बरोबर दुःशासन, शकूनी, सगळे बिघडवणारे आहे. त्या वाईट लोकांचे चांगल्या लोकांशी जे वागणे होईल त्याची कटू फळ त्यांना भोगावी लागणार आहेत. त्याचे परिणाम स्वरुप सगळयांचा मृत्यू होणार आहे. कृष्णाला शांतता आणता आली नाही म्हणून पांडव लवकरच युद्धाला प्रारंभ करतील असें दिसते. त्यामुळें माझी झोप उडाली आहे. विदूराचे ते नैराश्यजनक उद्गार ऐकून कुंतीला सुद्धा श्वास लागतो. ती जोराजोराने श्वास घेऊ लागते. ती विचार करते, धिक्कार असो त्या संपत्तीचा जिच्यासाठी सगळे मरणार आहेत. नातेवाईक एकमेकांच्या रक्ताचे पाट पाहणार आहेत. अशा युद्धात सगळे नातेवाईकच मारले जाणार आहेत. कोणी परका नाही. जग पहात असणार आहे ती यादवी. किती मोठे दुर्दैव आहे कीं, पांडव, छेड्डी, पांचाल, यादव एकत्र येऊन भारतांना ठार मारणार आहेत. खरे तर मी युद्धांच्या विरुद्ध आहे. परंतु, जर नाही लढले तर सुद्धा दुसऱ्या प्रकारचे दुःख पदरी पडणार आहे. एका गटाचा नाश झाला कीं विजय होतो कां? मला हे सगळे पाहून अतीव दुःख होत आहे. भिष्म, द्रोण, कर्ण सगळे मोठे योद्धे लढणार ह्या कल्पनेने मला भिती वाटू लागली आहे. द्रोण त्यांच्या शिष्याविरुद्ध लढणार? भिष्मांना पांडवांबद्दल प्रेम कां वाटत नाही? क्षत्रियत्व प्रेमापेक्षा मोठे कधी झाले. ते स्वताच्या नातवंडाशी कसे लढू शकतात? तेथे एक नीच माणून आहे, कर्ण दुर्योधनाच्या मागे, तो एकच आहे ज्याच्या बळावर तो मूर्ख पुतण्या हे युद्ध खेळू इच्छित आहे. केवळ पांडवांना त्रास देणे हे एकच ध्येय त्यांचे आहे. तो कर्ण फार ताकदवान आहे. ते मला सलत आहे म्हणून मी एकदाची त्याला भेटून त्याच्या जन्माची कहाणी सांगून पहाते कदाचित त्यामुळें तो बदलेल!

कुंतीला ते सगळे आठवते, ते ती कर्णाला सांगावयाचे ठरवते. ती त्वरीत त्या किनाऱ्यावर जाते तेथे कर्ण त्याची पहाटेची सूर्य उपासना करत होता. त्याचा चेहरा सूर्याच्या दिशेने म्हणजे पूर्वेकडे होता. कुंती त्याच्या मागे उभी रहाते, त्याची प्रार्थना पूर्ण होण्याची वाट पहात असते.

धिप्पाड बांध्याचा तिचा मुलगा कर्ण दोनही हात वर करून सूर्याचा जप करत असतो. उगवत्या सूर्याच्या उन्हाचा तिला त्रास होत होता. ती कर्णाच्या अंगावरील वस्त्राच्या सावलीत उभी रहाते. सूर्याच्या तापाने कर्णाची पाठ गरम झालेली असते. त्याचा जप पूर्ण झाल्यावर तो वळून पहातो ते त्याला कुंती त्याच्या अंगाच्या वस्त्राच्या सावलीत उभी असलेली दिसते. त्याला नवल वाटते तो तिला ओळखत असतो पांडवांची माता म्हणून. तो तिला वंदन करतो. तो तिला विचारण्या आधी कुंती म्हणते मुला कर्णा, मला कांहीं तुला सांगावयाचे आहे ज्याचा संबंध तुझ्या जन्माशी आहे. असें बोलल्यानंतर ती त्याला ते सगळे सांगू लागते जे तिला कर्णाला सांगावयाचे होते. ती सांगू लागते व कर्ण तिचे ऐकत असतो.

"त्या काळात मी कुंतीभोजाच्या वाड्यात रहात होत्ये. एकदा ऋषी दुर्वास तेथे येतात. त्यांची मी बडदास्त पहाते. मी त्यावेळी एक अज्ञानी लहान मुलगी होते. माझ्या सेवेने संतुष्ट झालेले ते ऋषी मला एक मंत्र देतात व सांगतात कीं, मी जर त्या मंत्राचा जप केला व कोण्या देवाला बोलावले तर तो येईल व मला त्याच्यापासून एक पुत्र होईल. मला त्या मंत्र्याबद्दल कांहींच कळत नव्हते पण त्या वयात मुलींना त्याच्या शरीरातील फरकाबद्दल कुतूहल असते तसे मलासुद्धा होते. त्या कोवळ्या वयात त्या मंत्राबद्दल मला कमालीची उत्सुकता वाटली व मी प्रयोग करण्याचे ठरवले. मी एक गंमत म्हणून सूर्यदेवासाठी तो मंत्र जपला व मला समजण्या आधी ते सूर्यदेव माझ्यापुढे उपस्थित झाले. मला त्यांच्यापासून दिवस कधी गेले समजलेसुद्धा नाही. मी माझी कौमार्याची मर्यादा ओलांडली होती. त्या बाळाला मी माझ्या उदरात वाढवत होते. माझ्या मैत्रीणी तेथे माझी काळजी घेत होत्या. दिवस पूर्ण झाल्यावर मी तूला जन्म दिला. तू माझा आहेस. असं असतांना तू माझी आज्ञा कां मानत नाहीस"? कुंती कर्णाला वेगांने विचारते. ते सगळे ऐकल्यानंतर कर्ण बोलतो.

कर्ण विवाद पर्व भाग एकशे चव्वेचाळिसावा संपला.

# कर्ण विवाद पर्व

## भाग एकशे पंचेचाळिसावा

कर्ण बोलतो, "मी कर्ण, राधाचा मुलगा, अधीरथाचा पुत्र आहे. आपण येथे कां आला अहात"? ते ऐकल्याने अस्वस्थ झालेली कुंती त्याला सांगते कीं, तो राधाचा नाही तर तिचा कुंतीचा मुलगा आहे. माझ्यावर विश्वास ठेव माझ्या मुला. असें ती पुन्हा पुन्हा विनंती करत असते. ती त्याला सांगते कीं, तो सुत वर्णाचा नाही. तो कुंतीभोजाच्या राजवाड्यात जन्मलेला आहेस व तुझा जन्मदाता साक्षात सूर्यदेव आहे. तुझा जन्म माझ्या पित्याच्या घरात झाला आहे, त्यावेळी तुला दिलेले कंकण आणि चिलखत तुझ्या अंगावर जन्मतः होती. केवळ अज्ञानामुळें तू धृतराष्ट्राच्या मुलाच्या कह्यात गेलास, ते चांगले झाले नाही. आपल्या मातापित्यांचे ऋण फेडणे हेंच मुलांचे कार्य असते. तुझ्या धाकट्या भावांने मिळवलेली संपत्ती जिचा पालक युधिष्ठीर आहे ती केवळ मत्सरापोटी दुर्योधनानी कपट करून त्यांच्या कडून काढून घेतली. माझी इच्छा आहे कीं, तू व अर्जुन एकत्र यावे व ते कौरवांना दिसावे. तसे झाले तर हा वाद मिटू शकतो. कर्ण आणि अर्जुनांची नांवं एका श्वासात घेतली जावीत अशी माझी इच्छा आहे. जर तुम्ही दोघे एकत्र आलात तर काय अशक्य आहे ह्या जगात. तुझ्या पांच भावंडांबरोबर तू उभा रहा. सगळे जग तुमच्या पायाशी येईल. तू उगाचच स्वताला सुत समजत राहू नकोस. तो तुझा वर्ण नाही. तू पार्थ आहेस, तू कौंतेय आहेस राधेय नाहीस हे समजून घे.

कर्ण विवाद पर्व भाग एकशे पंचेचाळिसावा संपला.

# कर्ण विवाद पर्व (संपले)

## भाग एकशे शेहेचाळिसावा

वैशंपायन पुढे सांगतात, कुंतीच्या त्या सांगण्यानंतर कर्णाला एक विलक्षण असा आवाज ऐकू येतो. तो सूर्यमंडलातून येत असतो. सूर्य त्याच्या पितृप्रेमापोटी ते सांगत असतो. तो आवाज कर्णाला सांगत असतो कीं, "ती पृथा जे बोलत आहे, ते सगळे खरे आहे. अरे कर्णा, ती जे सांगते त्याप्रमाणे तू केले पाहिजेस. जर तसे केलेस तर तुझे भले होईल".

वैशंपायन पुढे सांगतात, पृथाच्या विनवण्याने आणि सूर्याच्या सांगण्याने तरीसुद्धा कर्ण ते मानायला तयार नव्हता. तो तिला बोलतो, "अहो क्षत्रिय साहेबा, माझा तुझ्या बोलण्यावर अजून विश्र्वास बसत नाही. तुझ्या आज्ञेचे पालन करण्यास मी तयार नाही कारण तू तुझे कर्तव्य केले नाहीस. मला जन्म दिल्यावर लगोलगच तू मला पाण्यात सोडलेस, त्यामुळें मी तुझा राहिलो नाही. तसे करून तू माझ्यावर अन्याय केला आहेस अशा परिस्थितीत तूला कोणता अधिकार प्राप्त होतो कीं, तू मला कोणताही आदेश द्यावास? ज्यांनी मला आधार दिला तेच माझे सर्वस्व आहेत व त्यांच्या आज्ञेचेच पालन मी करणार आहे. जर मी पाण्यात बुडलो असतो तर काय झाले असते? मी जन्माने क्षत्रिय आहे हे मी तुझ्या बोलण्याने समजलो. तुझ्या त्या वागण्यामुळें माझे सगळे क्षत्रिय हक्क मी घालवले. ह्याच्यापेक्षा मोठा अपराध कोणी शत्रूसुद्धा करणार नाही. तुला माझी जरासुद्धा दया आली नाही? असें बेजबाबदारीचे वागून सुद्धा तू आता माझ्यावर हक्क दाखवत आहेस. जर आज सारखी परिस्थिती आली नसती तर तू कधीच माझा विचार केला नसतास, केवळ अर्जुनावरील प्रेमापोटी तुला आता माझी आठवण आली आहे हे न समजण्या इतका मी खुळा नाही. तुझ्या धनंजयाला मदत करण्यासाठी जनार्दन आहे मग मला कां विनंती करत आहेस? तुझ्या अशा वागण्यातून तू अजून किती स्वार्थी आहेस तेच स्पष्ट होते. जर मी तुझ्या म्हणण्याप्रमाणे केले तर ज्यांनी माझ्यावर इतकी वर्षे विश्र्वास ठेवला त्यांचा मी विश्र्वासघात केला असें होईल त्याचे काय? मी अर्जुनाला घाबरलो असें ते समजतील व त्याने माझी बेइज्जती होईल त्याचे काय? सगळे क्षत्रिय माझ्या तोंडात शेण घालतील त्याचा विचार तू केला आहेस कां? त्या धृतराष्ट्राच्या मुलांनी माझ्यासाठी किती काय केले ते मी असेंच विसरू शकत नाही. तो दुर्योधन मला बरोबरीचा दर्जा देतो जणू काय मीच हस्तिनापुराचा राजा आहे असें माझे स्थान आज तेथे आहे ते मी कां घालवू केवळ आता तुला माझी आठवण आली म्हणून? सगळयांशी वैर करणारा तो दुर्योधन मला किती मानतो ते तू पाहिले आहेस कां"? जसे वसु वासवाकडे नमतात तसें कौरव मला मान देत असतात. मी त्यांचा विश्र्वासघात करणार नाही. माझ्या हिम्मतीवर त्यांची मदार आहे. हे युद्ध होत आहे तेंच मुळी माझ्या आश्र्वासनामुळें. कोणत्याही फालतु कारणासाठी मी त्यांचा हिरमोड करू शकत नाही. हि वेळ आहे कीं, कौरवांचे सगळे दोस्त त्यांच्या बाजूने रहातील त्यावेळी मी

तुझे ऐकले तर तो मोठा धोका होईल. माझ्या जीवाची बाजी लावून मी त्यांच्यासाठी पांडवांविरुद्ध लढणार आहे. कौरवांनी जे उपकार माझ्यावर केले आहेत ते फेडण्याची हींच तर वेळ आहे. लक्षात ठेव मी एक प्रामाणिक क्षत्रिय आहे, कदाचित तो गुण माझ्यात तुझ्यामुळे आला असेल पण तो आहे व मी कोणाचाही विश्वासघात करणार नाही. मी दुर्योधनासाठी तुझ्या इतर मुलांविरुद्ध प्राणपणाने लढणार आहे व जर जमले तर त्यांना कंठस्नान घालणार आहे, जे एका क्षत्रियाचे कर्तव्य असते. असें असले तरी मी माझ्या स्वभावाप्रमाणे चांगुलपणा सोडू शकत नाही हेसुद्धा तितकेच खरे आहे. तसेंच पित्याचेसुद्धा म्हणणे आहे किं मी तुझा अव्हेर करू नये त्यासाठी मी तुझ्यासाठी कांहीं करू इच्छितो. त्या प्रित्यर्थ अहो क्षत्रिय माते, मी तुला आश्वासन देतो कीं, अर्जुन सोडून दुसऱ्या कोणत्याही तुझ्या मुलांवर मी हल्ला करणार नाही. त्यांना माझ्या कडून अभय देतो. त्या सव्यसाचीला मारून मी मोठे श्रेय मिळवणार आहे. अर्जुनानेसुद्धा त्याच्या पत्नीला आश्वासन दिले आहे कीं, तो मला मारणार, त्यामुळें जर तो मला मारण्याचे आश्वासन द्रौपदीला देतो तर मीसुद्धा तसे आश्वासन दुर्योधनाला देऊ शकतो. कोणीतरी एक मरणार आहे त्यामुळें पुन्हा अहो माता, तुमच्यासाठी पांचच मुलं रहातील. एकतर धनंजय नाहीतर मी! कर्णाचे ते बोलणे ऐकत असतांना कुंती थरथरा कांपत होती. ती त्या कर्णाला धरते व थरथरत्या आवाजात त्याला सांगते, "जर तू सांगतोस ते होणार असेल तरी कौरव मात्र सगळे मारले जाणार आहेत. तशी भविष्यवाणी आहे. तरी तू तुझ्या चार भांवांना संरक्षण देत आहेस त्याने मला थोडा दिलासा मिळाला आहे. मला आशा आहे कीं, ते तुझे वचन तू प्रत्यक्ष युद्धाच्या समय़ी विसरणार नाहीस". असे बोलून नंतर ती त्याला शुभेच्छा देते जसा रिवाज आहे. त्यावर कर्ण तिला अभिवादन करतो व तथास्तु असें बोलतो.

ते झाल्यावर ते दोघे आपापल्या मार्गाने विरुद्ध दिशेने निघून जातात.

कर्ण विवाद पर्व भाग एकशे शेहेचाळिसावा संपला.

# सैन्य निरयन पर्व (सुरू)

## भाग एकशे सत्तेचाळिसावा

वैशंपायन पुढे सांगत असतात, हस्तिनापुराकडून कृष्ण उपप्लव्याकडे निघतो. तेथे पोहोचल्यावर तो जे घडले ते सगळे युधिष्ठीराला सांगतो. त्यांची त्यावर प्रदीर्घ चर्चा होत रहाते. त्यानंतर सौरी विश्रांती घेण्यासाठी त्याच्या खोलीकडे जातो. तेथे जमलेले सगळे राजेसुद्धा आपापल्या निवासस्थानी जातात. संध्याकाळी सूर्य मावळल्यावर पांडव त्यांची संध्याकाळची प्रार्थना करतात. ते सगळे पांडव कृष्णाचाच विचार करत असतात. थोड्या वेळांनी कृष्ण पुनः त्यांच्यामध्ये येतो व त्यांची पुन्हा युद्धाबद्दल चर्चा सुरू होते. त्या सभेत तू जे दुर्योधनाला सुनवलेस ते मला समजले आहे व त्याबद्दल आम्ही सगळे पांडव तुझे आभारी आहोत. कृष्ण म्हणतो त्याला परोपरीने सांगून पाहिले पण तो युद्धाचा विचार सोडावयाला तयार नाही. युधिष्ठीर विचारतो, "जेव्हां तू त्याला सांगत होतास तेव्हां भिष्माचार्यांची कोणती प्रतिक्रीया तुला दिसली? अरे हृषिकेशा, द्रोणांनी कोणती प्रतिक्रीया दिली? त्याचे आई बाप कोणती प्रतिक्रीया देत होते? आमचे काका विदूर काय बोलत होते ते आम्हाला सांग. त्यांना आमची फार काळजी असते म्हणून त्यांचे विचार मला ऐकावयाला आवडेल. ते दुर्योधनाला काय बोलले? तेथे जमलेले इतर राजे कोणती प्रतिक्रीया देत होते? अरे जनार्दना ते सगळे आम्हाला सांग. तू आधीच सांगितले आहेस भिष्म व धृतराष्ट्र, लोभ आणि द्वेषाने बिघडलेल्या दुर्योधनाला जो स्वताला फार शहाणा समजतो, कडक शब्दात सुनवत होते. तरी ते तू पुन्हा मला सांगशिल तर बरे होईल. तूच आमचा आधार आहेस. तूंच आमचा देव आहेस आणि मार्गदर्शक सुद्धा".

वासुदेव त्यांना सांगतो, "ऐक ते काय बोलले ते, माझे बोलणे झाल्यावर दुर्योधन जोरा जोरांनी हसू लागला. त्या त्याच्या हसण्यामुळें चिडलेले भिष्म त्याला बोलतात, अरे दुर्योधना, मी आपल्या घराण्याच्या भवितव्यासाठी बोलत आहे. माझे पिता राजा शंतनु, ते जगात ख्यातनाम होते, मी त्यांचा एकुलता एक मुलगा होतो, त्याच्या मनात दुसरे लग्न करण्याची इच्छा झाली. त्यांना दुसरा मुलगा व्हावा असे वाटू लागले, कारण त्याना कोणी सांगितले कीं, एक पुत्र म्हणजे असून नसल्यासारखाच. आपल्या वंशाच्या वृद्धीसाठी आणखीन एक पुत्र असावा असें त्यांना वाटत होते. त्यांची ती इच्छा पाहून मी कलीला त्यांची पत्नी म्हणून आणली. त्यावेळी मी तिच्या बापाला आश्वासन दिले होते कीं, मी आजन्म ब्रह्मचर्य पाळीन. त्याच प्रमाणे तिच्या बापाने माझ्याकडून आणखीन एक वचन घेतले कीं, मी गादीवर बसणार नाही. ते सगळे तुला माहीत आहे. मला त्याबद्दल दुःख वाटत नाही. कलीला शंतनु पासून एक मुलगा झाला त्याचे नांव विचित्रवीर्य होते. तो गुणी होता, पराक्रमीसुद्धा होता, मी त्याचा सेवक म्हणून काम पाहू लागलो. त्यानंतर मी त्याच्यासाठी तीन कन्या काशी नरेशाच्या, पत्नी म्हणून आणल्या. त्या सुमारास माझे युद्ध

परशुरामाशी सुरू झाले, त्या युद्धाला घाबरून विचित्रवीर्य तेथून पळून गेला. त्यानंतर त्याला एक आजार लागला त्यामुळें तो पुत्र देण्यास अपात्र ठरला. त्यानंतर तो त्या आजारामुळें मेला. त्याच्या मृत्यूनंतर राज्यात अराजक माजले. वरुण राजासुद्धा नाराज झाले व देशात दुष्काळ सुरू झाला. प्रजा मला म्हणाली कीं, कांहीं केले पाहिजे. राज्याला राजा मिळाला पाहिजे तरच हे अरिष्ट टळेल. लोक मोठ्या संख्येने मरत होते. प्रजा मला सांगू लागली कीं मी गादीवर बसले पाहिजे. परंतु मी दिलेल्या वचनामुळें ते करू शकत नव्हतो. ते त्यांचे बोलणे ऐकून मला कळेना काय करावे. माता कालीनेसुद्धा मला सांगितले कीं, प्राप्त परिस्थितीत मी ते वचन मोडावे व गादीवर बसावे. राज्यातीव ब्राह्मण सुद्धा त्याच विचाराचे होते. ते सांगत होते कीं, आमच्या पूर्वजाच्या राजा प्रतिपाचा वंश मी चालवावा. तरी मी दिलेले वचन मोडण्यास तयार नव्हतो. मी त्यांना सांगितले कीं मी ब्रह्मचर्याचे वचन कदापीही मोडणार नाही. मी कलीला सांगितले कीं, मी दिलेले वचन मोडू शकत नाही कोणत्याही परिस्थितीत. तेव्हां ती आठवते कीं, तिला शंतनुशी लग्न करण्या आधी एका ऋषीपासून एक पुत्र झाला होता जो मोठा ऋषी होता. ती त्यांना बोलावते व विचित्रवीर्याच्या पत्नींसह संबंध घेण्यास सांगते. त्या पासून विचीत्रवीर्याच्या दोन बायकांपासून धृतराष्ट्र आणि पंडु होतात आणि एका दासीपासून क्षत्री होतो. त्यापासून आजचा भरत कुळाचा विस्तार झाला आहे. धृतराष्ट्र अंध होता म्हणून पंडु गादीवर बसला. त्या प्रमाणे त्याच्या मुलांना त्याचा हिस्सा मिळाला पाहिजे असें ठरले. म्हणून त्यांचा हिस्सा त्याना देणे हेंच योग्य होईल. मी सत्ता घेतली तर कोणाची बिशात आहे मला अडवू शकतील, पण मी तसे करणार नाही परंतु, न्यायांने सगळे झाले पाहिजे. जे माझे मत आहे तेंच शंतनुचे आहे असें समजून निवाडा झाला पाहिजे. माझ्या मताशी धृतराष्ट्र, गांधारी आणि विदूर असे सगळे एकमत आहेत. त्यांच्या मताचा मान राखला गेला पाहिजे. ते न मानल्यामुळे सगळी पृथ्वी नष्ट होईल.

सैन्य निरयन पर्व भाग एकशे सत्तेचाळीसावा संपला

# सैन्य निरयन पर्व

## भाग एकशे अठ्ठे चाळीसावा

वासुदेव बोलतो, भिष्माचे ते निवेदन झाल्यावर द्रोण, जे बोलण्यात पटाईत आहेत ते दुर्योधनाला सांगतात, "शंतनु राजे प्रजेच्या सुखासाठी फार दक्ष होते. भिष्मसुद्धा तसेंच कुळाच्या भल्यासाठी दक्ष आहेत. तसेंच राजे पंडुसुद्धा दक्ष आहेत. जरी राज्य करण्यासाठी दक्ष असले तरी त्यांनी संन्यास घेतला व आपले राज्य त्याच्या मोठ्या भावाच्या ताब्यात दिले. त्यानंतर त्यांचा धाकटा भाऊ विदूर ह्याची प्रधान म्हणून नेमणूक झाली. त्यानंतर सगळी प्रजा धृतराष्ट्राला राजा समजून काम होऊ लागले. जसें ते पंडुराजाला मानत होते तसे होऊ लागले. विदूर पंतप्रधान झाले व अर्थ व्यवस्था, राज्य व्यवस्था हे विभाग ते पाहू लागले. भिष्म युद्ध, शांतता करार, इतर व्यवस्था पहात असतात. जेव्हां धृतराष्ट्र गादीवर बसतात तेव्हां विदूर त्यांच्या बाजूला असतात. अरे दुर्योधना तू असे असतांना कुटूंबात भेद कसा करत आहेस"? पांडवांबरोबर राहून तू जास्त मजेत राहू शकतोस. भिष्माच्या कृपेने सगळयांना संपत्ती मिळत आहे. जेथे भिष्म आहे तेथे द्रोण असणार. म्हणून जे भिष्म सांगतात ते कर व ह्या संकटा पासून सगळयांना वाचव. नीटपणे त्यांचा हिस्सा त्यांना देऊन टाक. जसा अश्वत्थामा मला आहे तसे ते पांडव मला आहेत. अशा वादातून कांहीं निष्पन्न होणार नाही.

वासुदेव पुढे सांगतो, द्रोणाचे ते समजावणीचे बोलणे झाल्यावर विदूर पुन्हा सांगत असतात दुर्योधनाला, भिष्माकडे पहात तो बोलतो, अरे देवदत्ता, तुला ह्या कुळाच्या नाशाबद्दल काय वाटते कां"? हा दुर्योधन म्हणजे आपल्या कुळाला लागलेला डाग आहे. त्याच्या ह्या वागण्यामुळें कुरु घरणे नष्ट होणार आहे. हित आणि पुण्याचे संतुलन तो बिघडवत आहे. कुरु घराण्याला वाचवण्यासाठी त्यांच्यात समझौता होणे आवश्यक आहे. असे कांही अभद्र करण्यापेक्षा जंगलात जा. नाहीतर ह्या दुर्योधनाला पकडून बांधून ठेव आणि सरळ सगळा कारभार युधिष्ठीराच्या कडे सुपूर्द कर. त्यानेच हा प्रश्न मिटू शकेल. नाहीतर मोठ्या प्रमाणात नरसंहार होईल. ते बोलत असतांना विदूराला दुःख आवरेना व तो रडू लागला. ते ऐकून सुवलाची मुलगी गांधारी रागाने ओरडून दुर्योधनाला बोलते, "येथे असलेले सगळे राजे व ऋषी मी जे सांगते ते ऐकतील, तुझ्या सहकाऱ्यांच्या मदतीने तू जे पाप करत आहेस, त्यामुळें कुरु घराण्याची परंपरा बिघडत आहे. तू चांगुलपणाचा त्याग केला आहेस तुझे काळींज क्रूरतेने भरलेले आहे. ह्या राज्याचा राजा तुझा बाप आहे व विदूर भाऊजी त्याचे सहाय्यक आहेत, तुला कोणी असें निर्णय घेण्याचे हक्क दिलेले नाहीत. तुझे सगळे वरिष्ठ असतांना तू असा कसा निर्णय घेऊ शकतोस. तुझ्या अशा वाईट वागण्यामुळें तू राजा बनण्यास योग्य नाहीस. ते सगळे राज्य पांडवांच्या कडेच गेले तर सगळे सुखी होतील. आपल्या राज्य कारभाराच्या परंपरेनुसार पांडवच खरे हक्कदार आहेत. देवव्रत

सत्याला धरूनच वागतात. माझी इच्छा आहे कीं, भिष्म, विदूर आणि तुझे पिता तसे जाहिर करतील व हा प्रश्न निकालात काढतील. कोणताही सुबुद्ध राजकर्ता तेंच करील. जे ह्या घराण्याचे हितचिंतक आहेत ते माझ्यामताशी सहमत होतील".

सैन्य निरयन पर्व भाग एकशे अठ्ठेचाळीसावा संपला.

# सैन्य निरयन पर्व

## भाग एकशे एकोण पन्नासावा

वासुदेव बोलतो, गांधारीने अशाप्रकारे आवाज उठवल्यावर धृतराष्ट्र दुर्योधनाला सगळया राजांच्या समक्ष बोलतो, "अरे दुर्योधना, माझ्या मुला ऐक, मी काय सांगतो ते, जर तुला तुझ्या पित्याबद्दल कांहीं आदर असेल तर. चंद्र आपला मुळ पुरूष आहे, चंद्रापासून सहावा ययाति, नहुषाचा मुलगा, त्याला सहा मुलं होती ती सगळी राजर्षी होते. त्यातील राजा यदू मोठा होता. तो आपला पूर्वज आहे शर्मिष्ठा पासून. ती वृषपर्वनाची कन्या होती. पुरू देवयानी पासून झाला होता. ती शुक्राची कन्या होती. त्याला कव्य असेंसुद्धा म्हणतात. तो यदू, यादवांचा पूर्वज फार वाईट होता. तो सगळया क्षत्रियांचा अपमान करत असें, त्याला त्याच्या ताकदीचा गर्व होता. तो त्याच्या पित्याचेसुद्धा ऐकत नसे. भांवांचेसुद्धा ऐकत नसे. तो अजिंक्य होता. पृथ्वीच्या ह्या बाजूस तो महाबली झाला होता. त्यांने हे हस्तिनापूर बसवले. त्याचा पिता ययाति नहुषाचा पुत्र, त्याच्यावर रागावला, त्यांने त्याला शाप दिला. तो त्याच्या इतर मुलांना सुद्धा शाप देतो जे यदूशी चांगले होते. एवढेच नाही तर त्याला राज्यातून हाकलून दिले. त्यानंतर ययाति त्याच्या सर्वात लहान मुलाला, पुरूला गादीवर बसवतो. पुरू शांत स्वभावाचा होता. त्याचा अर्थ असा आहे कीं, राजा योग्यता पाहूनच गादीचा वारस निवडू शकतो तो वारस ज्येष्ठ असला पाहिजे असें नाही. आपली वागणूक चांगली ठेवून कनिष्ठ मुलं सुद्धा गादीचा वारस सांगू शकतात. त्याच प्रमाणें, माझ्या पित्याचे आजोबा, राजा प्रतीप जो तिनही जगात ख्यातनाम होते, त्या महान राजाला तीन पुत्र झाले होते. ती सगळी मोठी प्रसिद्ध झाली, त्यातील देवपी मोठा होता. वल्हीक त्यानंतरचा आणि शंतनु त्याहूनही लहान असें ते होते. ते माझे आजोबा होते. देवपी शक्तीमान, गुणवान, सत्यवादी होता. तो त्याच्या पित्याच्या आज्ञेत असें. परंतु, त्याला त्वचारोग झाला होता. तो देवपी सर्वांना प्रिय होता, सगळे त्याला जीव लावत होते, तो सुद्धा सगळयांशी प्रेमांने वागत असें, बापाच्या आज्ञांचे पालन करत असें, तो ब्राह्मणांचा मान राखत असें. त्याच्यावर त्याचा भाऊ वल्हिक जीव लावून होता. त्याच प्रमाणे शंतनुसुद्धा त्याच्यावर प्रेम करत होता. त्यांचे एकमेकांवरील प्रेम प्रशंसनीय होते. यथावकाश प्रतीपाने देवपीला उत्तराधिकारी नेमले. परंतु, ब्राह्मणांनी त्याच्या त्या नेमणूकास विरोध केला. कारण तो व्याधीत होता. ती नेमणूक रद्द झाली. प्रतीपाला फार वाईट वाटले. त्यामुळें देवपी संन्यास घेऊन वनात जातो. वल्हीक त्याच्या मामाकडे गेला व त्या राज्याचा अधिकारी झाला. राजपुत्र शंतनु जो जगप्रसिद्ध होता प्रतीपाच्या नंतर गादीवर आला. अशाप्रकारे अरे भारता, मी ज्येष्ठ असूनही पंडुला गादी मिळाली होती कारण मी अंध आहे. त्याच्या मृत्यूनंतर ते राज्य त्याच्या मुलांकडेच गेले पाहिजे आपल्या परंपरेप्रमाणे. जर मी गादी नाही मिळवू शकत तर तू कसा हक्क सांगतोस? तुझा हे वागणे दाखवते कीं, तू त्यांची गादी हिरावून घेऊ इच्छित आहेस. त्याच्या गुणवत्तेमुळें तो सगळया कुरु घराचा मुख्य

होण्याइतका योग्य आहे. एक चांगला राजा होण्यासाठी जे गुण अपेक्षित आहेत ते सगळे त्याच्यामध्ये आहेत. प्रजा त्याच्या अधिकारात सदैव सुखी असेल. क्षमाशिलता, त्यागी प्रवृत्ती, संयमी, वेदाचा अभ्यास, न्यायी, भूतदया, चांगुलपणा, माणूसकी, हे सगळे गुण जे एका राजात असले पाहिजेत ते त्याच्यात आहेत. युधिष्ठीर राजाचा मुलगा आहे, तू राजाचा मुलगा नाहीस. तू पापप्रवृत्तीचा आहेस, दुसऱ्यांचे खाणारा आहेस. हे राज्य तू कपटाने मिळवले आहेस हे तू चांगलेच जाणतोस. म्हणून त्या भ्रमात न रहाता तू बऱ्याबोलाने त्यांना अर्धे राज्य आणि त्या प्रमाणे जी इतर वाटणी असेल ती करून हा विषय मिटवून टाक. तसे केलेस तर तू व तुझी मुलं जास्त काळ मजेत राहू शकाल".

सैन्य निरयन पर्व भाग एकशे एकोणपन्नासावा संपला.

## सैन्य निरयन पर्व

## भाग एकशेपन्नासावा

वासुदेव पुढे सांगतात, अशारितीने भिष्म, विदूर, गांधारी आणि द्रोण व त्याचा पिता बोलले तरी हलकट दुर्योधन मानायला तयार नव्हता. त्या सगळयांचा उपमर्द करत तो निगरगट्ट सभेतून उठला व निघून गेला. त्याचा चेहरा लालबुंद झालेला होता व डोळेसुद्धा रक्ताळलेले होते. त्याच्या बरोबर त्याचे दोस्त राजेसुद्धा उठून जातात. त्या परतणाऱ्या राजांना तो हुकून करतो कीं, आज पुष्य नक्षत्र उगवत आहे तेव्हां लढण्यासाठी कुरूक्षेत्री कुच करू. त्याच्या कर्माने बंद झालेले ते राजे त्यांच्या सैन्यांना तसे करण्यास आज्ञा करतात व त्यांच्या सेना त्याप्रमाणें कुच करण्याची तयारी करतात. भिष्माला कौरवांच्या सैन्याचे सरसेनापती केले जाते. कौरवांचे सैन्य निघते. त्यांच्या अग्रणी भिष्म असतात. त्यांचा ध्वज मोठ्या दिमाखाने पडकत असतो. हे पहाता, राजा, युद्ध टाळण्याचे सगळे प्रयत्न निष्फल झाले. भिष्म, द्रोण, गांधारी, धृतराष्ट्र, विदूर सगळयांचे प्रयत्न विफल झाले होते, युद्ध होणार हे निश्चित झाले होते. जेव्हां दुर्योधन ऐकत नाही असे मी पाहिले मी त्याच्या राजांत दुफळी माजवण्याचा प्रयत्न करू लागलो. परंतु, भयंकर अशुभ लक्षणं दिसू लागली होती. त्या मार्गाने मी पुन्हा समेटाचा प्रयत्न करत होतो. मी साम दाम मार्ग अजमावून पाहिले. मी सुचवले कीं पांडव भिष्म, विदूर आणि धृतराष्ट्र ह्यांच्या आज्ञेत राहून त्यांचे राज्य करतील, फक्त पांच गांव पांडवांना द्या. जी ते मांगतील. तरी तो तेसुद्धा मानायला तयार नव्हता. शेवटी मी समजलो कीं, त्या पापमय कौरवांचा नाश करण्याशिवाय दुसरा मार्ग उरलेला नाही. कौरवांची सेना आधीच कुरूक्षेत्री निघाली आहे. असें सगळे झाले जे मी जसे झाले तसे तुम्हाला सांगितले आहे. जगाचा विनाश अटळ आहे.

सैन्य निरयन पर्व भाग एकशे पन्नासावा संपला.

# सैन्य निरयन पर्व

## भाग एकशे एकावन्नावा

वैशंपायन पुढे सांगतात, "कृष्णाचे ते बोलणे ऐकल्यावर युधिष्ठीर त्याच्या भावंडांना एकत्र बोलावतो व कृष्णा समोरच सांगतो, "तुम्ही सभेत जे झाले त्याचा वृत्तांत ऐकला आहे. कृष्णाचे बोलणेसुद्धा तुम्ही समजला अहात. तेव्हां मर्दानो, आता युद्धाच्या तयारीत निघण्यास सुरूवात करा. आपल्याकडे सात अक्षौहिणी सैन्य आहे. ते सगळे जमा करा. ते द्रुपदाचे, विराटाचे, दृष्टद्युम्न, शिखंडी, सत्यकी, चेकितन, भिमसेन ह्यांचे आहेत. ते त्यांच्या फौजांचे नेतृत्व करतील. ते सगळे वेदाचे अभ्यासक आहेत. त्यांच्या शौर्याची काय बात. नम्रपणा, व्रतस्थता, नितीमत्ता ह्यात ते बिनतोड आहेत. युद्ध कौशल्यात अतुलनीय आहेत. त्यानंतर सहदेवाकडे पाहून तो विचारतो, अरे सहदेवा, तू सांग कोणता योद्धा कोठल्या शस्त्रात तरबेज आहे. त्या नुसार कोण कोणत्या फौजेचे सेनापती पद घेईल ते ठरेल. भिष्माशी कोण लढेल तेसुद्धा पहा. तुझे मत सांग. कोण सरसेनापती होण्यास योग्य आहे ते सुद्धा ठरवावे लागेल".

सहदेव सांगतो, "जो सगळ्या प्रकारच्या शस्त्रांच्या वापरात निष्णात आहे तो माझ्यामते सरसेनापती झाला पाहिजे". तो पुढे सांगतो, "आपल्या बद्दल सहानुभूती असलेले, युद्धात कुशल असलेले, मत्स्य देशाचे राजे विराट जे भिष्माला तोंड देण्यास समर्थ आहेत ते सरसेनापती झाले पाहिजेत".

वैशंपायन पुढे सांगतात, सहदेवाचे मत समजल्यावर बोलण्यात चतूर असलेला नकूल उठतो व सांगतो, "ज्याचे धर्मग्रंथाचे ज्ञान पूर्ण आहे, उच्चकुलीन आहे, प्रतिष्ठीत आहे, नम्र आहे, शक्तिमान आहे, समृद्ध आहे, अनेक शास्त्रांचा अभ्यास आहे, ज्याने शस्त्रविज्ञानाचे भारद्वजाकडून शिक्षण घेतले आहे, जो सत्यवादी आहे, ज्यांनी सदैव द्रौणाचार्यांना व भिष्माना आव्हान दिले आहे, जो उच्च राजघराण्याचा आहे, ज्याच्या कुटूंबाचा विस्तार एकाद्या वडाच्या झाडासारखा आहे, ज्यांने त्याच्या पत्नीबरोबर यज्ञ केला द्रोणाचार्यांच्या नाशासाठी, जे आपल्यावर पुत्रवत प्रेम करत आहेत, ते आमचे श्वशूर आहेत, असें महारथी द्रुपद, आपले सरसेनापती असावेत असें माझे मत आहे. ते दैवी आयुधात तरबेज आहेत".

अशारितीने माद्रीचे दोन पुत्र बोलल्यानंतर वासवाचा मुलगा सव्यसाची उठतो त्याचे विचार सांगण्यासाठी, "तो दैवी पुरूष ज्याचा वर्ण अग्नीसारखा आहे, ज्याच्या अंगात प्रचंड बळ आहे, ज्याची तपस्या थोर आहे, ज्याने अनेक ऋषींची कृपा संपादन केली आहे, ज्याचा जन्म यज्ञकुंडातून झाला आहे, ज्याच्या रथाच्या आवाजांने नभ दुमदुमून उठते, सिंहांसारखी ज्याची ताकद आहे, ज्याचे खांदे भक्कम आहेत, जो दिसायला सुंदर आहे, ज्याचे डोळे मोठे आहेत, ज्याची

चाल हत्तीसारखी रुबाबदार आहे. ज्याचा आवाज सिंहासारखा आहे, ज्याच्यावर कोणतेही शस्त्र वार करू शकत नाही, असा दृष्टद्युम्न ज्याचा जन्म द्रोणाचा वध करण्यासाठीच झाला आहे, तो भिष्माला तोंड देण्यासाठी योग्य आहे. भिष्माचे बाण जे विजेच्या धक्क्यासारखे येतात, नागासारखे दिसतात, जे यमाचे संदेशक आहेत, ज्यांच्यातील आगीने सगळे भस्मसात होते, ज्यांचा वापर आधी रामानें केली होता. ते दृष्टद्युम्न झेलू शकेल. ह्याबद्दल मला खात्री आहे. असा योद्धा सरसेनापती होण्यासाठी योग्य आहे".

आता भिम उठतो व त्याचे मत सांगतो, "द्रुपदाचा मुलगा शिखंडी ज्याचा जन्म भिष्माचा वध करण्यासाठी झाला आहे, अहो राजन, ऋषी व साध्य सांगतात त्याप्रमाणे, दैवी आयुध तो चालवू शकतो. ज्याची युद्धकला रामाची आठवण आणणारी आहे, त्याला कोणी ठार मारू शकेल असें वाटत नाही. शिखंडीशिवाय इतर कोणीही भिष्माला मारू शकणार नाही. म्हणून तो सरसेनापती व्हावा असें मला वाटते".

युधिष्ठीर बोलतो त्यांची मते ऐकल्यावर, "कोणाची काय ताकद आहे व कोणाचे काय कमी आहे ते सगळे कृष्ण चांगलेच ओळखतो. त्याचे ज्ञान युद्ध कलेचे अप्रतिम आहे, तो माझ्यामते सरसेनापती पदासाठी योग्य आहे. आपल्या यशाचे गमकसुद्धा तोंच आहे. त्याच्यात आपला जीव आहे, तोंच सगळयांचा कर्ता करविता आहे". त्यानंतर तो बोलतो आता रात्र वाढत आहे तरी आता रजा घेऊ आणि उद्या सकाळी आपल्या शस्त्रांची फुलांनी व सुगंधी द्रव्याने पुजा करून मग पुढच्या मोहीमेसाठी कुच करू असें तो सांगतो.

वैशंपायन पुढे सांगतात, युधिष्ठीराचे ते बोलणे ऐकल्यावर कृष्ण धनंजयाकडे पहात सांगतो, "मी त्या सगळया नावांचे समर्थन करतो जे सरसेनापती पदासाठी सुचवले गेले आहेत. ते सगळेच शत्रूचा नाश करण्यासाठी सारखेच समर्थ आहेत. ते इंद्राला सुद्धा घाबरवतील असें आहेत. दुर्योधनाचा ते सहज पराभव करतील. तसे झाले म्हणजे आपण सत्याच्या ऋणातून मुक्त होऊ. मी तुझ्या सांगण्यावरून युद्ध न व्हावे म्हणून प्रयत्न केले त्यामुळे आपण युद्धाच्या दोषापासून मुक्त झालो आहोत, कोणीही आपल्याला त्या कारणावरून दोषी ठरवू शकणार नाही. तो मूर्ख दुर्योधन स्वताला मोठा योद्धा समजतो प्रत्यक्षात तो फार कमजोर आहे. जेव्हां युद्ध प्रारंभ होईल, त्याचे सैन्य फारकाळ तग धरू शकणार नाही हे निश्चित. धनंजय, युयुधन, अभिमन्यू, द्रौपदीची मुलं, विराटाचे सैन्य, ह्या आपल्या ताकदीपुढे ते शरण जातील ह्यात शंका नाही. आता सांगतो आपला सरसेनापती असेल दृष्टद्युम्न ज्याचे नांव अर्जुनाने सुचवले आहे.

सैन्य निरयन पर्व भाग एकशे एकावन्नावा समपला.

## सैन्य निरयन पर्व

## भाग एकशे बावन्नावा

वैशंपायन पुढे सांगतात, कृष्णाने दृष्टद्युम्नाचे नांव जाहीर केल्यावर सगळया सैन्याने त्याचे स्वागत केले व एकच जल्लोष झाला. ते सैन्य रणभूमीच्या दिशेने वेगांने निघाले. घोड्यांचे खिंखाळणे, हत्तींचे चित्कार सैनिकांचे ओरडणे, रथांच्या चाकांचा खडखडाट असें आवाज सगळीकडे ऐकू येत होता. त्याशिवाय नगारे, ढोलकी, तुताऱ्या, शंखू वाजवले जात होते. पाईकांच्या तालबद्ध चालण्याचे आवाज त्यात भर घालत होते. सैनिकांचे पोषाख असें होतके कीं, त्यांच्या तालबद्ध चालण्यामुळें गंगेचा प्रवाह पुढे सरकत आहे असेंच वाटत होते. त्यात आघाडीला भिमसेन त्यांच्या फौजेनिशी जात होता. माद्रीची मुलं आणि सुभद्रेचा मुलगा त्यांच्या चिलखतात रुबाबदार दिसत होते. द्रौपदीची पांच मुलं दृष्टद्युम्न, प्रभाद्रक, पांचाल, भिमसेनाच्या मागून जात होते. त्यांचा उत्साह विलक्षण होता. तो गदारोळ आकाशापर्यंत पोहोचला होता. युधिष्ठीर त्याच्या कडे सामानाच्या गाड्या घेऊन जात होता. त्यात सैन्याचा दाणागोटा, औषधी, जनावरांचे खाद्य, इतर आवश्यक गोष्टींचा समावेश होता. ते गाडे बैल, रेडे खेचत होते. कांहीं गाड्यात वैद्य, शल्यविशारद असें कामाचे लोक बसलेले होते. व्रतस्थ अशी द्रौपदी व इतर स्त्रिया उपप्लव्यातच राहील्या. त्यांच्या संरक्षणासाठी शूरवीर योद्ध्यांची एक कुमुक सज्ज होती. पांडव ब्राह्मणांना गायांचे व सोन्याचे दान करून त्यांचे आशिर्वाद घेऊन निघाले होते. ब्राह्मण पांडवांच्यासाठी वेदातील कवनं गात व त्यांच्यासाठी प्रार्थना करत चालत होते. पांडवांच्या अंगावर दागिने होते, केकयाचा राजपुत्र, दृष्टकेतू, काशीचा राजपुत्र, श्रीनेमी, वासुदन, शिखंडी त्यांच्या चिलखतात रुबाबात चालत होते. ते असे चालत होते कीं, ते युधिष्ठीराचा संरक्षण गेत होते. त्या मागून राजा विराट, यज्ञसेनाचा मुलगा, शुशर्मन, कुंतीभोज, दृष्टद्युम्नाचा मुलगा त्यांच्या बरोबर चाळीस हजार गाड्या, घोडदळ, हत्तीदळ असें चालत होते. अनंध्रीष्टी आणि चेकीतन, दृष्टकेतू, सत्यकी, कृष्णाला मध्ये घेऊन चालत होते. ते अशारितीने कुरुक्षेत्री पोहोचतात. तेथे पोहोचताच ते शंखनाद करतात. वासुदेव आणि धनंजय त्यांचे शंख वाजवतात. पांचजन्याचा आवाज ढगांच्या गडगडाटासारखा होता. त्या आवाजाने पांडवांच्या सैन्यात एक वेगळा जोम येतो. त्यांच्या अनेक आवाजाने आकाश दणाणून निघते.

सैन्य निरयन पर्व भाग एकशे बावन्नावा संपला.

# सैन्य निरयन पर्व

## भाग एकशे त्रेपन्नावा

वैशंपायन पुढे सांगतात, युधिष्ठीराचे लष्कर तेथे असलेल्या एका विस्तीर्ण मैदानात जेथे जमीन सपाट होती तेथे उतरते. तेथे स्मशान, देवळे, देवतांची स्थानं, साधूंचे आश्रम आणि इतर पवित्र जागा नव्हत्या ह्यांची खबरदारी घेतली होती. जनावरांना दाणापाणी दिल्यानंतर तो त्याच्या अनेक राजांबरोबर बसला होता. त्याच्या बरोबर केशव सुद्धा बसला होता. त्यानंतर ते उठले व धृतराष्ट्राच्या छावणीची पहाणी करण्यासाठी निघाले. दृष्टद्युम्न आणि सत्यकी त्यांची छावणी टाकण्यासाठी तेथील जागेची पहाणी करू लागतात. ते पवित्र नदी हिरांवती जी कुरुक्षेत्रातून जात असते तेथे पोहोचतात. ती पाण्याने भरून पहात होती. ती नदी एक उत्तम तीर्थक्षेत्र म्हणून समजली जात होती. केशव त्यातून एक पाट काढतो व त्याच्या संरक्षणासाठी कांहीं सैनिक तैनात ठेवतो. तेथे पांडव आणि त्यांच्यादोस्त राजांसाठी तंबू टाकले जातात. असे ते तयार केलेले होते कीं, त्यांच्यावर कोणी हल्ला करू शकणार नाही. त्या तंबूमध्ये अंतर ठेवले होते. ते तंबू प्रशस्त राजवाड्यासारखे वाटत होते. त्यात सगळया आवश्यक गोष्टींचा साठा होता. असंख्य कारागिर त्या कामात गुंतले होते. त्याशिवाय इतर सगळया प्रकारचे तज्ज्ञ तेथे आले होते. त्यांना हवे असलेले सगळे तेथे उपलब्ध होते. युधिष्ठीराने तेथे सैनिकांना लढण्यासाठा लागणाऱ्या विविध शस्त्रांचा विपुल साठा ठिकठिकाणी तयार ठेवला होता. त्या धनुष्य, बाण, भाते, भाले, तलवारी, शत्रुघ्न, दाणपट्टे, गदा, काटेरी गदा, चिलखतं, जिरोटोप, वगैरे होते. त्याशिवाय मध, लोणी, पाणी, जनावरांचा चारा, लाख असें ठेवलेले होते. जनावरांची संरक्षक आवरणं त्यांचा मोठा साठा तयार ठेवलेला होता. पांडव त्यांच्या दोस्तांबरोबर छावणी टाकून तयार झालेले आहेत ही वार्ता समजल्यावर त्यांचे इतर दोस्त राजेसुद्धा तेथे जाण्यासाठी निघाले. ब्रह्मचर्य पाळणारे व्रतस्थ असें ते सोम पिऊन ब्राह्मणांना मोठ्या भेटी देत होते. ते पांडवांच्या यशासाठी दुवा करत होते.

सैन्य निरयन पर्व भाग एकशे त्रेपन्नावा संपला.

# सैन्य निरयन पर्व

## भाग एकशे चौपन्नावा

जनमेजय विचारतो, "युधिष्ठीराची सैन्याची तयारी कुरूक्षेत्रात होत असलेली दुर्योधनाला समजल्यावर त्याची कोणती प्रतिक्रीया झाली, ज्यामध्ये वासुदेवाच्या संरक्षणाखाली राजा विराट, द्रुपद, केकया, वृश्नी आणि इतर मित्र राजे ह्यांच्या सेना एकवटलेल्या होत्या. जसे इंद्राभोवती आदित्य जमले आहेत. मला ते ऐकण्याची उत्सुकता आहे. त्या दोघांच्या सगळया हालचाली मला समजून घ्यावयाच्या आहेत. कुरुजंगलात काय होत होते तेसुद्धा सांगा".

वैशंपायन बोलतात, वासुदेव कौरवांच्या सभेतून निघून गेल्यावर तो दुर्योधन कर्ण, शकूनी, दुःशासन ह्यांना उद्देशून बोलला, "केशव आता पांडवांच्याकडे गेला आहे, त्याचा उद्देश आपण निष्फळ केला आहे. पांडव आणि आपल्यात युद्ध होणार असें तो धरून चालत आहे. भिमसेन आणि अर्जुन त्याच्याच विचारांचे आहेत. युधिष्ठीर व त्याचे भाऊ ह्यांना मी फार सतावले आहे. मी विराट आणि द्रुपदाशी सुद्धा वैर केले आहे. ते दोघे पांडवांना सामील होणार आहेत. त्यामुळें जे युद्ध होईल ते महाभयंकर असें होणार आहे. तेव्हां आता आळस झटकून आपल्याला त्यांच्या बरोबर लढण्याची तयारी कली पाहिजे. आपल्या मित्र राजांना त्यांच्या सेना घेऊन कुरूक्षेत्री प्रयाण करण्याचे आदेश दिले गेले पाहिजेत. त्यांचे तंबू अजस्र असें व शत्रूला शिरता येणार नाही असें असले पाहिजेत. त्यात सगळा दाणागोटा व इतर आवश्यक सामुग्री भरलेली अळसी पाहिजे. त्या सामुग्रीचा पुरवठा अखंडपणे चालू राहिल असें पहा. शत्रूपक्षाला त्यात अडथळा आणता येणार नाही ह्यांची दक्षता बाळगली पाहिजे. आपल्या छावण्या पाण्याच्या पुरवठ्या जवळ असल्या पाहिजेत.

शत्रूचे सैन्य आपल्या भागातून जाणार आहे तरी ते रस्ते चांगले आहेत असें पहा. ताबडतोब जाहीर करा कीं, आपल्या फौजा उद्या कुरूक्षेत्राकडे रवाना होणार आहेत". ते ऐकल्यावर ते तसे होईल असें आश्र्वासन देतात. दुसऱ्या दिवशी त्या आज्ञेप्रमाणे सगळी व्यवस्था होते व ते निघण्याच्या तयारीत होतात. त्यांचे रथ, घोडे सगळे तयार केले जातात. स्वताला चंदनाचे गंध लावून व दागदागिने घालून ते सज्ज होतात, अंगावर चिलथत, डोक्यावर जिरोटोप घालतात. त्यांची विविध दल, जसे घोडदळ, हत्तीदळ, पायदळ तयार होतात. त्यांचे सैनिकसुद्धा त्याच प्रकारची त्यांची तयारी करू लागतात. विविध शस्त्र, युद्दाची इतर सामुग्री ते गोळा करतात. हस्तिनापुर लढण्याच्या उत्साहाने भरलेली अशी दिसते. वैशंपायन पुढे सांगतात, अरे राजा जनमेजया, ते शहर सैनिकांनी भरलेले होते. शंखनाद, तुताऱ्या वाजू लागतात. हत्तींचे चित्कार, घोड्यांचे खिंकाळणे ह्यांने आसमंत भरून निघालेले होते. त्यांचे सैनिक सज्ज होऊन कुरूक्षेत्री

जाण्याच्या तयारीत असतात. कांहीं त्यांच्या शस्त्रांना धार लावत असतात. कांहीं त्यांची आयुध तपासत असतात.

सैन्य निरयन पर्व भाग एकशे चौपन्नावा संपला.

# सैन्य निरयन पर्व

## भाग एकशे पंचावन्नावा

वैशंपायन पुढे सांगतात, वासुदेवाचे तो बोलणे आठवून युधिष्ठीर त्याला बोलतो, "अहो केशवा, तो नीच दुर्योधन असं कसे बोलला, ह्या परिस्थितीत आपण काय केले पाहिजे"? आपले कर्तव्य पार पाडण्यासाठी मी कोणती भूमिका घेतली पाहिजे. तू सगळयांचे बोलणे ऐकले आहेस. त्यात दुर्योधन, कर्ण, शकूनी ह्यांचे काय विचार आहेत ते तू जाणतोस. त्याच प्रमाणे, भिष्म, विदूर, गांधारी काय बोलली तेसुद्धा तू ऐकले आहेस. त्यावर आमची माता कुंतीचे काय विचार आहेत तेसुद्धा तू स्वतः ऐकले आहेस. तुला आमचे विचार काय आहेत तेसुद्धा तू ओळखतोस. तेव्हां ह्या सगळयांचा सारासार विचार करून तू सांग मी काय करावे".

युधिष्ठीराचे ते उद्गार ऐकल्यावर कृष्ण उत्तर देतो. त्याचा आवाज घीरगंभीर होता. फसवणूक करण्यातच ज्याचे जीवन व्यतीत होत आहे अशा त्या दुर्योधनाच्यात माझ्या चांगल्या विचारांचा कांहींच परिणाम झालेला दिसला नाही. तो भिष्मांचे व द्रोणांचे कांहींच ऐकत नव्हता, त्याच्या आईचेसुद्धा तो ऐकत नव्हता. त्याला पुण्य व हिताचा विचार नव्हता. फक्त स्वताचे खरे करावयाचे एवढे एकच तो करू इच्छित होता. त्याला खात्री वाटते कीं, त्या एका कर्णाच्या जोरावर तो पांडवांना सहजपणे पराजित करू शकेल. त्याभर्मात तो असल्याचे जाणवत होते. त्याचा माज एवढा झाला आहे कीं, त्याने मला कैद करण्याचा घाट रचला होता. परंतु, ते त्याला करता येण्यासारखे नव्हते. मी त्याच्या समोरून बाहेर पडलो. त्याच्या त्या प्रयत्नावर भिष्म किंवा द्रोण कांहीं बोलले नाहीत. एक विदूर सोडला तर बाकी सगळे त्याच्या तालावर नाचत आहेत असें दिसत होते. अगदी भिष्म, द्रोण, कृपा, सोमदत्त, वल्हीक, अश्वत्थामा असें सगळे त्याच्या आज्ञेत असल्याचे मला आढळले. असा परिस्थितीत त्या मूर्खाने काय विचार मांडले ते मी तुला पुन्हा कशासाठी सांगू. इतके सांगितले ते तुझ्यासाठी पुरेसे नाही कां"? ते थोडक्यात सांगावयाचे म्हणजे त्याची चांडाळचौकडी त्याच्या मनात पांडवांबद्दल खोटे नाटे सांगत होते. तेथे जमलेले त्याचे दोस्त राजेसुद्धा तुमच्याबद्दल चांगले बोलत नव्हते". कृष्ण त्यानंतर खबीरपणे सांगतो कीं, "त्यांच्या तालावर नांचणे आपल्याला शोभणार नाही, आणि कोणत्याही परिस्थितीत त्यांना तुमचा हिस्सा व तुमचे राज्य गिळंकृत करण्यास द्यावयाचे नाही. हे निश्चित".

वैशंपायन पुढे सांगतात, वासुदेवाचे ते खंबीर उद्गार ऐकल्यावर तेथे जमलेले राजे युधिष्ठीराच्या तोंडाकडे पाहू लागतात. युधिष्ठीर समजतो कीं, आता आणखीन लाचारी करण्यात अर्थ नाही व आदेश देतो कीं, त्यांच्या लष्कराने युद्धाच्या तयारीला लागावे. ती आज्ञा झाल्यावर पांडवांच्या फौजांतून मोठा आवाज ऐकू आला त्यात क्षत्रियांचे आनंदाने ओरडणे चालू झाले. युधिष्ठीर मात्र भविष्यात जो निष्पाप लोकांचा संहार होणार होता त्या विचाराने कष्टी झाला

होता व जोरा जोराने श्र्वास घेऊ लागला. तो भिमाला व अर्जुनाला बोलतो, "जे होऊ नये म्हणून मी अरण्यात जाणे पसंत केले ते संकट अखेरीस मी टाळू शकलो नाही. आपले कांही चुकले नसतांना आपल्यावर अशी पाळी येत आहे ह्याचे मला वैषम्य वाटते. विनाकारण मोठ्या प्रमाणात संहार होणार आहे. आपल्या आदरणीय पितामहाशी, गुरूशी, शिक्षकांशी आणि अश्र्वत्थामाशी आपण कसे दोन हात करणार त्या विचारांने मन विव्हल होत आहे. त्यांच्यात अनेक आपले मित्र आहेत ज्यांच्या बरोबर आपली नाती जुळली आहेत त्यांना आम्हाला कंठस्नान घालावे लागणार ह्या विचारांनी मी अस्वस्थ झालो आहे. त्या सगळयाना मारून असें कोणते यश आम्ही मिळवणार आहोत"? आपल्या ज्येष्ठ भावाचे ते भावूक होऊन काढलेले उद्गार ऐकून अर्जुनाला कृष्णाचे ते बोलणे आठवते. ते तो सांगतो, "कुंती आणि विदूरांनी जे सांगितले त्याचा तुला विसर पडला आहे कां? आपली माता व विदूर काका असें कांहींही सांगणार नाहीत आपल्याला करावयाला ज्यात पाप आहे. त्याच प्रमाणे आपल्याला आता दुसरा पर्याय नाही, आपल्यासाठी क्षत्रिय धर्मानुसार लढणे हेंच क्रमप्राप्त आहे. मृत्यू अनिवार्य आहे, तो कारणांनी अथवा विनाकारण असा कसाही येऊ शकतो ते निसर्गाच्या क्रमाने होत असते व त्याबद्दल विचार करणे हे अहंकाराचे कारण समजले जाते. क्षत्रियांने "मी मारले", असे समजून हत्या करावयाची नसते. जसें खाटीक पशु मारतो तसे मारत जावयाचे असते. तशा हत्येत पाप नसते. म्हणून तसा विचार करावयाचा नसतो. ते त्यांचे बोलणे झाल्यावर पांडवांनी युद्ध करण्याचा त्यांचा निर्णय पक्का केला. त्यानंतर ते त्यांच्या सैनिकात जाऊन त्याचा वेळ मजेत घालवू लागले.

सैन्य निरयन पर्व भाग एकशे पंचावन्नावा संपला.

# सैन्य निरयन पर्व

## भाग एकशे छप्पन्नावा

वैशंपायन पुढे सांगतात, ती रात्र तशी जाते. राजा दुर्योधन त्याच्या दिमतीला असलेले अकरा अक्षौहीणी सैन्याची विभागणी करण्यास सुरूवात करतो. पायदल, हत्तीदल, घोडदल, रथदल, गाड्यांचे ताफे, असें सगळे तो क्रमाने वाचून देतो. त्यात उच्च दर्जाचे, मध्यम दर्जाचे व कनिष्ठ दर्जाचे असें भाग तो करतो. त्याच्या रथांच्या दुरूस्तीसाठी भरहून लाकुडफाटा तो तयार ठेवतो. मोठ्या तोफां सारखे भाते तो त्या प्रकारच्या गाड्यांवर योजतो. काटरी भाले, घोड्यांच्या पाठीवर मोठे भाते भाणांनी भरलेले ठेवलेले असतात. हत्तीवरून फेकण्याचे लांबच्या पल्ल्याचे अग्नीबाण योजले जातात. पायदलाकडे लाकडी गदा दिल्या जातात. रथांतून मोठी धनुष्ये अडकवली जातात ज्यांच्या मदतीने मोठे बाण फोकले जातात. रथांवर व गाड्यांवर ध्वजांचे स्तंभ उभे केले जातात. त्यावर त्या त्या फौजेचे ध्वज लावले जातात. सैनिकांचे चिलखतं, जिरोटोप, हातमोजे असें सगळे तयार छेवले जातात. काटे असलेले दांडके जवळून मारामारी करण्यासाठी असतात. त्याशिवाय लहान मोठ्या कुर्हाडी, फरशा तयार केल्या जातात. विषारी बाण, मोठे सामान हलवण्यासाठी लागणाऱ्या याऱ्या तयार केल्या जातात. घोड्यांची चिलखतं, हत्तीवरील चिलखतं त्यांच्यावर बसवली जातात. लाकडी काटे गाड्यांच्या चाकांना बसवले जातात ज्यामुळें प्रतिस्पर्धीच्या गाडीवानाला पाडता येते. दुर्योधनाची फौज मोठी रुबाबदार दिसत होती. त्या सैनिकांचे कपडे रत्नजडीत होते. चांगल्या कुळातील तरबेज सैनिक त्यांचे रथ चालवण्यासाठी ठेवलेले असतात. घोड्यांच्या लगामींना लहान घंटा लावलेल्या असतात. रथांवर ध्वज दिमाखाने फडकत असतात. प्रत्येक सैनिक शस्त्रांनी सज्ज होता. त्यांच्याकडे भाले, बरच्या, तलवारी, खंजीर असें सगळे होते. अनेक धनुष्य असलेले गाडे होते त्यावरून एकाहून जास्त योद्धा बाण मारू शकत होते. त्याशिवाय मोठे शत्रूघ्न यंत्र गाड्यांवर बसवलेली होती. प्रत्येक गाडी चार घोडे खेचत होते. रथ चालवणारे सुद्धा तरबेज योद्धे होते. त्यांच्या हत्तीच्या पांघरण्याला घंटा लावल्या होत्या. हत्तीवरील अंबारीत सात वीर बसू शकत होते. ते चौफेर नजर ठेवून हलाला करू शकत होते. घोडदलात बहादूर स्वार तयार होते. त्यांची संख्या कित्येक हजारात होती. त्या घोड्यावरील आवरण रत्नजडीत होती. त्यांची संख्या कित्येक हजारात होती. पायदलातील सैनिक विविध जाती जमातीचे होते. प्रत्येक एका हत्ता बरोबर दहा घोडेस्वार होते व प्रत्येक घोडेस्वाराबरोबर दहा पायी सैनिक होते. त्याशिवाय राखीव फौजा वेगण्या होत्या. राखीव फौजेत प्रत्येक एका हत्तीबरोबर शंभर घोडेस्वार व त्या प्रत्येक घोडेस्वाराबरोबर सात पाईक होते. पांचशे रथ,त्याबरोबर तितकेच हत्ती, पंधराशे घोडेस्वार, दोनहजार पांचशे पाईक अशी एक सेना होत होती. अशा दहा सेनीची एक प्रतीन, दहा प्रतीनांची एक वाहीनी, असें असले तरी ते शब्द एकाच अर्थानेसुद्धा वापरले जात होते. त्याशिवाय ध्वजनी, चमू अशा सुद्धा फौजा होत्या. अशारितीने

कौरवांचे सैन्य उभे केलेले होते. दोनहा पक्षांचे मिळून अठरा अक्षौहीणी क्षत्रिय लढण्यासाठी एकत्र जमले होते. तेवढे परिवार त्या युद्धामुळें नष्ट होणार असतात त्यांचेच युधिष्ठीराला दुःख होत होते, पण त्याला त्याचा कांहीं इलाज नव्हता. दोनशेपंन्नास योद्धे मिळून एक पट्टी होते, तीन पट्टांची सेनामुख, किंवा कुल्म, तीन कुल्माचे एक काण. असे कौरवांचे लष्कर होते. ते सगळे लढण्यासाठी शिकवलेले होते. आणि लढण्यासाठी तयार होते. दुर्योधनाने चांगले तरबेज योद्धे बोलावलेले होते. त्यांचे मार्गदर्शन कृप, द्रोण, सल्य जयद्रथ, सुदक्षिण कंबोजचा राजा, कृतवर्मन, अश्र्वत्थामा, कर्ण, भुरीश्रव, शकूनी आणि वल्हीक त्या सैन्याचे नियंत्रण करणार होते. ते सेनानी त्या सैनिकांना दररोज बोलावून त्यांच्याकडून कवायत करून घेत होते व शिकवत होते. ते सगळे सैनिक त्यांच्या राजासाठी त्यांची जान देण्यासाठी कुरुक्षेत्री आले होते जसे बळीचे पशु यज्ञाच्या वेदीकडे आणले जातात.

सैन्य निरयन पर्व भाग एकशे छप्पन्नावा संपला.

# सैन्य निरयन पर्व

## भाग एकशे सत्तावन्नावा

वैशंपायन पुढे सांगतात, धृतराष्ट्राचा मुलगा तेथे जमलेल्या त्याच्या दोस्त राजांसमक्ष भिष्माला हात जोडून बोलतो, "अहो शंतनु पुत्र, सरसेनापतीशिवाय मोठे सैन्यसुद्धा हरते. दोन माणसांचे एकमत क्वचित होते. निरनिराळे सेनानी एकमेकांच्या विरुद्ध आदेश देऊ शकतात. ते त्यांच्या ताकदीचे स्वाभिमानी असतात. त्यामुळें सैन्याचा नाश होत असतो. आपण सूज्ञ अहात. आम्ही असें ऐकतो कीं एकेकाळी ब्राह्मण, वैश्य आणि शुद्र एकत्र आले व त्यांनी मिळून हैहय वंशाच्या क्षत्रियांशी युद्ध छेडले. त्यात त्यांचा पराभव झाला. त्याचे कारण काय असावे ह्याचा शोध ब्राह्मण घेतात. त्यांना समजते कीं, त्यांच्या तीन वर्णाचे तीन सेनानी होते व त्यांच्यात कधी एकमत होत नव्हते. त्यामुळे त्यांच्यात वाद होत होते. त्या उलट क्षत्रियांचा एकच सेनानी होता व ते त्याच्या आज्ञेचे पालन करत होते त्यामुळें त्यांची ताकद मजबूत होती. एक नेता एकजूट असें क्षत्रियांचे होते. ते समजल्यावर ब्राह्मणांनी एका हुशार माणसाला त्यांचा नेता म्हणून नेमले, त्यानंतर तेंच धोरण झाले कीं, कोणत्याही युद्धात नेता एकच असला पाहिजे. ज्यांचे त्याच्याशी पटत नाही ते त्यात सामील होणार नाहीत. आपण उशनसाच्या योग्यतेचे अहात. आपण सदैव माझे हित पहात आला अहात. म्हणून मी आपल्याला आमच्या सैन्याचे सरसेनापती म्हणून नेमत आहे. जसे ताऱ्यात सूर्य, वसुंमध्ये हव्यवह, देवांत कुमार तसे आपण आमच्यात अहात. तुमच्या आज्ञेत माझे सैन्य युद्ध करील".

त्यावर भिष्म बोलतात, "अरे राजा, तसे होईल कारण मी तसें तुला आधीच वचन दिले आहे. परंतु, पांडवांना कोणीही मारू शकणार नाहीत तसेंच ते मला तुझ्या इतकेंच प्रिय आहेत म्हणून मी त्यांना मारणार नाही. परंतु, दर दिवशी दहाहजार इतर क्षत्रियांना कंठस्नान घालीन. धनंजय सर्व आयुधांचा जाणकार असला तरी तोसुद्धा माझ्याशी लढणार नाही. माझ्या आयुधांच्या जोरावर मी सगळे देव, राक्षस, असुर, यक्ष आणि गंधर्व तीन वेळा नष्ट करू शकतो. पण पांडवांचा नाश मी कधीच करणार नाही. परंतु जर ते क्षत्रिय मला ठार मारू शकले तरच माझे त्यांना मारणे थांबेल असें मी तुला आश्र्वासन देत आहे. आणखीन एक सांगतो, हा कर्ण माझे ऐकणार नाही व मी त्याचे. तो स्वताला फार शहाणा समजतो. आमच्यात मेळ होणे शक्य नाही. आमच्यापैकी कोण एकच लढेल ह्या युद्धात. जर मी सरसेनापती असेन तर तो लढणार नाही कारण तो माझ्या आज्ञा मानणार नाही व जर तो सेनापती असेल तर मी लढणार नाही. मी जर मेलो तर तो लढण्यासाठी येईल नाहीतर नाही". कर्ण बोलतो, "जोवर गंगापुत्र सेनानी आहे मी लढणार नाही. तो मेला तर मी शस्त्र हातात घेईन ह्या युद्धासाठी. परंतु, मी फक्त धनंजयाशीच लढेन, इतर क्षत्रियांशी नाही. कारण तसें मी कुंतीमातेला आश्र्वासन दिले आहे". ते संभाषण झाल्यावर दुर्योधन

भिष्माला त्याच्या सैन्याचे सरसेनापतीपद देतो. दुर्योधनाच्या आदेशांनी त्यानंतर रणवाद्ये वाजवली जातात. सैनिक ओरडून भिष्माचे स्वागत करतात. त्या छावणीतील जनावरसुद्धा ओरडू लागतात. जरी आकाश निरभ्र होते तरी रक्ताच्या पाण्याचा पाऊस पडू लागतो. वादळी वारे वाहू लागतात. पृथ्वी हादरू लागते. अशनि पडतात. कोल्हे व लांडगे ओरडू लागतात. ही सगळी लवकरच येणाऱ्या संकटाची नांदी होती. भिष्माची नेमणूक होतांना इतर राजे तेथे उपस्थित होते. सगळे सैन्य भिष्माला अभिवादन करते. त्यावेळी भिष्माला मोठी मोठी दानं दिली जातात. ब्राह्मण त्यांची स्तुती करणारी कवन गाऊ लागतात. अशा रितीने भिष्म कुरूक्षेत्री कुच करतो त्याच्या मागून दुर्योधन व त्यांचे बंधू जात असतात. कुरु राजा कर्णाबरोबर त्या रणभूमीची पहाणी करतो. सपाट जागा पाहून ते तेथे छावणी टाकण्याचे ठरवतात. तेथे एका सुपीक जागी ते दुसरी हस्तिनापुर उभे करतात.

सैन्य निरयन पर्व भाग एकशे सत्तावन्न संपला.

# सैन्य निरयन पर्व

## भाग अठ्ठावन्न

जनमेजय राजा विचारतो, "जेव्हां युधिष्ठीराला समजते कीं, भिष्मांची नेमणूक त्यांच्या मृत्यू पर्यंत कौरवांच्या सैन्याच्या सरसेनापतीपदी झाली आहे तेव्हां तो काय बोलला, अर्जुन काय बोलला व भिम काय बोलला, कृष्ण काय बोलला ते सगळे सांगा".

वैशंपायन सांगू लागतात, ती वार्ता जेव्हां पांडवांना मिळाली, तो त्याच्या चारही भावांना बोलावतो. तो कृष्णाला सुद्धा बोलावतो. त्यानंतर तो हळू आवाजात बोलतो, "तुम्ही तुमच्या सैन्याशी संपर्कात रहा व सगळी तयारी करा. आपला सामना आपल्या आजोबांशी आहे. आपल्या सात अक्षौहिणी सैन्यासाठी सात सेनानी योजावे लागतील".

कृष्ण त्याला बोलतो, "अशा वेळी जे करावे तेंच तू करत आहेस. आता सात नेते तुला नेमावे लागतील".

वैशंपायन बोलतात, लढण्यासाठी सज्ज असलेल्या त्या वीरांना बोलावले जाते. त्यात विराट, द्रुपद, धृष्टकेतू, शिखंडी, मगधाचा राजा सहदेव, सिनी, दृष्टद्युम्न, असतात. त्यांची नेमणूक त्या सात अक्षौहीणी सैन्याचे सेनापती म्हणून केली जाते. त्या सातांवर दृष्टद्युम्न सरसेनापती म्हणून नेमला गेला. तो द्रोणांचा वध करण्यासाठी द्रुपदाने यज्ञ करून मिळवला होता. त्या सर्वांवर अर्जुनाची नेमणूक होते. जनार्दन जो शंकरशनाचा धाकटा भाऊ आहे तो सर्व युद्धाचा मार्गदर्शक म्हणून नेमला गेला. सर्व तयारी पहाता मोठी संहारक लढाई होणार हो स्पष्ट होत होते. पांडवांच्या तळावर हल्युध त्याच्या बरोबर अक्रूर, शम्व, गद, उद्धव, रुक्मिनीचा मुलगा प्रद्युम्न, अक्रुराचा मुलगा, चारुदेशन, आणि दुसरे तयार होते त्यांच्या भोवती संरक्षक म्हणून वृश्नींचे पहारेकरी होते. त्यांच्यात देखणा बलराम आला. त्याच्या अंगावर निळा रेशमी अंगरखा होता. त्याच्या डोळयाच्या कडा लाल होत्या जसे मद्य प्याला आहे. तो कैलास पर्वतासारखा वाटत होता. त्याला पाहून सगळे पांडव उभे राहिले. त्याबरोबर इतर राजेसुद्धा उठून उभे रहातात. ते सगळे त्या हलधराची पुजा करतात. युधिष्ठीर त्याच्याशी हस्तांदोलन करतो. तोसुद्धा त्यांना अभिवादन करतो. तो राजा विराट आणि द्रुपद ह्यांना नमस्कार करतो. कारण ते त्याच्यापेक्षा ज्येष्ठ होते. त्यानंतर तो युधिष्ठीराच्या बरोबर बसतो. रोहिणीचा तो मुलगा कृष्णाकडे पहात बोलतो, "हा संहार अटळ आहे. केवळ नशिबाचा खेळ समजू ह्याला. मी आशा करतो कीं, त्यातून तुम्ही सहीसलामत सुटाल. जे मरतील ते स्वर्गात जातील. ही रणभूमी लवकरच रक्ताच्या चिखलाने बरबटणार आहे. मी नेहमी माझ्या वासुदेवाला सांगत असतो, जे तुझ्याशी चांगले त्यांच्याशी तू चांगला असला पाहिजेस. जसे पांडव आमच्याशी आहेत तसे आम्ही त्यांच्याशी आहोत.

पांडवांचा जय होणार त्यात शंका नको कारण कृष्ण त्यांच्या बरोबर आहे. माझ्याबाबत बोलावयाचे तर मी म्हणेन कीं, मी जनार्दनाशिवाय नाही. दोघे गदाधारी (भिम आणि दुर्योधन) माझे शिष्य आहेत. त्यामुळें मी दोघांवर सारखेच प्रेम करत असतो. म्हणून मी ह्या युद्धात भाग घेणार नाही. त्यापेक्षा सारस्वत तीर्थयात्री प्रयाण करण्याचा विचार करत आहे. तेथे जाऊन यज्ञ करत बसेन कारण मी त्या कौरवांचा संहार पाहू शकणार नाही". ते बोलल्यानंतर तो हलधर पांडवांची रजा घेतो व कृष्णाला त्याच्या बरोबर न येण्याचे सांगून तेथून निघून जातो.

सैन्य निरयन पर्व भाग एकशे अठ्ठावन्न संपला.

# सैन्य निरयन पर्व

## भाग एकशे एकोणसाठावा

वैशंपायन पुढे सांगतात, त्या सुमारास भिष्मकांचा मुलगा पांडवांना भेटण्यासाठी येतो. तो सत्यवादी, निश्र्चयी म्हणून ख्यातनाम होता. त्याचे नेहमीचे नांव होते, रुक्मी. भिष्मक ज्याला हिरण्यरुमन म्हणून ओळखत होते तो इंद्राचा मित्र होता. भोजांच्या वंशजांत तो फार नांवाजलेला होता. तो सगळ्या दक्षिणावर्ताचा राजा होता. रुक्मी त्या महान किंपुरूषांचा शिष्य होता, ज्याला द्रोण म्हणून ओळखले जात होते. त्याचे वस्तीस्थान गंधमादन पर्वतावर होते. त्याच्या गुरूकडून तो सगळी शस्त्रविद्या शिकला होता. त्या शस्त्रांची चारही (फेकणे, मागे घेणे, उलटवणे, थांबवणे) चाली कशा चालवावयाच्या ते तो शिकला होता. त्याने एक विलक्षण सामर्थ्य असलेले आयुध प्राप्त केलेले होते. त्याचे नांव विजया. दे दैवी प्रकारचे होते. ते इंद्राकडे असें. गांडीवा सारखेचे ते प्रभावी होते. किंवा कृष्णाकडील सारंगा सारखे शक्तिमान होते. स्वर्गातील रहिवाशांकडे तीन प्रकारची आयुध असतं. त्यात विजया, गांडीव आणि सारंग गणले जात. त्यांच्यामध्ये शत्रूच्या हृदयात धडकी भरण्याची क्षमता असें. त्यातील गांडीव वरुणाकडून अर्जुनाला खांडव वनाच्या वेळी मिळाले होते. रुक्मीने द्रोणांकडून विजया मिळवले होते. सारंग जे विष्णूचे सध्या कृष्णाकडे होते. रुक्मीने असुर मुराला मारले त्या आयुधाच्या मदतीने. हृषिकेशाने नरकाला जो पृथ्वीचा मुलगा होता सारंगाने मारले. त्याच्याकडे कैद असलेल्या साठ हजार महिलांना सोडवले व त्यांना सन्मान मिळावा म्हणून त्यांच्याशी औपचारीक प्रकारचे विवाह केले. रुक्मी कडे असलेल्या विजयामुळें, तो ख्यातनाम होता. असा तो भिष्मकाचा मुलगा पांडवांकडे येतो, त्याचा पांडवांवर प्रभाव टाकण्याचा प्रयत्न होता कारण पांडव कृष्णाला फार मानत होते व रुक्मीला कृष्णावर राग होता कारण कृष्णाने त्याची बहिण रुक्मीणी पळवून तिच्याशी लग्न केले होते. रुक्मीने त्यावेळी कृष्णाला आव्हान दिले होते परंतु, त्यात तो हरला होता. त्यानंतर तो कुंदीनापुरात स्थाईक होतो. जेथे त्याला कृष्णाने हरवले होते तेथे तो एक नवीन नगरी उभी करतो. त्याचे नांव होते, भोजकत. अशा कारणाने रुक्मीचा जनार्दनावर राग होता, म्हणून त्याचे महत्व पांडवांकडून कमी करण्यासाठी तो त्यांना मिळण्याचे बोलतो. त्याचे प्रचंड सैन्य त्याच्या बरोबर होते. ते सैन्य शस्त्रसाठा, व इतर सामुग्रीनी परिपूर्ण होते. तो आला आहे असे समजताच युधिष्टीर त्याचे स्वागत करतो. त्याची स्तुती करतो कारण तो कृष्णाचा साळा होता. रुक्मी ते स्वीकारतो, त्याचे सैन्य तेथे थांबलेले असते ते पांडवांना दिसत असते. तो विचारतो, "अहो कुंतीच्या मुलांनो, तुम्हाला कौरवांची भिती असेल तर मी तुम्हाला मदत करण्यासाठी आलो आहे. माझ्या हिसक्याने तुमचे शत्रू पूरते गारद होतील. ह्या पृथ्वीवर मला तोंड देऊ शकेल असा इसम नाही. तुमचे सगळे शत्रू मी सहजपणे मारून टाकीन. मी त्या भिष्म, द्रोण, कृप, कर्ण ह्यांना ठार मारून तुमचा जय निश्र्चित करीन. त्यानंतर मी ही पृथ्वी तुम्हाला दान करीन". ते तो मुद्दाम कृष्णाच्या समोर

युधिष्ठीराला सांगत होता. त्याचा उद्देश कृष्णाचे पांडवांकडील महत्व कमी करण्याचा होता. ते ऐकल्यावर अर्जुन त्याला हसत व मित्रत्वाच्या भावनेने सांगतो, "अहो रुक्मी आम्ही कुरु घराण्यात पंडुचे पुत्र आहोत, आम्हाला भिती हा शब्द माहित नाही. द्रोणांनी आम्हाला सगळ्या विद्या शिकवल्या आहेत. आम्ही गांडीव धारण करून आहोत अशा परिस्थितीत आम्हाला भिती कशाची असणार"? खांडव वनात मी गांडीवाच्या मदतीने दानवांशी लढलो आहे. मला त्यात कृष्णाने मदत केली होती. तसेंच निवटकवच राक्षसांचा पाडाव मी केला आहे एका हातांनी. विराटाच्या कडे कौरवांचा पराभव मी एकट्याने केला होता. आम्हाला कशाचीच भिती नसते. मला रुद्र, इंद्र, वायू, वैश्रावण, यम, द्रोण, माधव मदतीला आहेत. माझ्याकडे कधीही न संपणारे भाते आहेत. अशा तयारीत असलेले आम्ही कोणालाही भित नाही. भितो असें म्हणणे क्षत्रियाला शोङत नाही हे तुम्ही जाणताच. ते ऐकल्यावर रुक्मी खजील होतो व त्याचे अवाढव्य लष्कर घेऊन कौरवांकडे जातो. तेथे दुर्योधनाला भिष्म आणि कर्ण ताकीद देतात कीं, तो रुक्मीला महत्व देणार नाही. कारण त्यामुळें त्यांचे महत्व कमी झाले असते. त्यामुळें गर्विष्ठ दुर्योधन त्याला सांगतो कीं, त्याला त्याची गरज नाही. अशारितीने दोन महाबली, बलराम आणि रुक्मी त्या संघर्षातून बाहेर होतात.

आता पांडव पुन्हा युद्धाच्या बद्दल चर्चा करू लागतात त्यांच्या मित्र राजांबरोबर.

सैन्य निरयन पर्व भाग एकसे एकोणसाठावा संपला.

# सैन्य निरयन पर्व (संपले)

## भाग एकशे साठावा

जनमेजय वैशंपायनाना विचारतो, नियतीच्या प्रभावामुळें कुरूक्षेत्री कौरवांचे सैन्य जमा झाल्यावर ते काय करतात ते सांगा अहो ब्राह्मणं.

वैशंपायन सांगू लागतात, सगळे सैनिक व्यवस्थित रचल्यावर धृतराष्ट्र संजयाला बोलतो, "अरे संजया, त्या कौरवांच्या छावणीत काय होत होते ते मला सविस्तरपणे सांग. पांडवांच्या छावणीत काय होत होते ते सुद्धा सांग. मी नियतीला परमोच्च समजतो. मानवी प्रयत्न तिच्यापुढे क्षुल्लक असतात. मला माहीत आहे कीं, युद्धामुळें कधीही कोणाचे खरे झालेले नाही. हे मला माहीत असले तरी मी माझ्या मुलाला द्युत आणि फसवणूक ह्या उद्योगांपासून परावृत्त करू शकलेलो नाही. सगळे माहित असूनही मी स्वताला सांभाळू शकत नाही. अरे सुता, मला सगळे चांगले समजते परंतु, जसा तो माझा मुलगा माझ्याकडे येतो माझे काय होते ते समजत नाहीं, कीं मी त्याच्या तालांने वागू लागतो. कदाचित, माझ्या त्याच्यावरील प्रेमाचा हा दोष असावा. तरी सगळा दोष एकट्या दुर्योधनाचा नाही. माझे ऐक, माझे निरीक्षण मी सविस्तरपणे सांगतो. जो माणूस त्याच्या वाईट वागण्याने अडचणीत जातो त्याने कधीही देव अथवा काळाला दोष देऊ नये. जो पापात रमतो त्याचा नाश व्हावयालाच पाहिजे. द्युतात हरल्यानंतर पंडुची मुलं सगळे हालअपेष्टा विनातक्रार सहन करतात. आता त्यामुळें जो संहार होणार आहे ज्यात असंख्य प्राणी मारले जाणार आहेत, त्या नाशाची जबाबदारी कोणाची, त्या माणसांची कां नियतीची? अरे संजया, तू फार हुशार आहेस. ते समजून घे. भविष्यात जे होणार आहे त्याची जबाबदारी कोणावर असेल? कांहीं म्हणतात, दैव गती, कांहीं म्हणतात त्याची जबाबदारी त्या संबंधीत माणसांची, कांही म्हणतात गेल्या कर्माचा परिणाम. त्यासाठी आपल्यावर जे दुर्दैव कोसळणार आहे त्याला जबाबदार कोण"?

सैन्य निरयन पर्व भाग एकशे साठावा संपला.

# उलूक द्युताभिगमन पर्व (सुरू)

## भाग एकशे एकसष्ठावा

संजय ते धृतराष्ट्राचे ऐकल्यावर छावणीची माहीती सांगू लागतो. पांडवांनी त्यांची छावणी हिरांवती नदीच्या तीरावर टाकल्यानंतर कांहीं काळात कौरवांच्या छावण्या त्याच्या समोरच्या मैदानात पडतात. तेथे दुर्योधनाने छावणी टाकल्यानंतर त्याच्या मित्र राजांचे तो आभार मानत फिरतो. तो त्याच्या खास वीरांना बोलावतो त्यात कर्ण, दुःशासन, शकूनी असतात. त्यांच्याबरोबर पुढील मोहीम कशी आखावयाची त्याबद्दल चर्चा सुरू होते. प्रथम कर्णाचा विचार घेतल्यानंतर तो दुःशासन आणि शकूनीला सांगतो कीं, शकूनीच्या मुलाला, उलूकला बोलवावे. तो आल्यावर त्याला एका बाजूला घेऊन तो त्याला त्याची योजना समजावून देतो. ते समजल्यावर उलूक पांडवांच्या छावणीकडे निघतो. तेथे गेल्यावर युधिष्ठीराकडे काय बोलावयाचे ते त्याला पढवलेले असते. उलूक ते युधिष्ठीराला कृष्णासमक्ष ऐकवेल अशी योजना असते. तो दुर्योधनाच्या वतीने त्याचे बोलणे सांगेल असें ठरते. उलूक बोलेल, "ज्या भयंकर समराची सगळे अपेक्षा करत होते तो अखेरीस जवळ येऊन ठेपला आहे". असें तो गंभीर आवाजात सांगतो. पुढे तो ओरडून सांगतो, "अहो कुंतीपुत्र, तुमच्या मर्जीनुसार ते होणार आहे. ते करून तुम्ही कोणते उद्दीष्ट साध्य करणार अहात? तुम्ही पांडव, सोमक आणि केकया लोक स्वताला चांगुलपणाचे प्रतिक समजता मग युद्धासारखा वाईट घाट आपण कां घालत अहात? तुमच्या छोट्या मागणीसाठी सगळया क्षत्रिय कुळांचा विध्वंस कां करण्यात तुम्ही गुंतला अहात? लोकांना अभय देणारे तुम्ही त्यांचा वध करण्यास निघाले अहात केवळ छोट्या स्वार्थासाठी हे कसे तुम्हाला शोभते. तुम्ही आठवत असाल ते प्राचीन उद्गार प्रह्लादाचे, जेव्हां देवांनी त्याचे राज्य काबीज केले, तो बोलला होता, ज्यांचे जीवन उच्च अशा चांगुलपणावर आधारीत आहे पण त्यांची पाप मात्र झाकलेली असतात. असे लोक मांजरा सारखे असतात. ते प्रह्लादाचे उद्गार मला येथे आठवत आहेत. ती मांजराची कथा मला माझ्या पित्यानी सांगितली होती माझ्या लहानपणा ती सांगतो, एक नीच प्रवृत्तीचे मांजर गंगेच्या किनारी रहात होते. सगळी कामं सोडून ते सन्याशासारखे तपस्या करत बसले होते. त्या प्रकारे ते मांजर इतरांना दाखवत होते कीं, ते फार मोठे साधक झाले आहे. त्या मार्गाने त्याला सगळया इतर प्राण्यांचा आत्मविश्र्वास जिंकावयाचा होता. तसे बराच काळ चालू होते, त्यामुळें सगळया उंदरांचा त्याच्यावर विश्र्वास बसला. ते उंदीर त्यांची पिलं त्याच्या जवळ सुरक्षिततेसाठी ठेवू लागली होती. त्यामुळें त्या मांजराला समजले कीं, त्याचा डाव यशस्वी झाला आहे. आपला उद्देश सफल झाला हे तो समजतो. सगळयांना वाटू लागले कीं, ते मांजर मोठे तपस्वी झाले आहे असं ते समजतात. ते त्या मांजराला त्यांचा मोठा संरक्षक समजतात व त्यांची पिलं त्याच्या संरक्षणात ठेवण्याचे ठरवतात. असें ठरवल्यानंतर ती सगळी त्या मांजराला भेटतात व त्यांचा उद्देश सांगतात. मांजर मोठ्या आनंदाने ती जबाबदारी स्वीकारते. ते निष्पाप उंदीर त्या

लुच्चा मांजराला बोलतात कीं, आपण तपस्वी अहात, व्रतस्थ अहात तेव्हां आम्ही आपल्यावर विश्वास ठेवत आहोत. ते त्यांची लहान पिलं त्याच्या कडे सोडून जाण्याचा त्यांचा बेत त्याला सांगतात. मांजराला ते ऐकून फार आनंद होतो. ते मान्य करतांना ते मांजर त्यांना त्याच्या कांहीं अटी सांगतो व जर त्या अटी त्या उंदरांना मान्य असतील तरच ते मांजर ती जबाबदारी स्वीकारावयाला तयार असल्याचे सांगतो. ते धूर्त माजर त्यांना सांगते कीं, ह्यापुढे ते पक्षी त्याच्या आज्ञेचे पालन करतील. पुढे ते मांजर सांगते, कीं, त्याच्या घोर तपस्येमुळें तो फार अशक्त झाला आहे. मी हालचाल करू शकत नाही. तेव्हां तुम्ही माझ्यासाठी एक पक्षामे अंडे खाण्यासाठी आणाल असें ते मांजर त्या उंदरांना सांगते. त्याप्रमाणे ते उंगीर त्यांची पिलं त्याच्याकडे ठेवतात व दररोज एक दोन अंडी त्याला आणून देत असतात. येथे ते धूर्त मांजर ते अंड व त्याबरोबर तेथे असलेले एकादे पिलू खाऊ लागते. कांहीं दिवसांनी त्या पक्षांना आढऴते कीं, मांजर चांगले पुष्ट झाले आहे व त्यांच्या पिलांची संख्या कमी होत आहे. त्याचे कारण त्यांना समजेना. एके दिवशी त्यांच्यातील एक हुशार पक्षी ज्याचे नांव दिंडीक होते बोलतो, आपण एक युक्ती करू. तो त्या मांजराला जाऊन सांगतो, अहो मांजर राजे, पलिकडे मोठ्या संख्येने उंदीर जमले आहेत ते पहावयाला चला. त्यावेळी तो मांजर दिंडीकलाच खाऊन टाकते. त्यावेळी एक म्हातारा उंदीर बोलतो आपल्या मांजर राजाची लक्षणं योग्य नाहीत. त्यांना समजते कीं, त्यांची संख्या कमी होण्याचे कारण, ते मांजर त्यांना खात होते. ते समजतात कीं, मांजर पुण्यवंत नसून एक ढोंगी सन्याशी आहे. ते दांभिक आहे. त्याचे ते ढोंग सगळयाना समजते. तो आपला शत्रू आहे हे त्यांना समजले. जो प्राणी केवळ फळं खाऊन जगतो त्याच्या मळात कधी केस सांपडणार नाही. ते समजल्यावर सगळे उंदीर पळून जातात व मांजर त्याच्या ठिकाणी जाते. ह्या कथे प्रमाणे, तुमचे बोलणे एका प्रकारचे व कृती दुसऱ्या प्रकारची असते हे आता सगळया राजांना समजू लागले आहे. धर्मशास्त्राच्या गप्पा व शांततेच्या गोष्टी ही एक फसवणूक आहे. राजाने क्षत्रियांसारखे वागावयाचे असते. सज्जनपणाचा देखावा करून कितीकाळ तुम्ही लोकांना फसवू शकाल? पृथ्वी जिंकून मग ब्राह्मणांना दान करावयाची आणि पूर्वजांची श्राद्ध करावयाची, ह्यामुळें तुम्ही पुण्यवान ठरत नाही. तुमच्या अशा फसव्या वर्तनामुळें तुमची माता अनेक वर्षे दुसऱ्याकडे खस्ता खात जगत आहे. तिचे अश्रूसुद्धा सुकून गेले आहेत. ह्या लढाईत तुम्ही शत्रूला नष्ट करून तिला त्याचा मान देण्याचे पहात अहात. तुम्ही केवळ पांच गांव मागून मोठेपणा करण्याचे जे ढोंग केले आहे ते तिलासुद्धा समजलेले आहे. परंतु, ते सुद्धा आम्ही धुडकावून लावले आहे. आता कोणते नवीन ढोंग तू युधिष्ठीर करणार आहेस"? आम्ही पांडवांना सतावत आहोत, कारण त्यांना युद्ध हवे आहे. तुमच्यामुळें त्या नीच विदूराला आम्ही बाजूला केले आहे. तुम्हाला लाखेच्या घरात जाळण्याचा प्रयत्न केला, आता तरी थोडे अक्कलवान व्हा. कृष्ण निघाला आमच्याकडे येण्यासाठी तेव्हां तुम्ही एक संदेश त्याच्याबरोबर पाठवला होते, त्यात म्हंटले आहे, तुम्ही युद्ध किंवा शांती कोणत्याही पर्यायासाठी तयार अहात. अहो राजे युधिष्ठीर आता युद्धाची वेळ आली आहे तेव्हां तयार व्हा.

दुर्योधन सांगतात कीं, क्षत्रियांच्या विचारानुसार युद्ध हांच पर्याय असतो, शांती नाही. तुम्ही क्षत्रिय कुळांत जन्म घेतला आहे व द्रोण आणि कृपांकडून शस्त्रविद्या संपादन केली आहे मग तुम्हाला त्या कृष्णाची गरज कां वाटते"? तो तुमच्यापेक्षा उच्चसुद्धा नाही. उलूक कृष्णाकडे पहात म्हणतो, दुर्योधनाने तुला आणि सगळया पांडवांना युद्धाचे आव्हान दिले आहे. तुझे मायावी सोंग जे तू कुरु सभेत दाखवलेस ते तुला युद्धात उपयोगी येणार नाही. रणभूमीवर तू आणि अर्जुन आमच्याशी लढून दाखवा. तशी मायावी रुप थोडाकाळ काम करतात नेहमी नाही. जो क्षत्रिय शस्त्रसज्ज होऊन लढण्यासाठी निघाला आहे त्याच्यावर अशा गोष्टी परिणाम करत नाहीत. उलट अशी सोंग त्याला क्रोधी करतात. आमच्याकडे सुद्धा अशी मायावी सोंग घेण्याची विद्या आहे. आकाशात जाणे, खाली येणे हे सगळे आम्हीसुद्धा करू शकतो. विधात्याच्या मर्जीने हे जग चालते त्यावर अशा मायावी सोंगांचा कांहीं परिणाम होत नाही. अरे कृष्णा, तू नेहमी म्हणत असतोस कीं, कौरवांचा नाश करणार आणि पांडवांना पृथ्वीचे राज्य देणार, ते तुझे शब्द मला (दुर्योधनाला) संजयांने सांगितले. तू सांगतोस कीं तू अर्जुनापाठी आहेस व कौरवांच्या नाशाचे आरंभले आहेस. अरे कृष्णा, आता युद्धात तू करून दाखव त्या अर्जुनाला मदत आणि आम्हाला हरवून दाखव. तू आमच्या शत्रूत्व निर्माण करत आहेस. तुझ्यात शक्ती आहे ती दाखव आता ह्या युद्धात आणि तुझे म्हणणे खरे करून दाखव हिम्मत असेल तर. आता सिद्ध झाले आहे कीं, बरेच हिजडे स्वताला क्षत्रिय म्हणवून घेत आहेत व जेव्हां लढण्याची वेळ येते तेव्हां त्यांना तत्वज्ञान सुचते. अशी नाटक आम्ही कौरव चालून घेत नाही. पुढे दुर्योधन बोलतो, "तो अडाणी, खादाड भिम जो शिंग नसलेल्या बैला सारखा आहे, ज्याने फक्त चपात्याच कराव्या तो तुझा योद्धा आहे ह्यात कसले शौर्य असणार"? सभेत दुःशासनाचे रक्त पिण्याच्या बाता मारल्या आहेत त्या खऱ्या करून दाखवा. सैपाक करणे आणि लढणे ह्यात मोठा फरक आहे. अशारितीने बढाया मारणाऱ्याना आम्ही भाव देत नाही. नंतर उलूकाने नकुलाबद्दल काय बोलावयाचे ते बोलतो, "अरे मर्दा, आता लढून दाखव तुझी हिम्मत. तुझा पुरूषार्थ सिद्ध कर. कृष्णाचा जो अपमान झाला त्याचा बदला घेऊन दाखव. त्यानंतर उलूक सांगतो दुर्योधनाचे बोलणे सहदेवासाठी, तुला सभेत मोठ्या मोठ्या बाता मारता आल्या आता युद्धात दाखव तुझे शौर्य. तुला आम्ही दिलेल्या त्रासांना आठवून माझ्या सैन्याशी लढून दाखव".

विराट आणि द्रुपदांबद्दल उलूक अर्वाच्य बोलतो दुर्योधनाच्या वतीने, ह्या सृष्टीच्या सुरूवातीपासून अनेक दास कामयाब झाले परंतु, ते त्यांची योग्यता कधीच समजले नाहीत. तसेंच संपन्न राजे त्यांच्या दासांना समजू शकले नाहीत. असे राजे कोणत्याही लायकीचे नसतात. अशा परिस्थितीत तुम्ही माझ्याशी दोन हात करण्यासाठी आला अहात. एकत्र या आणि माझ्याशी लढून दाखवा. पांडवांनी सुद्धा ते करून दाखवावे. त्यानंतर तो धृष्यद्युम्नाबद्दल बोलतो, तो पांचालचा राजपुत्र, तुझा काळ आला आहे आता. द्रोणांशी लढणे म्हणजे थट्टा वाटते त्याला, म्हणे

तो द्रोणाचार्यांना ठार मारणार, काय मजाल आहे कोणाची कीं ते तो करू शकेल? द्रोणांना मारून दाखव ह्या युद्धात. त्यानंतर तो शिखंडीवर उतरतो. भिष्म तुला मारणार नाही कारण तू बाई आहेस. म्हणून तू न भिता त्याच्याशी लढून घे. मला तुझी हिम्मत पहावयाची आहे ह्या युद्धात.

वैशंपायन पुढे सांगतात, असे वाह्यातपणे बोलल्यावर दुर्योधन जोरांने हसतो. उलूक पुढे सांगतो, वासुदेवापुढे धनंजयाला तो बोलतो, अरे मर्दा, आम्हाला हरवून दाखव तुझ्या मित्राच्या कृपेने. नाहीतर तू मरून पडशिल ह्या युद्धात. तुम्हाला हकलवल्यामुळे जे दुःख झाले ते आठवून तू लढून दाखव, मला तुझी हिम्मत पहावयाची आहे. तुझ्या प्रिय पत्नीचा अपमान आम्ही केला आहे त्याचा वचपा काढून दाखव ह्या युद्धात. ज्या प्रकारे तुम्ही हकलवले गेला व ज्या प्रकारच्या त्रासातून तुम्ही गेलात त्याचा राग येणे अपेक्षित आहे. तो सगळा राग आता ह्या युद्धात दाखवा. तुमचे पिढीजात राज्य तुमच्या हातून गेले त्याशिवाय तुमचे स्वताचे कमावलेले राज्य सुद्धा गेले कारण तुमचा भाऊ मूर्ख आहे. परंतु, त्याचा राग आला असेल तर तो आता दाखवा. हिम्मत नसतांना फुशारकी मारणाऱ्यांत कांहीं अर्थ नसतो. आपले गेलेले राज्य मिळवणे आणि राज्य वाढवणे ह्या दोन कारणांसाठी क्षत्रिय लढतात. म्हणून आता तुला संधी आहे तुझे गेलेले राज्य लढून मिळवण्याची त्याचा उपयोग करून घे. बारा वर्षे वनवासात आणि एक वर्ष स्त्री वेषात घालवल्यानंतर आता तुला लढण्याची संधी मिळत आहे. तुझ्या प्रिय पत्नीचा अपमान करणाऱ्यांचा पराजय करून व त्यांना ठार मारून तू तुझे तिच्यावरील प्रेम सिद्ध करून दाखव. तुझा क्रोध, तुझी कसब, तुझे शस्त्रांचे ज्ञान ह्या युद्धात दाखव. अरे पृथा, पुरूषासारखा लढ तुझ्या मोठ्या भावासारखा हिजडा होऊ नकोस. कुरूक्षेत्र तुझी वाट पहात आहे. तुझे घोडे मजबूत आहेत. तुझ्या सैनिकांचे पगार त्यांना मिळत आहेत. केशवाला तुझ्या बरोबर घेऊन आमच्याशी लढून दाखव. भिष्माशी तू लढणार नाहीस कारण ते तुमच्याशी लढणार नाहीत परंतु, तुझा कर्दनकाळ कर्ण तुला ठार मारणार आहे हे लक्षात ठेवून लढ. त्या सुताला न हरवता तू मोठ्या मोठ्या घमेंडी करत असशील तर तो तुझा मूर्खपणा होईल. त्यांना हरवल्याशिवाय तू कसा तुझे राज्य मिळवणार"? तू द्रोणांना हरवू शकणार नाहीस. मग कशाला गप्पा मारतोस शौर्याच्या. सुमेरु पर्वताला वाऱ्याने पाडले असें कोणी सांगितले तर ते जसे हास्यास्पद होईल तशी आहे तुझी वल्गना कीं, तू द्रोणांना तुझ्या गुरूला, चीत करशिल. तू जर मला सांगितलेस कीं, तू त्यांना हरवणार आहेस, तो एक विनोद होईल. असा माणूस नाही ह्या जगात ज्याला भिष्मानी व द्रोणांनी बाणा मरले व तो जगला आहे. तुझ्या वल्गना विहीरीतील बेडकासारख्या आहेत अरें पार्था. आमच्या सैन्यात पूर्व, पश्चिम, उत्तर दिशांचे राजे आमच्या सैन्यात आहेत. कंबोज, शक, खासी, शल्व, मत्स्य, कुरु मध्य देशातील, त्या नंतर दक्षिणेकडील द्रविड, आंध्र, कांची, पुलिंद, म्लेच्छ असे इतर देशांचे योद्धे आहेत त्यांना संपवणे तुला सोपे वाटत असेल तर तो तुझा भ्रम आहे. अशा सैनिकांच्या लष्करापुढे जाण्याचा तू मूर्खपणा करत आहेस. मला वाटते तुला अक्कल कमी आहे म्हणून तू व तुझे बंधू हे

धाडस करत आहेत. तुझा नसंपणारा भाता, गांडीव, तुझे इतर आयुध सगळी ह्या युद्धात अजमावली जाणार आहेत. घमेड न करता तू पार्था लढून दाखव. युद्धातील जय त्याच्या पद्धतीवर अवलंबून असतो हुशारक्या मारण्यात नाही. तसे असते तर सगळेच जिंकत गेले असते. मला माहीत आहे कीं, तुझ्या तोडीचा योद्धा दुसरा नाही, तुझ्या गांडीवाच्या योग्यतेचे धनुष्य नाही. तरी मी तुमचे चोरलेले राज्य तुला मिळू देणार नाही. गेली तेरा वर्षे मी राज्य उपभोगत आहे ते सहजासहजी मी सोडणार नाही हे लक्षात असू दे. तुझे गांडीव तुझे कसब, तुझी हिम्मत तुला वनवासापासून वाचवू शकली नाही कारण काय माहीत आहे कां तुला? त्याचे कारण तुम्हा पांडवांचा नेता मूर्ख आहे. असे बोलून दुर्योधन जोरांनी हसू लागतो. नसत्या नैतिकतेच्या गप्पा मारणारा नेता असणे ह्यात मोठे अपयश असते व तो मूर्ख अजून तुमचा नेता आहे म्हणून मला अजून आशा आहे कीं मी तुम्हाला पुन्हा वनवासात पाठवू शकेन. तुम्हाला मी विराटाच्या राज्यात नाचायला लावले, भिमाला चपात्या भाजायला लावले ह्यात माझे पौरुष्य आहे, माझी बुद्धी आहे. जी तुमच्या कडे नाही. तुम्ही त्या हिजड्याच्या आज्ञेत रहाण्याचेच कौतुक करत अहात. तुला किंवा जनार्दनाला भिवून मी राज्य सोडीन असें जर तुला वाटत असेल तर तुमचा भ्रम आहे. लढण्यासाठी तयार असलेला योद्धा कोणत्याही प्रकारच्या फालतु युक्त्याने बधत नाही. भिष्मापुढे तुमची आयुध कुचकामी ठरणार आहेत. अगदी शंभर कृष्ण आणि हजार अर्जुनसुद्धा मला हरवू शकणार नाहीत कारण माझ्याकडे भिष्म, द्रोण, कृप व कर्ण आहेत. माझ्या सैन्याचे नेतृत्व अश्र्वत्थामा करत आहे. विविंसती, भिष्म, द्रोण आणि कर्णांच्या नियंत्रणात आहे त्यातच त्याचे यश सामावलेले आहे. त्याशिवाय सोमदत्त, वल्हीक, कंबोजचा राजा, सल्व, सल्य, बृहद्वत, युयुत्सू, दुर्मार्शन, भागादत्त, श्रुतयू, हाद्रीक, दुःशासन, सुशेन, चित्रयुध, जयद्रथ, पुरुमित्र, शकूनी असें आहेत त्यांच्यापुढे तुमचे सैन्य टीकणार नाही. अशा परिस्थितीत तुम्हाला ते राज्य जिंकणे तितके अवघड आहे जितके एकाद्या भ्रष्ट माणसांने स्वर्ग मिळवण्याचे स्वप्न पहावे. अशारितीने दुर्योधन शकूनीच्या मुलाला, उलूकला पांडवांपुढे काय बोलावयाचे ते शिकवून तयार करतो.

उलूक द्युताभिगमन पर्व भाग एकशे एकसष्ठावा संपला.

# उलूक द्युताभिगमन पर्व

## भाग एकशे बासष्ठावा

संजय पुढे सांगतो, पांडवांच्या छावणीत पोहोचल्यावर तो शकूनीचा मुलगा, उलूक युधिष्ठाराला ते सगळे ऐकवतो जे दुर्योधन त्याला सांगत होता. तो युधिष्ठीराला बोलतो कीं, "मी एक वकील म्हणून आलो आहे व जे मला बोलावयाला सांगितले तेंच मी बोलणार आहे त्यावर आपण माझ्यीशी वैर करू नये. ते माझे उद्गार नाहीत हे समजून आपण ते एकावेत".

ते ऐकल्यावर युधिष्ठीर त्याला अभय देतो व जे बोलावयाचे आहे ते बोल असे सांगतो. तुझ्या मालकाची दृष्टी मर्यादित आहे हे आम्हाला माहित आहे. त्यानंतर तेथे जमलेल्या राजां समक्ष उलूक बोलतो, ते राजे होते, सगळे पांडव, श्रींजय, कृष्ण, द्रुहद, विराट, त्याची मुलं. उलूक बोलू लागतो जसे पढवले होते तसे.

उलूक सांगतो कीं, त्यांच्या कुरुसभेत जे राजे जमा झाले होते त्यांच्यासमक्ष जे दुर्योधन बोलला ते मी आता तुम्हाला जसे त्यांने सागितले तसेंच सांगणार आहे त्यात माझे कांहीं नाही. अहो युधिष्ठीर व जमलेले राजे ते ऐका.

"तुमचा द्युतात पराभव झाल्यावर कृष्णाला सभेत आणले गेले, अशावेळी ज्याला स्वाभिमान आहे असा कोणीही संतापला असता, परंतु तुला त्याचा राग आला नाही. त्यानंतर बारा वर्षे वनवासात काढावी लागली व नंतर एक वर्ष अज्ञातवासात काढावी लागली त्याकाळात तुझे बंधू व तू विराटाच्या राज्यात लपून बसला होता. ह्या सगळ्या गोष्टींचा राग तुमच्या मनात असणे स्वाभाविक आहे. त्याकाळात तरीसुद्धा तुझ्या भिमांनी मोठी प्रतिज्ञा केली होती. कीं तो दुःशासनाचे रक्त पिणार आहे. आयुधांची पुजा झाली असेल व रणभूमीसुद्धा युद्धासाठी तयार आहे. तुमचे घोडेसुद्धा तयार आहेत. अशी तयारी तू केली आहेस तेव्हां उद्यापासून युद्धाला तुम्ही सुरूवात करावी असें दुर्योधनाचे आदेश आहेत. केशवाला तुमचा मित्र म्हणून त्यात सामील करा. तुमच्यापैकी कोणीही अजून भिष्माशी लढलेले नाही, आणि मोठ्या मोठ्या फुशारक्या करता ह्याची दुर्योधनाला मोठी गंमत वाटते. गंधमादन पर्व चढल्याच्या गप्पा आपणांनी मारल्या आहेत तेव्हां आता पाहू तुमच्यात किती दम आहे. कर्णाशी सुद्धा तुझ्यापैकी कोणी लढलेले नाही. त्याशिवाय सल्य आहे, तुला साम्राज्य पाहिजे तर तू लढून दाखव व ते राज्य मिळवून दाखव. वेदाचे गाढे अभ्यासक जे धनुर्विद्येत प्रवीण आहेत अशा द्रोणांना हरवण्याच्या गप्पा मारतां तर आता पाहू तुमची ताकद काय आहे. तुझी वल्गना अशी आहे जसे वाऱ्याने सुमेरु पर्वताला पाडण्याच्या वल्गना कराव्यात. तू जे बोलतोस ते खरोखरच करून दाखवलेस तर मी तुला मानीन. भिष्म आणि द्रोणांच्या तावडीतून असा कोणता वीर आहे जो सहीसलामत सुटू शकेल?

विहीरीतील बेडकांनी जशा फुशारक्या माराव्यात तशी फुशारक्या तुम्ही मारत आला अहात. आता वेळ आली आहे तुमचे सामर्थ्य दाखवण्याची. त्याशिवाय आमचे मित्र राजे आहेत ते तुमच्या फौजांचा फडशा पाडतील ते पहात रहा. पूर्व, पश्चिम, दक्षिण आणि उत्तर दिशेचे असे सगळे राजे माझ्यासाठी त्यांच्या लष्करासह लढण्यास तयार आहेत. त्यामध्ये कंबोज आहेत, शक आहेत, खासी, सल्व, मत्स्य, आमचे कुरु, म्लेच्छ, पुलिंद, द्रविड, आंध्र, कांची असें राजे आहेत. ते गंगेच्या जोरदार प्रवासासारखे तुमच्या फौजांचा नाश करतील. दुर्योधन पुढे तुम्हाला आवाज देतो कीं, मी माझ्या हत्तीफौजांच्या मध्ये सुरक्षित असतांना तुम्ही माझ्यावर कसा वार करणार"? युधिष्ठीराला ते सुनवल्यानंतर तो जिश्नुकडे वळून बोलतो, "दुर्योधन सांगतात तुम्हाला किं, फुकटच्या बढाया न मारतां लढून दाखव. लढाई जिंकण्यासाठी अक्कल असावी लागते केवळ फुशारक्या करून ती जिंकता येत नाही. जर फुशारक्या मरून युद्ध जिंकता आली असती तर सगळेंच जिंकले असते. तुझ्या सोबतीला कृष्ण आहे, मला माहीत आहे तुझे गांडीव मोठे आहे, मला हेसुद्धा माहित आहे कीं ह्या जगात तुझ्यासारखा योद्धा नाही. तरी मी तुला सांगतो कीं, मी ते राज्य तुम्हाला मिळू देणार नाही. नियती माझ्या बरोबर आहे हे गेल्या तेरा वर्षांनी सिद्ध केले आहे. तुम्ही मूर्खासारखे जंगलात भटकत होता व मी तुमच्या राज्यावर सत्ता गाजवत होतो. विधात्याच्या अंतिम निर्णयानुसार सगळया गोष्टी होत असता, त्यात मैत्री, शत्रूत्व असें सगळे येते. नशिबाच्या जोरावर मी पुढेसुद्धा राज्य भोगत रहाणार आहे. तुम्हाला जेव्हां मी जंगलात पाठवले युक्तीने तेव्हां तुझी आयुध तुला उपयोगी आली नाहीत कारण तुझा नेता मूर्ख आहे. ज्यांचा नेता मूर्ख असतो ते कधीच जिंकू शकणार नाहीत. त्यात तू व तुझे इतर तीन भाऊ येतात कारण तुमचा नेता चुकीचा आहे. तुम्हाला प्रिशताच्या कन्येने पहिल्यावेळी वाचवले तुझ्या आयुधांनी नाही. हे समजून घे. परंतु, तुमचा मूर्ख नेता पुन्हा अडमडला व तुम्ही वनवासात आणि नंतर अज्ञातवासात गेलात ह्यावरून मूर्ख नेता कशी बरबादी करतो ते समजून घ्या. तुझा भिम लढण्याचे सोडून विराटाच्या घरी भांडी घासत बसला होता कारण तुम्ही एका मूर्खाचे ऐकत होता. तो मूर्ख मात्र मजेत विराटाचा मित्र बनून राजसभेत द्युत खेळत बसला होता. कारण अरे अर्जुना, केवळ तुमचा प्रमुख मूर्ख आहे असे नाही तर तुम्ही सगळे मूर्ख अहात. तू स्वतः त्या राजाच्या वाड्यात नाचापोरी झाला होतास हे कोणत्या शूरतेचे लक्षण समजावे. आजवर कोण्या क्षत्रियांनी असें लाजिरवाणे जीवन जगले केवळ मोठा भाऊ मूर्ख आहे म्हणून, ते सांग? तुझ्यासारखे हजार जिश्नु आणि हजार कृष्ण आले तरी माझे कांहीं वाकडे होऊ शकत नाही कारण माझे भाग्य तुमच्यापेक्षा बलवत्तर आहे. म्हणूनच भिष्म, द्रोण, कर्ण, कृप माझ्या बरोबर आहेत. त्याशिवाय शरदवताचा अश्र्वत्थामा आहे. हे सगळे भाग्यामुळें होत असते जे तुमच्याकडे नाही. त्याशिवाय विविंसती, वृहद्वत, सोमदत्त, कंबोजचा राजा, जयद्रथ, पुरुमित्र, दुर्मार्शन,शकूनी माझ्या बाजूने लढणार आहेत. त्यांच्यापुढे तुमची शस्त्र निष्प्रभ ठरतील. तुमचे सगळे आप्त, मित्र त्यात मारले जाणार आहेत. तसे झाले का तुम्हाला समजेल किती मोठा मूर्खपणा तुम्ही केला कीं मला आव्हान दिलेत. पृथ्वीवर राज्य करण्याचे

विचार तुम्हाला सोडावे लागतील. जसें कोणी अपवित्र माणूस स्वर्गाचा विचार सोडून देईल. पापी माणूस स्वर्गात जात नाही त्याप्रमाणें तुम्ही माझे राज्य जिंकू शकणार नाही.

उलूक द्युताभिगमन पर्व भाग एकशे बासष्ठावा संपला.

# उलूक द्युताभिगमन पर्व

## भाग एकशे त्रेसष्ठावा

संजय पुढे सांगतो, संजय पुढे सांगतो, उलूक अर्जुनाला आणखीन चिडवतो. तो व सगळे पांडव चिडावे म्हणूनच कीं काय तो ते दुर्योधनाने पढवलेले बोलत होता. पांडव आधीच खूप चिडवलेले होते त्यात त्याच्या बडबडीने भर पडत होती. त्यांची सहनशक्ती संपली. ते सगळे पांडव त्यांच्या जागांवरून उठले व त्याच्यावर धावून जाण्याच्या मनस्थितीत होते. त्या संतापलेल्या अवस्थेत ते एकमेकांकडे त्यांच्या भावंडांच्या प्रतिक्रीया समजून घेण्यासाठी पाहू लागले. भिमसेन जमिनीकडे पहात व जोराजोराने श्वास घेत कृष्णाची काय प्रतिक्रीया आहे त्याचा अंदाज घेऊ लागतो. भिम फार चिडलेला आहे हे समजल्यावर तो जगन्नाथ गालातल्या गालात हसत उलूकाला बोलतो, त्या तुझ्या दुर्योधनाला सांग, त्याची युद्धाची इच्छा लवकरच पूर्ण होणार आहे. ते बोलल्यानंतर केशव युधिष्ठीराकडे पहातो त्याची प्रतिक्रीया समजण्यासाठी. त्यानंतर इतर मान्यवर सदस्यांच्या समक्ष जसे श्रींजय, द्रुपद आणि विराट व इतर राज्यांच्या समोर तो कौरवांचा वकील पुन्हा तेच बोलत रहातो, त्यामुळें ते सगळे आणखीन जास्त संतापतात. जसे आधीच चिडलेल्या सापाला काठी मारली कीं तो जसा आणखीन चवताळतो तसे होत होते. ते पहाता उलूकाला समजते कीं, त्याच्या मालकांचा उद्देश साध्य होत आहे. त्या बोलण्याने संतापलेला अर्जुन त्याच्या कपाळावरील घाम पुसतो त्याची ती अवस्था पाहून त्यांचे मित्र राजेसुद्धा चिडतात. कितीही मनाचा संयम असला तरी प्रत्यक गोष्टीची मर्यादा असते व सहन करण्याची मर्यादा त्या उलूकानी ओलांडलेली होती. सत्यकी, केकयाची पांचही मुलं राक्षस पुत्र घटोत्कच, द्रौपदीची मुलं, अभिमन्यू, आणि दोघे आश्विनी संतापाने लालबुंद झालेले त्यांच्या आसनांवरून उठले, चंदनाचे गंध लावलेले त्यांचे हात ज्यांच्यावर सुवर्णाचे दागिने होते तो चोळू लागतात. वृकोदर त्या तरूणांच्या आवेशाला समजतो, दात चावत त्याला बोलतो, "अरे अडाण्या, आम्हाला चिडवण्यासाठी दुर्योधनाने ते तुला बोलण्यासाठी पाठवले आहे हे आम्ही समजतो. आता मी काय सांगतो ते ऐक आणि ते तू दुर्योधनाकडे जाऊन त्याच्या सगळया मित्र राजांसमक्ष त्याला ऐकवशील जे एका वकीलाचे काम असते. ते शकूनी व कर्णाने सुद्धा ऐकले पाहिजे. आम्ही नेहमी आमच्या वडील भावाचे ऐकत असतो. त्यामुळें त्याने जे केले त्याला आम्ही साथ दिली आहे आतापर्यंत. तुझी ही माकडचेष्टा सुद्धा आम्ही चालू देत आहोत कारण तेंच आहे. तू फार नशिबवान आहेस कीं असा मोठा भाऊ आम्हाला मिळाला नाहीतर एव्हाना तुमचा खुर्दा झाला असता. त्याने कृष्णाला तुमच्याकडे पाठवले शांतता करण्यासाठी पण तुम्हाला ते नको. तुम्हाला यमाकडे जाण्याची घाई झाली आहे, ते कदाचित तुमच्या भाग्यात आहे. चला युद्ध करू, ते उद्याच सुरू करू. मी दुर्योधनाला व त्याच्या भावांना ठार मारणार आहे. अरे मूर्खा, माझी प्रतिज्ञा मी विसरेन अशी शंकासुद्धा मनात आणू नकोस. अगदी जरी साक्षात यमाने, कुबेराने किंवा रुद्राने तुम्हाला साथ दिली तरी ते

माझी प्रतिज्ञा खोटी करू शकणार नाहीत. मी दुःशासनाचे रक्त पिण्याचे बोललो आहे ते करून दाखवीन, मी आणखीन सांगतो कीं, कोणीही क्षत्रिय अगदी भिष्म जरी आले तरी मी त्याना ठार मारल्याशिवाय रहाणार नाही. भिमाचे ते उद्गार ऐकल्यावर सहदेव त्याचे डोळे संतापाने लाल झाले होते बोलतो, "अरे पाप्याच्या दुता, आता मी काय बोलतो ते नीट ऐक व तुझ्या मालकाला जाऊन सांग, आमच्या व कौरवांत वितुष्ट येण्यास कारणीभूत आहे तुम्ही गांधार लोक ज्यांच्याशी आमच्या काकाचे नाते जुळले आहे व म्हणून तुम्ही आमच्या राज्यात येऊन बसला अहात. तुम्ही साक्षात कलागतीचा नमुना अहात. जेथे जाल तेथे भांडण लावणार. तुमच्यामुळें कुरु घराणे संपुष्टात येणार आहे. तुझा बाप दुर्योधनाला खूष करण्यासाठी आम्हाला खाली पाडण्याचे सतत प्रयत्न करत असतो. मी तुला तुझ्या बापाच्या नजरेसमोर ठार मारणार आहे ह्या युद्धात हे लक्षात ठेव. सहदेवाचे व भिमाचे ते उद्गार ऐकल्यावर अर्जुन हसत भिमाकडे वळून बोलतो, अरे वृकोदरा, जे तुझ्याशी वैर करतात ते फार काळ जीवंत रहात नाहीत. तरीसुद्धा हा उलूक एक दुत म्हणून आला आहे त्याच्यावर रागावणे शिष्टाचाराला धरून होणार नाही. तो जे बोलत आहे ते त्याला जसे सांगितले तसे आहे. ते ऐकल्यावर भिम त्याच्या मित्र राजांना दृष्टद्युम्ना समोर सांगतो, "आपण दुर्योधनाचे बोलणे ऐकले आहे, त्याने कृष्णाचा व त्याबरोबर सगळयांचा उपमर्द केला आहे. तुम्ही आमचे हितचिंतक असल्यामुळे तुम्हाला त्यांचा राग आला असेल. तुमच्या परवानगीने मी दुर्योधनाला त्याच्या आव्हानाचे उत्तर देत आहे. ते असें कीं, जेव्हां उद्या अर्जुन त्याच्या गांडीवाच्या टणत्काराने उत्तर देणार आहे. कारण क्षत्रिय उत्तर युद्धाने देतात, बडबडून नाही. ते ऐकून सगळे जमलेले क्षत्रिय धनंजयाचे स्वागत करतात. त्याच्या उत्तराची चमक आणि धमक त्यांना फार आवडते. राजा युधिष्टीर सगळया राजांची परवानगी नियमानुसार घेऊन उलूकाला उत्तर देतो ते असें, त्याचा राग अनावर झाला होता, त्याचे डोळे लाल झाले होते, जनार्दनाकडे पहात खंबीरपणे तो बोलतो, "जा उलूका, तुझ्या धन्याला सांग, अरे नालायक माणसा, पांडवांशी तुझे वागणे नेहमीच नीचपणाने भरलेले आहे, ज्याच्यात दम आहे तो स्वताच्या बळावर आव्हान देत असतो, दुसऱ्यांच्या बळावर नाही. त्यालाच खरा क्षत्रिय समजले जाते. तुझ्या हिम्मतीने आम्हाला युद्धाचे आव्हान दिले पाहिजेस, कृप, भिष्म, द्रोण आणि अश्र्वत्थामा ह्यांच्या नाही. ते आमच्यावर वार करणार नाहीत हे सुद्धा तुला समजत नाही ह्यात तुझ्या अल्पबुद्धीची कल्पना येते. तुम्ही तुमच्या स्वताच्या व तुमच्या नोकरांच्या बळावर आम्हाला आव्हान दिले असते तर ते खरे क्षात्रतेज समजले गेले असते. त्या वृद्ध योद्ध्यांच्या ताकदीवर तुम्ही आम्हाला आव्हान देता त्यातच तुझ्या नपुसकपणाचे प्रदर्शन होते. दुसऱ्यांच्या बळावर जे आव्हान देतात ते खरे हिजडे असतात. तुझ्यात स्वताची ताकद नसतांना कशाला मोठ्या मोठ्या बढाया मारत आहेस.

त्यानंतर कृष्ण बोलतो, "माझेसुद्धा ऐक द्युत खेळणाऱ्याच्या मुला, कौरवांना सांग, उद्या सकाळी युद्धाला प्रारंभ करू. तुझा आत्मा भ्रष्ट झाला आहे. मी फक्त अर्जुनाचा सारथी आहे, मी

लढणार नाही. कारण तसे पूर्वीच ठरले आहे. परंतु, जर तू मला अशारितीने चिडवत गेलास तर मी शस्त्र हातात घेईन तेव्हां तुला पश्चात्ताप करण्यासाठी सुद्धा फुरसत मिळणार नाही. तरी युधिष्ठीराच्या आज्ञेने मी केवळ अर्जुनाचा सारथी रहाणार आहे. ठरल्याप्रमाणे तो लढणार आहे व मी सारथ्य करणार आहे. तुला वाटते भिम वल्गना करत आहे तर समज कीं, दुःशासनाचे रक्त आधीच तो प्याला आहे. तुझ्या अशा वाह्यात बोलण्यामुळे आमच्या मनात तुझ्याबद्दल काडीचाही आदरभाव उरलेला नाही.

उलूक दुताभिगमन पर्व भाग एकशे त्रेसष्ठावा संपला.

# उलूक दुताभिगमन पर्व (संपले)

## भाग एकशे चौसष्ठावा

संजय पुढे सांगतो, दुर्योधनाचे ते उद्गार ऐकून गुडाकेश लालेलाल डोळयाने उलूकाकडे पहातो. त्यानंतर तो त्याच्या बलाढ्य हातांना झटके देत केशवाकडे पहात बोलतो, जो स्वताच्या बळावर शत्रूंना आव्हानं देतो व लढतो तो खरा क्षत्रिय समजला जातो. दुसऱ्यांच्या सामर्थ्यावर आव्हान देणारा क्षत्रिय समजला जात नाही. तो शुद्राहूनही शुद्र समजला जातो ते तुझ्या मालकाला जाऊन सांग. जो दुसऱ्यांच्या बळावर अवलंबून युद्धाच्या गोष्टी करावयाला जातो तो भित्रा समजला जातो. तुझा राजा सांगतो कीं, हत्तीच्या गराड्यात तो राहिल व म्हणून त्याला आम्ही मारू शकणार नाहीस ह्याचा अर्थ तुझा मालक लढू शकत नाही म्हणून स्वताला हत्तींच्या गराड्यात सुरक्षित ठेवू इच्छितो, असा माणून क्षत्रिय म्हणवून घेण्यास पात्र नाही. अशा भित्र्याने मोठ्या बढाया मारू नयेत. भिष्माचार्यांना सरसेनापती करून त्यांना दुर्योधन निश्चित अशा मृत्यूच्या जबड्यात सोडत आहे. ते करण्या मागील त्याचा हलकट उद्देश आम्हाला चांगलाच समजतो. त्याला माहीत आहे कीं, पंडुची मुलं त्यांच्या आजोबाला कधीच हात लावणार नाहीत त्या त्यांच्या चांगुलपणाचा गैरफायदा तो घेऊ पहात आहे. आता तू परत जा व तुझ्या मालकाला सांग, कीं, अर्जुनाने असें सांगितले आहे. आजची रात्र संपल्यावर भयंकर युद्धाला प्रारंभ होणार आहे ते त्याला सांग. भिष्माने सगळया कुरु सभेत सांगितले आहे कीं, ते श्रींजय, शल्वय ह्यांना मारीन. पांडवांना हात लावणार नाही. द्रोण सोडून जगातील कोणालाही मी ठार मारीन असें मी वचन दिले आहे त्या प्रमाणे द्रोणसुद्धा पांडवांना हात लावणार नाहीत असें त्यांनी आधीच सांगितले आहे. तुझ्या मालकाला वाटते कीं, ते राज्य त्याचे एकट्याचे आहे व पांडव दुःस्थितीत पडले आहे. तो खोट्या घमेंडीत आहे. मी उद्या प्रथम भिष्मांना मारीन सगळयांच्या समक्ष, माझ्या बाणांनी मी खाली पाडीन सगळयांच्या नजरेसमोर जे तुझ्या मालकाचा मोठा आधार आहेत. उद्या जेव्हां तो पाहिल कीं, भिष्म माझ्या बाणांनी भरलेले आहेत, त्या गर्विष्ठाला समजेल बढाया मारणे व लढणे ह्यातील फरक काय आहे. त्या सभेत रागाच्या भरात भिमाने जी प्रतिज्ञा केली होती ती कशी पूर्ण होते ते तो पाहील त्यात तो पापपुरूष, भांडखोर, अल्पमती, क्रूर, दुर्व्यसनी, नेहमी लोकांचे वाईट करणारा दुःशासन त्याचा कसा नाश होतो. अरे नीचा, जर मी रागावलो तर तुला राज्य कसे राखता येईल"? जेव्हां कृष्ण माझ्या साथीला आहे. भिष्म आणि द्रोणांचा निकाल लागल्यावर आणि कर्णाचा फडशा पाडल्यावर तुला कोण वाचवणार आहे ते पहा. तुझ्या भावांचा संहार होत असलेले पाहून तू काय करणार आहेस ते पहा. त्यावेळी तुला तुझे सगळे दुरोद्योग आठवतील. त्याला सांग कीं, मी अर्जुन पुन्हा सांगणार नाही, परंतु, जे बोलतो ते सगळे तसेंच होणार आहे हे तुझ्या मालकाला जाऊन सांग.

ते ऐकल्यावर उलूक निघण्याच्या तयारीला लागतो. तो बोलतो, "अहो राजन, दुर्योधनाचे बोलणे माझे होते असें समजून तुम्ही मला दोष द्याल तर ते अयोग्य होईल. तुमच्या वागण्यात व आमच्या वागण्यात किती फरक आहे तो पहा. मी दुर्योघनाला तुमच्यावतीने सांगीन की, त्याच्या वागण्याप्रमाणे तुमचे वागणे नाही. म्हणून आपल्या लोकांची हत्या होऊ नये व सगळे व्यवस्थितपणे व्हावे ह्यासाठी तुम्ही फक्त पांच गांव मागितली होती, परंतु, ते तुम्हाला जमले नाही म्हणून आता संहाराला तयार व्हा. कौरवांच्या विकृत मनोवृत्तीमुळें त्यांनी वासुदेवाचे मान्य केले नाही आणि तुम्ही लढण्याच्या गोष्टी करू लागले. कुरु पुत्र नेहमी मला त्रास देण्याच्याच प्रयत्नात असतो. आणखीन बोलण्यासारखे आता कांहीं उरलेले नाही.

भिम बोलतो, अरे, दुर्गुणी दुर्योधना, तू साक्षात पापाचा अवतार आहेस. तू गिधाडाच्या पोटातील किडा बनून रहावयाला पाहिजेस. मी खात्रीने माझी प्रतिज्ञा जी मी सभेत केली होती ती खरी करणार आहे. त्याच्या भावांच्या चिंधड्या करणार आहे. मी धृतराष्ट्राच्या सगळया मुलांचा नाश करणार आहे. एवढेच नाही तर तुझ्या डोक्यावर मी माझी लाथ युधिष्ठीराच्या समक्ष मारणार आहे". त्यानंतर नकूल आग पाखडतो, "अरे उलूका, धृतराष्ट्राच्या मुलांना जाऊन सांग, त्याचे सगळे बोलणे आम्ही ऐकले आहे व त्याला काय सांगावयाचे आहे ते सुद्धा समजलो आहोत. अरे कौरवा तुझी इच्छा आम्ही पूर्ण करू व तुमचा नाश तुझ्या डोळया देखत करून टाकू". त्यानंतर सहदेव बोलतो, आमचे वडील भाऊ जे बोलले ते आम्हाला मान्य आहे व त्याप्रमाणे सगळे होणार आहे. तुम्हाला पस्तावा करावा लागणार आहे दुर्योधना. तुझी मुलं, तुझे सहकारी व आप्त सगळे ठार मारले जातील जे तुला पाहिजे आहे. आम्हाला त्रास देण्याचा आनंद तुम्ही भरपूर भोगला त्या बद्दल आता तुमची पाळी आहे तुमचे भोग भोगण्याची".

त्यानंतर वयोवृद्ध विराट आणि द्रुपद बोलतात, "अरे उलूका, आम्हाला सद्‌गुणी माणसाचे गुलाम व्हावयाला आवडेल. आता तुम्हाला समजेल आम्ही कोण आहोत, मालक की, दास, ते उद्याच्या लढाईत दिसून येईल. त्याच प्रमाणे कोणात पौरुष्य आहे तेसुद्धा स्पष्ट होईल". त्यानंतर शिखंडी बोलतो, "अरे उलूका, दुर्योधनाला सांग, ह्या युद्धात तुला पहावयाला मिळेल मी कोण आहे, पुरूष कां बाई. तुझ्या आजोबाला मी त्याच्या रथातच मारून टाकणार आहे. तू ज्यांच्या हिम्मतीवर विसंबून आहेस ते सगळे एकामागोमाग मारले जात असल्याच तुला पहावयाचे आहे. माझा जन्म भिष्माचा नाश करण्यासाठी झाला आहे, त्यामुळें ते होणारच माझ्या हातून त्याबद्‌ल कोणाला शंका बाळगावयाचे कारण नाही".

त्यानंतर दृष्टद्युम्न बोलतो उलूकाला, "अरे जुगारड्याच्या मुला, तुझ्या राजाला सांग, मी द्रोणांना ठार मारणार आहे, त्याबरोबर त्याचे सगळे साथीदारसुद्धा मारणार आहे. कारण ते

द्रोणाचे प्रतिक आहेत. माणसाला मारणे म्हणजे त्याची सगळी प्रतिकेसुद्धा नष्ट करावयाची असतात".

त्यानंतर युधिष्ठीर दयाबुद्धीने बोलतो, "अरे तुझ्या राजाला सांग, मला हा संहार आवडत नाही, परंतु, त्याच्या अपकृत्यांमुळे तो आता अटळ आहे. त्याच्या अदूरदृष्टीमुळे व हव्यासापायी तो होणार आहे. एक राजा म्हणून मी ह्या युद्धाला मान्यता देत आहे व ते त्या त्या योद्ध्याच्या सामर्थ्याने सिद्ध होणार आहे. आता तू जा तुला जाण्याची परवानगी मी देत आहे. येथून त्वरित निघून जा. आम्ही तुझे आप्त आहोत हे आम्ही विसरलो नाही जरी तुम्ही विसरला अहात".

उलूक बोलतो, "आपल्या परवानगीने मी जात आहे, आणि जे आपण मला सांगितले ते सगळे मी दुर्योधनाला कळवणार आहे". सावधगिरीने तो तेथून काढता पाय घेतो. आणि जेथे दुर्योधन होता तेथे जातो. तेथे गेल्यावर तो दुर्योधनाला सगळे इत्थंभूत सांगतो. ते सगळे तो प्रामाणिकपणे धृतराष्ट्राला सुद्धा जाऊन सांगतो. त्यामध्ये वासुदेव काय बोलला, अर्जुन काय बोलला, भिम काय बोलला, नकूल व सहदेव काय बोललवे, शिखंडी व दृष्टद्युम्न काय बोलले, विराट आणि द्रुपद काय बोलले, असें सगळ्यांचे तो त्याला सविस्तरपणे सांगतो. ते ऐकल्यावर तो दुःशासन, कर्ण आणि शकूनी ह्यांना बोलावतो. त्यांना सांगतो कीं, उद्या पहाटे पासून लढाई सुरू होत आहे. त्या तयारीला लागा. त्यांचे संदेशक धाडले जातात इतर राजांकडे. घोडे, उंट, हत्ती ह्यांची व्यवस्था करण्याच्या आज्ञा दिल्या जातात. सगळ्या योद्ध्याना युद्धासाठी सज्ज होण्याचे आदेश दिले जातात.

उद्या पहाटे पासून युद्ध सुरू होणार हे ठरते.

उलूक दुताभिगमन पर्व भाग एकशे चौसष्ठावा संपला.

## रथ तीर्थ संख्यान पर्व (सुरू)

## भाग एकशे पासष्ठावा

संजय पुढे सांगत असतो, उलूकाचे ऐकल्यावर युधिष्ठीर त्याच्या सैन्याला दृष्टद्युम्नाच्या नेतृत्वाखाली तयार व्हावयाचे आदेश देतो. त्यात चार प्रकारच्या फौजा असतात. पायदल, हत्तीदल, रथदल आणि घोडदल असें ते असतात. बलाढ्य महारथांच्या फौजा तयार होतात त्यांचे नेतृत्व अर्जुन व भिमाकडे असते. त्या प्रचंड सौन्याचा प्रमुख असतो दृष्टद्युम्न, पांचल देशाचा राजपुत्र. दृष्टद्युम्नाची नजर असते द्रोणांवर. त्याला मारण्यासाठी तो जन्मलेला होता म्हणून ते त्याचे जीवितकार्य होते. त्यानंतर तो निरनिराळया महारथांना त्यांच्या योग्यतेनुसार कामं करण्याचे आदेश देतो. तो अर्जुनाला कर्णाच्या मागावर ठेवतो. भिमाची योजना दुर्योधनावर करतो, धृष्टकेतू सल्यावर, उत्तमौजाची कृपाचार्यांवर अशा नेमणूका तो करतो. नकूलाची कृतवर्मनावर, युयुधनाला जयद्रथावर, शिखंडीचा रथ भिष्माचार्यावर लावतो. सहदेवाला शकूनीवर लावतो. चेकितनाला सल्यावर लावतो. दरौपदीची पांच मुलं त्रिगर्तांवर लावतो. तो अभिमन्यूला वृषसेनावर (कर्णाचा मुलगा) लावतो. त्याप्रमाणे सगळया इतर राजांच्या नेमणूका विरुद्ध पक्षाच्या तौलनिक राजांवर लावतो. त्याप्रमाणे ते लढणार असतात. दृष्टद्युम्न अभिमन्यूला अर्जुनापेक्षा जास्त निष्णात समजत असतो. त्या प्रमाणें इतर योद्धे नेमले जातात. प्रत्येकांचे लक्ष्य अशारितीने ठरवले जाते, द्रोणांना मात्र तो स्वतासाठी ठेवतो. अशारितीने सगळया लढवय्यांची लक्ष्य निश्चित केल्यानंतर तो युद्ध सुरू होण्याची वाट पहात निवांतपणे बसतो. सगळयांचे एकच ध्येय असते कीं, त्या युद्धात पंडुच्या पक्षाला जय मिळाला पाहिजे.

रथ तीर्थ संख्यान पर्व भाग एकशे पासष्ठावा संपला.

# रथ तीर्थ संख्यान पर्व

## भाग एकशे सहासष्ठावा

संजयाला धृतराष्ट्र विचारतो, "अरे संजया मला सांग, फाल्गुनीनी भिष्माला ठार मारण्याचे सांगितल्यावर माझा वाईट मुलगा दुर्योधन काय बोलला"? अरे दैवा मी समजतो कीं, गंगापुत्र आता मेल्यातच जमा झाला असं समजावयाला पाहिजे. कारण, वासुदेव साथीला असल्याने तो धनुर्धारी भिष्म त्यावर काय म्हणाला तेसुद्धा मला सांग. कौरवांच्या सेनेचे नेतृत्व स्वीकारल्यानंतर भिष्म काय. बोलला तेसुद्धा सांग.

वैशंपायन पुढे सांगतात, अशाप्रकारे ते प्रश्न ऐकल्यावर संजय त्याला सांगतो, भिष्म काय बोलले ते, सरसेनापतीपद ग्रहण केल्यावर तो योद्धा शंतनुचा मुलगा गंगापुत्र दुर्योधनाला बोलतो, "मला फार हर्ष झाला आहे कीं, मी ह्या लष्कराचा प्रमुख झालो आहे. मी देव कुमार ज्याच्या हातात समशेर असते त्याची पुजा करणार आहे. मला सगळी युद्धकला अवगत आहे. कोणाला कोणते काम द्यावयाचे ते मी चांगलेच जाणतो. सैन्य कसे पुढे करावयाचे व केव्हां हल्ला करावयाचा व केव्हां माघार घ्यावयाची ते मला चांगलेच माहीत आहे. त्यात मी बृहस्पती सारखा आहे. देवांचे सगळे युद्धातील डाव मला माहीत आहेत. गंधर्वांचे व माणसांचेसुद्धा मला माहित आहेत. त्या वापरून मी पांडवांचा गोंधळ उडवून देईन. तुझ्या मनाची हूरहूर आता कमी कर. सैन्याच्या नियमांप्रमाणे मी तुझ्या सैन्याचे मार्गदर्शन करीन". ते ऐकल्यावर दुर्योधन त्यांना बोलतो, "मला देवांची अथवा असुराची अजिबात भिती वाटत नाही कारण आपल्या सारख्या अजिंक्य योद्ध्याने माझ्या सैन्याची धूरा सांभळली आहे. त्याशिवाय तेथे द्रोण आहेत. आपण दोघे असल्यावर मला कसली चिंता असणार. परंतु मला सांगा ह्या दोन पक्षांच्या सैन्यात कोण रथी आणि कोण अतिरथी ठरतील? मला ते सांगा".

भिष्म सांगतात, "ऐक गांधारीसुता, दोनही पक्षातील रथी कोण व अतिरथी कोण ते सांगतो. ते तसे पाहिले तर हजाराने असतील. परंतु, त्यातील प्रमुख कोण ते सांगतो, तुम्हा कौरवात तू प्रमुख रथी आहेस. तुम्हा सगळेच रथांना पाडण्यात, तोडण्यात तरबेज अहात. जेव्हा तुम्ही सारथ्य करत असता. त्याच प्रमाणे हत्ती चालवत असतांना त्यांना कसे वळवायचे तेसुद्धा तुम्ही जाणता जेव्हा तुम्ही त्या हत्तीच्या मानेवर बसलेले असता. तुम्ही सगळे तलवार आणि दांडपट्टा चांगला चालवता, धनुर्विद्यासुद्धा चांगली येते, तुम्हाला द्रोणांनी ते सगळे शिकवले आहे. पांडवांशी लढताना ते पांचालांचे सैन्य मारू शकाल. मी तुझ्या लष्काराचा प्रमुख पांडवांचे सगळे सैन्य मारू शकतो. परंतु तसें मी बोलणे आत्मप्रौढी केल्यासारखे होईल म्हणून बोलणार नाही. तू मला ओळखतोस. माझी ताकद तू जाणतोस. भोज राजा कृतवर्मन अतिरथी आहे निःसंशय. तो तुझे काम ह्या लढाईत करून दाखवेल असे मी समजतो. त्याला कोणीही नमवू शकणार नाही. तो

हजारांनी योद्धे मारून टाकणार आहे. जसे इंद्राने दानवांना मारावे तसे तो करणार आहे ह्या लढाईत. मद्र देशाचा राजा सल्य अतिरथी आहे तो स्वताला वासुदेवाच्या बरोबरीचा समजतो. त्याने तुझा बाजू घेतली आहे. तो पांडवांच्या महारथांना भिडणार आहे ह्या लढाईत. त्याची बाणफेक विलक्षण आहे. सगळे आकाश त्याच्या बाणांनी भरून जाते. त्यानंतर आहे भुरिश्रव सोमदत्ताचा मुलगा. तो तुझा एक चांगला हितचिंतक सुद्धा आहे. तो रथांचा प्रमुख आहे. तो पांडवांच्या सैन्याची दैना करून टाकील ह्याबद्दल मला शंका नाही. सिंधचा राजा जयद्रथ माझ्या अंदाजाने दोन रथा एवढा आहे. तो लढणार आहे तुझ्या बाजूनी. तो पांडवांचा पाडाव करू इच्छितो कारण जेव्हां त्याने द्रौपदीला पळवून नेण्याचा प्रयत्न केला होता तेव्हां पांडवांनी त्याची नाचक्की केली आहे. त्याचा तो सुड घेण्याच्या मनस्थितीत आहे. त्याने घोर तप करून कांहीं वर मिळवले आहेत. ती ताकद तो ह्या युद्धात वापरेल असें वाटते. जीवाची पर्वा न करता तो लढेल असें मला वाटते.

रथ तीर्थ संख्यान पर्व भाग एकशे सहाष्ठावा संपला.

## रथ तीर्थ संख्यान पर्व

## भाग एकशे सदुसष्ठावा

भिष्म पुढे त्याला सांगतो, सुधाक्षिण हा कंबोजचा राजा माझ्या मते रथी आहे. तुझ्या साठी तो तुझ्या शत्रूशी लढेल. कौरवांना त्याचे शौर्य पहावयास मिळेल ह्या युद्धात. तो इंद्रासारखा लढेल. त्याचे सैन्य सगळ्या रणांगणात टोळधाडी सारखे थैमान घालेल व पांडवांच्या फौजांना सळो की पळो करून टाकील. महिष्मती देशातून आलेले निळया पेहरावात वावरणारे नील तुला भावासारखे आहेत. त्याचे रथी पांडवांचा विध्वंस करतील अशी मला अपेक्षा आहे. त्यांना सहदेवाशी वैर आहे पहिल्या पासून जेव्हां तो राजसूय यज्ञासाठी त्यांच्यावर आक्रमण करून गेला होता. विंद आणि अनुविंद जे अवंतीचे आहेत, ते चांगले रथ आहेत. तो दोघे पांडवांच्या फौजांचा सपाटा करतील. त्याची शस्त्रे आहेत, गदा, छोटे भाले, तलवारी, मोठे भाले. त्यांच्या फौजेच्या मध्ये राहून ते दोघे हत्तीसारखे शत्रूवर वार करतील. त्रिगर्ताचे पांच पुत्र चांगले रथ आहेत. कुंतीच्या मुलांनी त्यांना विराटाच्या युद्धात चांगलेच डिवचले होते. त्याचा वचपा ते आता काढतील असे वाटते. गंगेत वावरणाऱ्या मगरी प्रमाणे ते पांडवांच्या फौजा कापून टाकतील असें वाटते. त्यांच्यातील सत्यरथ जो त्यांचा प्रमुख आहे, सूड उगवणारा आहे. तो पांडवांना कधीच विसरू शकत नाही, त्याचा तुला उपयोग होईल असें मला वाटते. बरेच महारथ जे पांडवांच्या बाजूने लढत आहेत, त्यांना जिंकणे सोपे नाही तरी तुझा मुलगा लक्ष्मण आणि दुःशासनाचा मुलगा ते दोन वाघ त्यांच्यावर तुटून पडतील. ते आपल्यातील देन रथ आहेत. क्षत्रिय वर्गाच्या कर्तव्याला ते जागतील व चांगले लढतील. तो दंडधर महाबली आहे. तो एक रथ आहे. त्याचे सैनिक त्याच्या भोवती त्याला संरक्षण देत असतात. कोसलचा अधिपती वृहद्बल माझ्या मते रथ आहे. तो धृतराष्ट्राचा चांगला मित्र आहे. तुमचा शिक्षक कृप, म्हणजेच सरद्वताचा मुलगा, जीवाची पर्वा न करता लढणार आहे. साक्षात कार्तिकेय असा तो लढतो. पांडवांचे मोठे सैन्य तो धुळीला मिळवेल. अग्नीसारखा तो त्या रणभूमीत फिरत असेल.

रथ तीर्थ संख्यान पर्व भाग एकशे सदुसष्ठावा संपला.

# रथ तीर्थ संख्यान पर्व

## भाग एकशे अडुसष्ठावा

भिष्म पुढे सांगत असतात, रथातून तिरंदाजी करणाऱ्या क्षत्रियांच्या शौर्याची तारिफ अशा संज्ञानी केली जाते जसे, रथ, महारथ, अतिरथ, दसरथ, शतरथ, सहस्त्ररथ वगैरे. कांहींच्या जातींना ती नांव पडली आहेत कारण त्या क्षत्रिय कुळांत सगळेंच त्या किताबाला योग्य असतात. जसें महारथ, (महार). जे ह्या युद्धात पांडवांच्या बाजूने आहेत. त्यांतील विंद व प्रविंद फार मोठे महारथ आहेत. ते आजवर कधीच हरलेले नाहीत. पुढे सांगावयाचे दुर्योधनाला कीं, तुझा मामा शकूनी रथी आहे. त्याच्यामुळे कुरु घराण्यात दुष्मनीची बिज पेरली गेली, त्यालासुद्धा लढावे लागेल. त्याचे सैन्य जोरदार आहे. त्यांचा हल्ला करतानाचा वेग वाऱ्यासारखा असतो. महाबली अश्वत्थामा द्रोणांचा मुलगा, एक महारथ आहे. त्याची पद्धत गोविंदा सारखी आहे. जर तो मनात आणील तर सगळी पृथ्वी तो त्याच्या बाणांनी भरून टाकू शकतो. तपस्या करण्यात व्यस्त असलेला तो युद्धात तितकांच तेज असतो. त्याच्यावर त्याच्या पित्याची विशेष कृपा असते. परंतु, त्याच्यात एक दोष मला दिसतो, म्हणून मी त्याला रथ किंवा महारथ समजत नाही. त्याला जगण्याचा फार शौक आहे. जीवन त्याला अतिप्रिय आहे. दोनही पक्षांच्या सैन्यात त्याच्यापेक्षा श्रेष्ठ मला कोणी दिसत नाही. तो एका रथातून देवांचा पराभव करू शकतो. त्याच्या मंतरलेल्या बाणांच्या फटक्याने तो पर्वत दुभंगू शकतो. तो यमासारखा ह्या रणभूमीवर फिरणार आहे. युगांताच्या अग्नी सारखा तो तेथे दिसेल. त्याचे पिता मोठे योद्धे आहेत जरी आता त्यांचे वय झाले आहे. एका जागी राहून तो युधिष्ठाराचे मोठे सैन्य बरबाद करील. पांडवांचे सैन्य सुकलेल्या गवता सारखे पेट घेईल व त्याच्या मंतरलेल्या बाणांच्या मारांने ते जळून जातील. तो अनेक रथा व महारथींचा मार्गदर्शक असेल. तो श्रींजयांच्या फौजा नष्ट करील. परंतु, धनंजय त्याला तो प्रिय असल्याने त्यांच्यात युद्ध होणार नाही. त्याला पार्थाच्या कर्तृत्वाचा फार अभिमान आहे हे तुला माहीत असेलच. त्याचे अर्जुनावर त्याच्या स्वताच्या मुलापेक्षा जास्त प्रेम आहे. त्याच्याकडे असलेल्या दैवी आयुधांच्या मदतीने तो सगळे देव, गंधर्व, मनुष्य ह्यांचा पराभव करू शकतो. ते तुझ्या सैन्यातूल एक महारथ आहेत. ते युद्धात पांचालांची फौज नष्ट करतील. प्रसिद्ध युवराज वृहद्व्रत, रथ आहेत. तो शत्रूच्या सैनिकांसाठी यमासारखाच असतो. तो रणभूमीवर साक्षात मृत्यू असा फिरणार आहे. वृषसेन कर्णाचा मुलगा, महारथ आहे. तुझ्या शत्रूचे मोठे नुकसान तो करील ह्या युद्धात. जलासंध तुझ्या सैन्यातील एक रथ आहे. तो मधूच्या कुळात जन्मलेला आहे. तो घोड्याप्रमाणे हत्तीवर बसूनही लढू शकतो. तो माझ्यामते रथ आहे. वल्हीक ज्याला युद्धांचा बराच अनुभव आहे ते अतिरथ आहेत. तो जिंकूनच परत येणाऱ्यांपैकी आहे. त्याचे युद्ध कौशल्य पहाण्यासारखे आहे. सत्यवान तुझ्या बाजूचा महारथ आहे. त्याच्या वाटेत जे येतात त्यांना तो कंठस्नान घालतोच अशी त्याची ख्याती आहे. राक्षसांचा मुख्य अलंबुश अतिशय क्रूर आहे. तो

महारथ आहे. त्याची पांडवांशी जुनी दुष्मनी आहे. त्याकारणाने तो तुझ्या मोठ्या कामाचा आहे. सगळया राक्षस योद्ध्यात तो श्रेष्ठ आहे. राक्षसांची भ्रमविद्या त्याला चांगली अवगत आहे. तो भागादत्त जो प्रागज्योतिषचा राजा आहे. त्याचे काय वर्णवे. तो हत्तावरून लढण्यात प्रवीण आहे. तो रथातूनही चांगला लढतो. एकदा गांडीव धारी आणि ह्याची लढाई झाली होती, भागादत्त स्वताला इंद्राचा मित्र समजतो, त्यांने अखेरीस इंद्राच्या मुलाशी दोस्ती करणे पसंत केले असा इतिहास आहे. तो पांडवांच्या विरुद्ध थेट नाही लढणार हे तू समजून रहा.

रथ तीर्थ संख्यान पर्व भाग एकशे अडसष्ठावा संपला.

# रथ तीर्थ संख्यान पर्व

## भाग एकशे एकोणसत्तरावा

भिष्म पुढे सांगतात, अचल आणि विचल दोघेही रथ आहेत. ते रणांगणावर अजिक्य असतात. ते तुझ्या शत्रूसेनेला मारतील. ते गंधर्व त्यांच्या रागीट स्वभावामुळें युद्धात फार भयंकर हेतात. ते गंधर्व असल्यामुळे नेहमी तरुण आणि देखणे आहेत. त्यांना पांडवांशी लढण्याची मोठी हौस आहे म्हणून ते तुला पांडवांशी वैर करण्यासाठी प्रोत्साहीत करत असतात. तुझ्या सल्लागारात तो हलकट मुलगा आहे जो सूर्यापासून कुंतीला झाला. अशी चांडाळचौकडी आहे ज्यांनी पांडवांशी लढण्यासाठी तुला वापरले आहे. कर्ण रथ अथला अतिरथ एका कोणीही नाही हे लक्षात ठेव. कर्णाची कर्ण कुंडल आणि कवच गेलेली आहेत आणि त्याला त्याच्या गुरूचा शाप सुद्धा आहे त्यांमुळें तो ह्या युद्धात कांहींच करू शकणार नाही हेसुद्धा तू लक्षात ठेव. तो त्याच्या जन्मदात्रीचा द्वेष करतो त्यामुळे लोकपाल देवतासुद्धा त्याच्यावर नाराज आहेत. अशा परिस्थितीत माझ्या मते कर्ण फक्त अर्धा रथ आहे. ह्या युद्धात तो जेव्हां अर्जुनाला सामोरी जाईल तेव्हां तो त्याची विद्या विसरेल त्या शापांमुळें व त्यातच त्याचा नाश होणार आहे. म्हणून धृतराष्ट्राच्या मुला, तू त्याच्यावर फार विसंबून राहू नकोस. भिष्मांचे ते उद्गार ऐकून तेथे बसलेले द्रोण बोलतात, मलासुद्धा तसेंच वाटते. ते खरे होणार आहे. आतापर्यंत तो नेहमी प्रत्येक वेळी मोठ्या गोष्टी करतो परंतु, आयत्या वेळी तो माघार घेतो असे मी पाहिलेले आहे. मलासुद्धा वाटते कीं कर्ण फक्त अर्धा रथ आहे. कर्ण ते ऐकत असतो. त्याला राग येतो. त्याचे डोळे रागांने लालेलाल होतात. भिष्माला कठोर सब्दात तो बोलतो, "अहो आजोबा, मी जरी निष्पाप असलो तरी तुम्हाला माझ्यावर राग असतो, तुम्हाला जसे वाटेल तसे तुम्ही मला बोलत असता. ते मला बाणासारखे टोचत असतात. तुम्हाला त्यात नेहमीच मजा वाटते हे मी समजतो. मी ते नेहमी सहन करत असतो. कारण मी दुर्योधनाला फार मानतो त्याचे तुम्ही आजोबा अहात म्हणून. मला अर्धा रथ सांगून मी निरर्थक आहे असे तुम्ही दाखवण्याचा प्रयत्न करत अहात हे मला समजते. मला भित्रा शाबीत करण्याचा आपला प्रयत्न मी सहन करणार नाही. मी खरेतेंच बोलत आहे. माझ्या मते तुम्ही सगळया जगाचे दुष्मन अहात विशेष करून कौरवांचे, परंतु, राजाला (दुर्योधनाला) ते माहीत नाही. कोण ह्या सगळया योद्ध्यांत फरक करून त्यांचे नैतिकबळ कमी करण्याचा प्रयत्न करील दुष्मनाशिवाय"? तुम्ही ते करत अहात कारण तुम्ही कौरवांचासुद्धा द्वेष करत अहात पण असें दाखवता कीं, तुमच्या मनात त्यांच्याबद्दल भारी प्रेम आहे. अहो कौरवा, एकाद्याला तुम्ही महारथ कसे सांगता, कारण त्याचे वय झाले कां त्याच्या चेहऱ्यावर सुरकूत्या पडल्या कां त्याच्याकडे संपत्ती आहे कां त्याच्याकडे मित्र आहेत? क्षत्रियाचे खरे मोजमाप त्याच्या क्षात्रतेजानेच होत असते, जसें ब्राह्मणांचे त्याच्या मंत्रसामर्थ्याने वैश्याचे संपत्तीने व शुद्राचे त्याच्या वयाने होत असते. केवळ लोभीपणामुळें व माझ्याबद्दलच्या मत्सरामुळें तुम्ही तुमच्या

विकृत मनाने रथ, महारथ, अतिरथ ह्यांचे वाटप तुमच्या सोईनुसार करत अहात, त्यात अजिबात तथ्य नाही. अरे दुर्योधना तुझे भले हो, पण ह्याचे अंदाज घेऊन तू जर कांहीं ठरवत असशिल तर सावध हो, एवढेंच मी सांगेन. ह्या हलकट म्हाताऱ्याचा तू नाद सोड कारण तो तुझे भले चिंतीत नाही. त्याची कृपा कोणावर आहे ते तुला मी सांगावयास नको. ह्याच्या ह्या अशा चुकीच्या वर्गीकरणाने जर तुझे राजे बिथरले तर ह्या युद्धात तुला जिंकणे मुष्कील जाईल हे लक्षात घे. लक्षात घे माझ्या मित्रा, जयाबद्दलचा संशय आधीपासून तुझ्या राजांच्या मनात भिनवला जात आहे, त्यात ह्याच्या ह्या चुकीच्या वर्गीकरणाने भर पडणार आहे. भिष्माने आपले बळ कमी करण्याचा प्रयत्न सुरू केला आहे असे समज. तुझ्या समक्ष तो राजांत फुट पाडत आहे व तुझ्या ते ध्यानात येत नाही ह्याचे मला वाईट वाटते. रथांचा दर्जा ठरवण्यात हा अज्ञानी कमी पडत आहे. मी एकटा पांडवांना पुरेसा आहे हे तो मान्य करत नाही. कारण ते जर मान्य केले व त्याप्रमाणे गोष्टी केल्यातर तुझे यश पक्के होईल व तेंच ह्या म्हाताऱ्यांना नको आहे. पांचाल व पांडव माझ्या बाणांपुढे टिकणार नाहीत हे खरे असले तरी ते हा मान्य करण्यास तयार नाही. युद्ध जिंकण्यासाठी चांगला सल्लागार असावा लागतो, असा हलकट माणूस त्या कामाचा नाही हे राजा ध्यानात ठेव. तो त्यांच्या बाणानी मरण्याचीच स्वप्न पहात आहे असें वाटते. तो जमाना होता तेव्हां हा मोठा वीर होता, मानतो पण आता काळ बदललेला आहे. हा म्हातारा मरण्यासाठी उद्या लढाईला जाणार आहे, जिंकण्यासाठी नाही हे तू समजून घे माझ्या राजा. शास्त्र सांगते की वृद्धांचे ऐकावे पण ते वृद्ध कोणते तेसुद्धा पहावयाचे असते. जो त्याची सारासार बुद्धी घालवून बसला आहे जो लहान मुलासारखा झाला आहे अशांचा नाही. मी पांडवांचा एकट्याने फडशा पाडू शकतो पण ते हा मान्य करणार नाही कारण ते केले तर तू मला अधिकार देशिल मग पांडवांचे कोण हित पाहिल? तू त्यांच्या त्या पराक्रमाकडे पाहून त्याला सरसेनापती केले, जर यश प्राप्त झाले तर त्याडे श्रेय त्यांना जाईल त्यांच्या हाताखाली काम करणाऱ्याना नाही. म्हणून मी सांगतो कीं, जोवर हा हरामखोर तुझ्या सैन्याचा अधिपती आहे मी त्याच्या हाताखाली लढणार नाही. कारण तो मला खच्ची करण्याचा वारंवार प्रयत्न करील व माझे मनोबळ नष्ट करण्याचा प्रयत्न करील कारण त्याला अरे मित्रा पांडवांना जिंकवण्याचे आहे. मात्र माझ्या मित्रा, जेव्हां हा म्हातारा मरेल तेव्हां मी युद्धात प्रवेश करीन व तुला जिंकवून दखवीन. मी त्या सगळया महारथांना हरवून यश तुझ्या पदरात घालीन".

ते ऐकल्यावर भिष्म बोलतात, ह्या युद्धाचे ओझे जे एकाद्या सागरा सारखे अवाढव्य आहे माझ्या कडे सोपवलेले आहे. मी ह्या युद्धाचा फार पूर्वीपासून विचार करत आहे. मी आपल्यात यादवी करणार नाही. म्हणूनच हा सुताचा मुलगा अजून जीवंत आहे. मी जरी वयाने वृद्ध असलो तरी चांगलाच तरूण सुद्धा आहे हे लक्षात असू द्या. मी तुझी युद्धची इच्छा मोडून टाकीन आणि तुझे जगणे मुष्कील करून ठेवीन लक्षात असू दे तुझ्या गुरूला रामाला जो जमदाग्नीचा पुत्र होता

हरवले आहे. तू माझे काय वाकडे करणार आहेस ते सांग. जे खरे असतात ते कधी स्वताची तडफदारी स्वतः करत नाहीत जशी तू नेहमी करत असतोस. त्या विचित्रवीर्याच्या स्वयंवराच्या समयी मी सगळ्या राजांना एकटा हरवून काशीच्या तीन मुली आणल्या होत्या ते वसरलास कां"? आता कौरवांवर मोठे संकट येत आहे, त्यात आपल्या शत्रूला मारण्याचे काम करण्याचे सोडून तू युद्धाबाहेर रहाण्याचा निर्णय केला आहेस, तेथे पार्थाबरोबर लढण्याची तुला मी संधी देणार आहे ज्याला तू हमेशा आव्हानं देत असतोस. मला तू त्यातून कसा लढतोस ते पहावयाचे आहे.

राजा दुर्योधना, त्यावर भिष्माना सांगतो, "अहो सरसेनापती, माझ्याकडे पहा, आपल्यासाठी काय हिताचे आहे ते पहा, छोट्या वादांत जाऊ नका. आपण दोघे मला खूप महत्वाचे अहात. तेव्हां हा वाद येथेच थांबवा. मला सांगा तुमच्या मते शत्रूपक्षातील योद्धे कोणत्या योग्यतेचे आहेत. कोण अतिरथ आहेत, कोण रथ, कोण महारथ आहेत ते तुमच्या अंदाजाने ते मला समजून घ्यावयाचे आहे. मला सांगा, माझ्या शत्रूपक्षात बळाची बाजू व कमजोरीची बाजू कशी आहे. आता आपल्याकडे फार कमी वेळ उरला आहे, तेव्हां ते सगळे मला समजून त्याप्रमाणे पुढील योजना आखाव्या लागणार आहेत.

रथ तीर्थ संख्यान पर्व भाग एकशे एकोणसत्तरावा संपला.

## रथ तीर्थ संख्यान पर्व

## भाग एकशे सत्तरावा

भिष्म सांगू लागतात, "अरे राजा, आपल्यातील कोण रथ कोण अर्ध रथ आणि कोण अतिरथ व महारथ आहेत ते पाहिले. आता पांडवांतील रथ, महारथ, अतिरथ कोण ते सांगतो कारण त्यांच्यात अर्धरथ कोणीही नाही. तुला उत्सुकता आहे म्हणून सांगतो. स्वता राजा युधिष्ठीर रथ आहे. तो जेव्हां लढेल तेव्हां तळपत्या आगीसारखा रणभूमीवर फिरेल. भिमसेन अरे राजा, आठ रथ एवढा जबरदस्त आहे. तो गदेने अथवा बाणाने कोणालाही भारी जाणाऱ्यापैकी आहे. त्याच्यात हजार हत्तींचे बळ आहे. त्याच्या अभिमानात दिव्यता आहे. तो एकाद्या महापुरूषासारखा आहे. माद्रीची दोन मुलं आश्विनी, महाशक्तिमान आहेत. त्यांना जो त्रास तू दिला आहेस त्याच्या सुडाने ते रणभूमीत इंद्रासारखे फिरणार आहेत. ते सगळे पंडुची मुलं पवित्र प्रवृत्तीची आहेत. ते इतरापेक्षा जास्त उंच आहेत. सगळेच शूरवीर योद्धे आहेत. ते सगळे ब्रह्मचर्य पाळणारे आहेत. व्रतस्थ जीवन जगत आले आहेत. त्यांच्यात वाधाची ताकद आहे. त्यांची क्षमता सामान्य माणसापेक्षा निराळी आहे. ते सगळेच विश्र्व जिंकण्यासाठी जातील तर सगळया राजांना लिलया पराजित करतील. त्याच्याशी गदा, बाण, भाला कशांनेही कोणी जिंकू शकणार नाही. जेव्हां तुम्ही शिकत होता तेव्हा तुला माहीत असेल ते तुम्हा सगळ्यांना माती खावयाला लावत होते. तेह्या युद्धात मोठी मजल मारणार आहेत. म्हणून त्यांच्याशी झगडा करून तू मोठी चूक केली आहेस. पण तू आमचे ऐकत नाहीस, तुझे व आम्हा सर्वांचे दुर्दैव. राजसुय यज्ञाच्या वेळी तू पाहिले असशिल ते कसे राजांना पराजित करत होते. त्यांचा सपाटा विलक्षण होता. द्रुपदाला त्यांनी कसे हरवले व द्रोणांची दक्षिणा दिली ते सुद्धा तुला आठवत असेल. तुम्ही त्याना हरवले त्यापेक्षा त्यांचा विनाकारम अपमान केला जे सुसंस्कृत समाजात न बसणारे होते. त्याशिवाय त्यांच्या पत्नीचा उपमर्द केला गेला असें कधी शंतनुच्या घरात होईल असें वाटले नव्हते. त्यानंतर तो रानावनात रुद्रा सारखे वैरागी होऊन भटकत होते, त्यामुळें त्यांची दैवी शक्ती कमालीची वाढली आहे. गुडाकेश ज्याचे डोऴे लाल आहेत, ज्याला सदैव नारायणाची साथ असते, त्याच्याशी बरबरी करू शकेल असा कोणी रथी दोनही पक्षात मला आढळत नाही. माणसं सोड, राक्षस, यक्ष, उरुग, असुर, अशा कोणत्याही प्रजातीच्या वीराला तो झेपणारा नाही. ह्या आधी व ह्यानंतर भविष्यात सुद्धा त्याच्या तोडीचा योद्धा होणे नाही. त्यात भर म्हमजे त्याच्याकडे गांडीव आहे. त्याचा सारथी साक्षात वासुदेव आहे, त्याचे घोडे खास आहेत, त्याच्या रथावर एक विलक्षण सामर्थ्य असलेला ध्वज आहे ज्यातून दैवी प्राणी जे विचित्र आहेत व सिद्धसुद्धा आहेत ते त्याला मदत करत असतात. त्याच्या भात्यातील बाण कधीच संपत नाहीत. त्या चिलखत स्वर्गीय म्हणून अभंग आहे. त्याच्याकडे रुद्र, यम, वायू, कुबेर आणि इंद्र, वरुण अशा लोकपालांची आयुध आहेत. त्या भयंकर आयुधां बरोबर इंद्राचे वज्र त्याच्या कडे आहे, अशा बरोबर कोण लढू शकेल ते तूंच पहा. त्यांने

एकट्याने हजारो दानवां मारले आहे जे हिपण्यपुरात रहात होते. रागाने भडकलेला तो तुझ्या सगळ्या फौजांचा पुरता नाश करून टाकणार आहे. मी स्वतः व द्रोण धनंजयावर चालून जाऊ शकतो इतर कोणाची तेवढी कुवत नाही. कर्णाची तर नाहीच नाही. जेव्हां तो युद्धात त्याचे बाण पावसा सारखे फेकत जाईल तेव्हां ते तू पहात रहाशिल. आम्ही दोघे आता वृद्ध झालो आहोत, त्याच्या बरोबर लढण्यासाठी जो दम लागतो तो आम्हा दोघात आता उरलेला नाही. तसेंच आम्ही दोघे त्याच्यावर पहिला वार करणार सुद्धा नाही व तोसुद्धा आमच्यावर वार करणार नाही, म्हणजे आमच्यात द्वंद्व होण्याची शक्यता नाही".

वैशंपायन पुढे सांगतात, भिष्माचे ते उद्गार ऐकून दुर्योधनाच्या छातीची धडकन वाढते. त्याला पंडुच्या मुलांची हिम्मत चांगलीच माहीत होती, त्याला त्याच्या पक्षाचा नाश होतो आहे हे जाणवू लागले. त्याचे राजे जे दागिन्याने सजलेले व चंदनाच्या गंधाने माखलेले रणभूमीवर कोसऴत असलेले त्याला जाणवू लागले.

रथ तीर्थ संख्यान पर्व भाग एकशे सत्तरावा संपला.

# रथ तीर्थ संख्यान पर्व

## भाग एकशे एकाहत्तरावा

भिष्म पुढे सांगतात, द्रौपदीची पांचही मुलं महारथ आहेत. विराटाची मुलं रथ आहेत. महाबली अभिमन्यू जो एका फौजेचा प्रमुख आहे तो त्याच्या पित्या सारखाच किंवा कृष्णासारखाच शूर आहे. तो शस्त्रविद्येत पारंगत आहे, तो व्रतस्थ जीवन जगणारा आहे, त्याशिवाय त्याच्या पित्याने व कांकांनी जे भोगले त्याचा त्याला राग आहे म्हणून तो मोठ्या त्वेषाने तुझ्या फौजांचा चुराडा करणार आहे ते तू पहाणार आहेस. तो शूरवार सत्यकी, मधूच्या वंशाचा आहे, त्यांच्या सैन्याचा प्रमुख सुद्धा आहे. तो वृश्नीकुळांच्या सामर्थ्याची प्रचीती दाखवेल. उत्तमोज सुद्धा रथी आहे. माझ्या अंदाजाप्रमाणे युधमन्यू मोठा धाडशी आहे. त्यांचे सगळे राजे कुंतीच्या मुलांवरील प्रेमामुळे जीवाची बाजी लावून लढणार आहेत. पांडवांच्या साथीने ते तुझ्या फौजांचा विध्वंस करून टाकणार आहेत हे मला दिसत आहे. युद्धा कधी न हरलेले विराट, द्रुपद जे दोघे महारथ आहेत तुझ्या सैन्याची धुळधाण करणार आहेत. ते शुद्ध क्षत्रिय नियमांनुसार काम करत असतात. जो मार्ग आधीच्या पूर्वजांना आखून दिला आहे त्याप्रमाणे ते जाणारे आहेत. त्यांचे पांडवांशी जवळचे नाते आहे तेसुद्धा त्यांना वेगांने लढण्यास उद्युक्त करणार हे निश्चित. अरे राजा, ते पांडवांवरील प्रेमाने ह्या युद्धासाठी लढत आहेत. म्हणून त्याच्या शैर्यात वेगळा तिखटपणा आलेला तुला दिसणार आहे उद्याच्या युद्धात. एका ध्येयासाठी ते ह्या युद्धात त्यांच्या जीवाची बाजी लावणार आहेत. तुझ्या योद्ध्यांचा ते संहार करणार आहेत हे तू पहाणार आहेस. मला ते सगळे स्पष्ट जाणवत आहे म्हणूनते सांगत आहे. उद्या ते त्यांच्या अक्षौहीणी सैन्यानिशी पांडवांसाठी प्राणपणाने लढून तुझा नाश करतील हे तू तुझ्या डोळ्याने पहाणार आहेस.

रथ तीर्थ संख्यान पर्व भाग एकशे एकाहत्तरावा संपला.

# रथ तीर्थ संख्यान पर्व

## भाग एकशे बाहत्तरावा

भिष्म पुढे बोलतात, तो दुष्मनांच्या नगरांचा नाश करणारा शिखंडी, पांचालचा राजपुत्र, माझ्या मते युधिष्ठीराच्या सेनेतील एक रथी आहे. त्याचे लिंग बदलले आहे व त्या जोमाने तो लढून मोठी ख्याती मिळवणार आहे. अरे भारता, त्याची फौज फार मोठी आहे. त्यात पांचाल आणि प्रभद्रकांचे सैन्य आहे. त्याच्या कडील रथाचे दल मोठा पराक्रम करणार आहे. दृष्टद्युम्न युधिष्ठीराच्या लष्कराचा प्रमुख जो द्रोणांचा शिष्यसुद्धा आहे, माझ्या मते अतिरथी आहे. सर्व सैन्यांचा सपाटा करून तो पिनाकधारी शंकरासारखा त्या रणभूमीवर चमकेल. मोठे योद्धे त्याची तारिफ करतील. क्षत्रधर्मन दृष्टद्युम्नाचा पुत्र, जरी लहान असला व अननुभवी सुद्धा तरी तो एक रथ एवढा असणार असें मला वाटते. पांडवांचा आप्त, धृष्टकेतू शिशुपालाचा मुलगा, छेड्डीचाराजा, महारथ आहे. तो महारथ क्षात्रदेवापेक्षा जास्त पराक्रम करून दाखवेल. जरी क्षात्रदेव क्षत्रिय परंपरेचा असला तरी तो फक्त रथी आहे. पांचालांपैकी, जयंत, अमितौज, आणि सत्यजित हे सगळे महारथ आहेत. ते सगळे हत्तीच्या जोशांने ह्या युद्धात लढणार आहेत. अज आणि भोज दोघे महारथ आहेत. त्यांच्या सगळया सामर्थ्याने ते पांडवांसाठी लढणार आहेत व ते तुझ्या सैन्याची धुळधाण करणार आहेत. त्याची हिम्मत विलक्षण आहे. त्यांचा शस्त्रांचा अभ्यास चांगला आहे. त्यांतील पांच क्षत्रिय बंधू ज्यांच्या रथावर रक्ताच्या रंगाचे ध्वज फडकत असतील, ते रथी आहेत. काशिक, सुकुमार, नील, आणि सूर्यदत्त म्हणजेच मदिरास्व हे सगळे रथी आहेत. वर्धक्षेमी माझ्या अंदाजाने महारथ आहे. राजा चित्रायुध एक उत्तम रथी आहे. तो अर्जुनाचा भक्त आहे. चेकीतन, सत्यधृती दोघे रथी आहेत. व्याघ्रदत्त आणि चंद्रसेन उत्तम पर्कारचे रथी आहेत. सेनाविंदू ज्याला क्रोधहंत्री असेंसुद्धा म्हणतात, जो वासुदेवासारखा समजला जातो तो भिमसेनाच्या बरोबरीचा आहे. तो तुझ्या लष्कराचा नाश करणार आहे. तुझ्या सैन्यातील माझेच रुप असा द्रोण आहे, त्याप्रमाणे कृप सुद्धा त्यांचे काय सांगावे मी. कास्य त्याच्या चपळ हालचालीने शत्रूचा विनाश करणार आहे. द्रुपद जो नगरांचा नाश करणारा म्हणून ख्यातनाम आहे ते सगळे रत आहेत. द्रुपदाचा मुलगा सत्यजित, आठ रथ आहे. तो दृष्टद्युम्नाच्या तोडीचा आहे. तो पांडवांची किर्ती पसरवणारा आहे. राजा पांड्य जो पांडवांचा भक्त आहे त्याचे क्षात्रतेज रथी सारखे आहे. महान तिरंदाज धृदधन्वन आणखीन एक महारथ आहे. त्याशिवाय श्रेनिमत आणि राजा वासुदेव बरोबरीचे आहेत. माझ्यामते ते दोघे अतिरथ समजले गेले पाहिजेत.

रथ तीर्थ संख्यान पर्व भाग एकशे बाहत्तरावा संपला.

## रथ तीर्थ संख्यान पर्व (संपले)

## भाग एकशे त्र्याहत्तरावा

भिष्म पुढे बोलतात, राजा रोचमन एक महारथ आहे. तो देवांसारखा तुझ्या फौजां कापून काढील. अरे भरता, तो शत्रूंचा नाश करणारा महान योद्धा कुंतीभोज, पांडवांचा मामा, अतिरथी आहे. तो तिरंदाज युद्धकलेत प्रवीण आहे. ह्या लढाईत तो इंद्रासारखा लढेल. त्याचे सगळे सैनिक चांगले प्रशिक्षित आहेत. त्यांच्या नेमणूका पांडवांच्या संरक्षणासाठी त्यांच्या सभोवार केलेल्या आहेत. ते चांगुलपणाचे नियम पाळतात. त्यात भेद करणे त्याना मान्य नसते. जो ते नियम मोडतो त्याला ते शासन करतात. तो त्याच्या बहिणीच्या (कुंतीच्या) बल्यासाठी ह्या युद्धात उतरला आहे. त्यानंतर आहे, घटोत्कच, भिम व हिडींबाचा पुत्र तो राक्षस कुळाचा समजला जोतो व त्याप्रमाणे त्याच्या कडे मायावी सिद्धी उपजत आहे. त्याचा उपयोग तो चांगल्या कामासाठी करत असतो. तो सगळया रथ दलाचा मुख्य आहे. त्याच्या गोटात त्याचे मित्र राक्षस आहेत. ते त्याला ह्या युद्धात मदत करणार आहेत. वासुदेवाच्या आज्ञेत कांहीं राजे आहेत, ते सगळे रथ, अर्ध रथ, अतिरथ असे आहेत. ते ह्या युद्धात सैन्याचे नेतृत्व करणार आहेत. त्यांची माहीती मी तुला सांगितली. ज्या सैन्याचे आणखीन संरक्षण धनंजय सुद्धा करत असेल त्याच्या दैवी आयुधांच्या मदतीने. भ्रमसिद्धी व यशाच्या तीव्र इच्छेने प्रेरीत असे ते मोठ्या उत्साहाने लढणार आहेत. मला त्यांच्याशीच लढावे लागणार आहे. धनंजय गांडीवाने व कृष्ण त्याच्या न दिसणाऱ्या सुदर्शन चक्राने युद्धात भाग घेणार आहेत हे मी जाणून आहे. मला त्याशिवाय युधिष्ठीराचे रथ वीर जे त्यांच्या फौजांचे नेतृत्व करणार, त्यांना उत्तर द्यावयाचे आहे. रथ आणि अतिरथ मी तुला सांगितले जे दोनही पक्षांतून लढणार आहेत. त्याशिवाय अर्ध रथ सुद्धा आहेत कर्णासारखे कौरवांच्या लष्करात आहेत. उद्याच्या लढाईत माझी नजर त्यान सगळया शूरवीरांवर असेल. कांहींचे कौतुक करत व कांहींच्यावर रागावत मी तुझ्या सैन्याची पाठराखण करणार आहे. परंतु, मी पांचालचा राजपुत्र शिखंडीवर वार करणार नाही. जरी मी त्याला माझ्याअंगावर येतांना पाहिले तरी. मी माझ्या पित्याच्या इच्छेखातर राज्याचा त्याग केला व ब्रह्मचर्य आजन्म पाळले, त्याच्या मृत्यूनंतर मी चित्रंगदाला गादीवर बसवले. त्याचा मुलगा विचित्रवीर्य युवराज झाला सत्यवतीच्या आज्ञेने व माझ्या प्रेरणेने. सगळया राजांना माहीत आहे कीं, मी कधीही कोण्या बाईवर हात उगारणार नाही कारण ते आपल्या नैतिक तत्त्वानुसार निषिद्ध समजले जाते. अरे दुर्योधना तुला माहीत असेल कीं हा शिखंडी जन्मला एक स्त्री म्हणून. जन्मानंतर त्या मुलीचे मुलात रुपांतर झाले. म्हणून मी त्याच्याशी दोन होत करणार नाही त्यासाठी मी मेलो तरी चालेल पण मी माझ्या सावत्र आईला दिलेले वचन कदापिही मोडणार नाही. आणखीन एक गोष्ट तुला सांगतो कीं, मी पंडुच्या कोणत्याही मुलावर वार करणार नाही.

रथ तीर्थ संख्यान पर्व भाग एकशे त्र्याहत्तरावा संपला.

# अंबा उपाख्यान पर्व (सुरू)

## भाग एकशे चौऱ्याहत्तरावा

दुर्योधन विचारतो, असें कोणते कारण झाले कीं, अहो आजोबा तुम्ही शिखंडीवर वार करणार नाही ते मला सांगा. तुम्ही मला सुरूवातीला सांगितले होते कीं, तुम्ही पांचालांचा व सोमकांचा वध करणार, मग आता असें काय. झाले कीं आपण आपला विचार बदलला.

भिष्म सांगू लागतो, ऐक दुर्योधना, शिखंडीला न मारण्या मागे एक इतिहास आहे तो तुला सांगतो. तुला माहीत आहे कीं माझे पिता सर्व जगात त्यांच्या गुणांमुळें ख्यातनाम होते. त्यांच्यासाठी मी त्यांच्या दुसऱ्या पत्नीच्या पित्याला दिलेल्या वचनपूर्ती साठी मी आजन्म ब्रह्मचर्य पाळले व गादीवर बसलो नाही. पित्याच्या मृत्यूनंतर मी माझ्या पित्याच्या दुसऱ्या पत्नीचा, सत्यवतीचा मुलगा चित्रांगद ह्याला गादीवर बसवले व त्याच्या वतीने राज्याचा कारभार पाहू लागलो. त्याच्या मृत्यूनंतर मी त्याचा मुलगा विचित्रवीर्य ह्याला गादीवर बसवले जो एक लहान मुलगा होता. तो मुलगा गुणी होता परंतु, प्रत्येक गोष्टीसाठी तो माझ्यावर अवलंबून असें. त्याच्या लग्नाची गोष्ट निघाली तेव्हां तो मला म्हणाला कीं, मी जाऊन त्याच्यासाठी पत्नी आणावी. मी त्याच्या इच्छेनुसार सुयोग्य मुलगी शोधण्याचे ठरवले. त्या सुमारास काशीच्या राजाच्या तीन मुलींचे स्वयंवर आयोजलेले होते ते मला समजले. त्यांची नांवे मोठी अंबा, मधली अंबालिक व शेवटची अंबालिका अशी होती. त्या अप्रतीम सुदर होत्या. विविध दागिन्यानी सजलेल्या त्या हातात वरमाला घेऊन उभ्या होत्या. त्या स्वयंवरासाठी ठिकठिकाणाहून राजे आले होते. मी माझ्या एकाच रथाने तेथे गेलो. मी त्या तिघींना एकदम उचलले व माझ्या रथात घेऊन निघालो. त्या तेथे जमलेल्या राजांना मी बोललो कीं, मी, शंतनुचा मोठा मुलगा भिष्म, ह्यांना माझ्या धाकट्या भावासाठी नेत आहे, ज्यांना मला अडवावयाचे असेल ते मला अडवून दाखवतील व ह्यां मुलींना माझ्या कडून सोडवून नेतील. मला त्या आमंत्रित राजांनी आव्हान दिले व आमच्यात लढाई झाली. त्यांच्यातील कांहीं हत्तीवरून माझ्या वर वार करत होते तर कांहीं घोड्यावरून होते. मोठी धुमश्च्क्री लढाई झाली. त्यात मी त्या सगळयांना हरवले. जसे इंद्राने दानवांना हरवले तसे मी त्या आव्हान देणाऱ्या राजांना हरवले. मला ते करतांना खूप मजा वाटली. त्यांचे हत्ती, घोडे रथ सगळे उध्वस्त मी केले होते. त्यानंतर ते पाठी वळले व निघून गेले. मी त्या काशीच्या राजकन्यांना घेऊन हस्तिनापुरात आलो. त्या तीन मुली माझ्या सावत्र आईच्या स्वाधीन केल्या. तेथे तिला मी सगळे जे घडले ते सविस्तरपणे सांगितले.

अंबा उपाख्यान पर्व भाग एकशे चौऱ्याहत्तरावा संपला.

# अंबा उपाख्यान पर्व

## भाग एकशे पंच्याहत्तरावा

भिष्म पुढे सांगत असतो, मी माझ्या सावत्र मातेला नम्कार करत बोललो, मी तेथील सगळया राजांना हरवून ह्या काशीनरेशाच्यातीन मुली विचित्रवीर्यासाठी आणल्या आहेत.त्यांचे सौंदर्य पहा. ते पाहून माता सत्यवती, जीला काली आणि मत्स्यगंधा म्हणून ओळखले जात होते, अश्रू ढाळू लागली. त्यावेळी त्या तीन मुलींपैकी मोठी जिचे नांव अंबा होते खाली मान घालून बोलली कीं, "अहो भिष्म, आपण निती शास्त्र जाणता. त्याच प्रमाणे धर्म ग्रंथांचासुद्धा आपला अभ्यास आहे. असे असूनही आपम माझ्या बाबत असें कसे केलेत? राजा सल्व व मी आम्ही दोघांनी लग्न करण्याचे ठरवले होते. त्याला माझ्या पित्याचीसुद्धा परवानगी होती. अशात तू असा मूर्खासारखा कसा अडमडलास? तुला मला उचलायची काय गरज होती? अरे भिष्मा, कुरु घराण्यात जन्मून तू असे कृत्य कसे करू शकतोस? ह्या तुझ्या घिसडघाईने किती मोठा अनर्थ माझ्यावर ओढवला आहे त्याची तुला कांहीं कल्पना आहे कां? तो सल्व माझ्यासाठी वाट पहात होता कीं मी त्याच्या गळयात माला घालीन इतक्यात तू एकाद्या पुंडासारखा आलास व माझ्या स्वप्नाचा चक्काचून केलास. हा अधिकार तुला कोणी दिला"? म्हणून आता तू मला सल्वाकडे जाऊ दे. मला तुझ्या भावात यत्किंचितसुद्धा स्वारस्य नाही. ती फार चिडून बोलत होती. मला माझी चूक समजली होती. मी तिची क्षमा मागितली नाही कारण माझा अहंकार आड आला. तरी तिला परत जाण्यासाठी जी व्यवस्था करावयाची ती मी केली व ती ब्राह्मणांबरोबर व तिच्या दासी बरोबर सल्वाकडे पाठवून देण्याचे ठरवले.

अंबा उपाख्यान पर्व भाग एकशे पंच्याहत्तरावा संपला.

# अंबा उपाख्यान पर्व

## भाग एकशे श्याहत्तरावा

भिष्म पुढे सांगतो, मी ती गोष्ट कालीपुढे मांडली. माझ्या सल्लागारांशी बोललो. त्यानंतर आम्ही तिला पुरोहिताच्या बरोबर सल्वाकडे पाठवण्याची व्यवस्था केली. ती नगरात सल्वाकडे गेली. तिच्या बरोबर ब्राह्मण होते तिची बाजू सांगण्यासाठी सल्वाला कारण तो प्रकार मोठा विलक्षण असाच होता. त्यात माझ्याकडून शल्वाचा सुद्धा अपमान झाला होता. हस्तिनापुरापासून सल्वाच्या नगरापर्यंत गेल्यावर ती सल्वाला भेटते. ती त्याला सांगते, "सल्वा मी आले आहे. माझा स्वीकार कर. परंतु नाराज झालेला ते स्वाभिमानी सल्व तिचा स्वीकार करत नाही. तो तिच्याकडे पाहून हसत तिला नाकारतो. तो सांगतो, "मला आता तू नको आहेस, तू दुसऱ्याची झाली आहेस आपल्या रितीरीवाजानुसार. आता तू भिष्माकडेच जा व त्याच्या बरोबरच रहा. त्याने आम्हा सगळयांना हरवून तुला नेलं आहे तेव्हां आता तुझ्यावर फक्त त्याचा हक्क आहे. मी अशा बाईला जर पत्नी म्हणून स्वीकारले तर माझे लोक मला काय म्हणतील त्याचा विचार कर. मला हरवून त्याने तुला नेले तेव्हां तू त्याला विरोध कां नाही केलास त्यावेळी. तू त्यावेळी केवळ मजा बघत होतीस कीं, तो भिष्म माझा कसा पराभव करत आहे. तू आता तुला पाहिजे तेथे जा पण माझ्याकडे नको. येथे तुझा वेळ फुकट घालवू नकोस". ते त्याचे निराश करणारे उद्गार ऐकून अंबा प्रेमांने विव्हल अशा अवस्थेत सल्वाला बोलते, "अरे असें बोलू नकोस, मी तुझ्याशिवाय दुसऱ्या कोणाचा विचार करू शकत नाही. मला जेव्हा भिष्म नेत होता त्यावेळी मी अजिबात खूष झालेली नव्हती परंतु, मी चक्रावून गेली होती मला समजत नव्हते काय करावे तुझा कांहीतरी गैरसमज झाला आहे. आपण चांगले दोस्त आहोत हे तू कसा विसरतोस. मी फक्त तुझीच आहे म्हणून तू असा माझ्याशी वागू नकोस. मी जेव्हां समजले काय होत आहे, तेव्हां मी रडू लागले होते पण ते तू पाहिले नाहीस. एकदा प्रेम करणारा त्याला सोडू शकत नाही असें आपल्या शास्त्रात दिले आहे. मी निष्पाप आहे हे तू समजत असतांना बळेच असे वागणे तुला शोभत नाही. तुला माहीत आहे कीं, त्यानी आम्हा सगळयांना जबरदस्तीने उचलून नेले होते जेव्हां मी त्या राजांच्या गर्दीत शोभत होते. ते सगळे इतक्या क्षणांत झाले कीं, कोणाला काय होत आहे ते समजलेसुद्धा नाही. हस्तीनापुरात गेल्यावर मी तेथील सगळयांच्या समक्ष माझे मन मोकळे केले तेव्हा कोठे भिष्माला त्यांनी कोणती चूक केली ते समजलेव त्यांनी माझी सुटका केली व मला मोठ्या इतमामाने तुझ्याकडे पाठवले. माझ्या दोन बहिणी मात्र तेथे राहिल्या त्याच्या भावाच्या पत्नी म्हणून, मी येथे तुझ्याकडे आले. माझ्यावर विश्र्वास ठेव मी इतर कोणाही पुरूषाचा विचार करू शकत नाही. मी माझी स्वताची शप्पथ घेऊन सांगते तीं, मी खरे बोलत आहे. मी कुमारीका आहे व फक्त तुझा विचार करत आहे. ती जीव कळवळून बोलत होती परंतु, सल्व त्यावर विश्र्वास ठेवायला तयार नव्हता. समाजाच्या दबावामुळें तो तिला पत्नी म्हणून स्वीकारायला तयार नव्हता. अनेक प्रकारे

त्याला समजावण्याचा प्रयत्न तिच्या बरोबर गेलेल्या ब्राह्मणांनीसुद्धा केला पण व्यर्थ. ती काशानरेशाची मुलगी संतापली होती व तिचे डोळे अश्रूनी भरलेले होते. ती सल्वला बोलते अरे तू मला झिडकारले आहेस तेव्हां मी कोठे जाणार"? आता माझे संरक्षण केवळ चांगले लोक करतील. सत्य जे मी सांगितले ते नित्य आहे ते माझे संरक्षण करील. सल्व मात्र तिला जा जा असें हाताने सांगत होता. तो तिला सांगतो तो भिष्म माझे काय करील ते सांगता येत नाही जर मी तुझा स्वीकार केला तर असें तो बोलत होता. त्यानंतर ती कुमारीका दुःखी अंतःकरणाने रडत रडत तेथून गेली.

अंबा उपाख्यान पर्व भाग एकशे श्याहत्तरावा संपला.

# अंबा उपाख्यान पर्व

## भाग एकशे सत्याहत्तरावा

भिष्म पुढे सांगत असतो, त्या नगरातून ती निघाली तिच्या दुःखाला कांहीं मर्यादा नव्हती. ती मित्र नसलेली, असहाय्य, अबला, कोठे जाणार? ती विचार करते कीं, तिला आता कोणाचाच आधार नाही. ती विचार करत असते तिच्या त्या परिस्थितीला ती कोणाला जबाबदार समजणार? स्वताला, भिष्माला का सल्वाला, माझ्या पित्याला ज्याने असा स्वयंवर माझ्यासाठी आयोजला होता. ती विचार करत असते, कदाचित हा माझा दोष असावा कारण जेव्हां भिष्म आम्हाला नेत होता मी रथातून खाली उडी मारावयाला हवी होती पण ते मला सुचले नाही. मी गोंधळलेली होती. जर मी तसे केले असते तर शल्वाने मला उचलले असते व त्याच्या बरोबर नेले असते पण ते झाले नाही हेंच खरे. ती विचार करते कीं, हा माझ्या पित्याचा दोष आहे कारण त्याने स्वयंवरासाठी राजाच्या शौर्याला प्राधान्य दिले होते व ते भिष्माने दाखवले होते, त्यात भिष्माला दोष देता येणार नाही. हा सगळा माझ्या बापाचा दोष आहे, असें ती समजते. प्रेम, मनोमिलन ह्या हळूवार नाजूक गोष्टी न समजणारी दांडगट क्षत्रिय प्रवृत्ती ह्याला कारणीभूत आहे असें ती समजते. मग ती भिष्माला दोष देते कीं, जर त्याने कोणाला तरी कसले तरी वचन दिले होते म्हणून तो माझा स्वीकार करत नाही तर अशा माणसाने मुळांत अशा स्वयंवरा सारख्या विधीत भाग कां घ्यावा. मला पळवून न्यावयाचे व नंतर सोडून द्यावयाचे ज्यामुळे त्या स्त्रीचे पुढे काय होते त्याची विचारसुद्धा करावयाचा नाही हे वागणे शतशः दोषपूर्ण आहे असें ती समजते. त्यांनतर ती विधात्याला दोषी ठरवते. नंतर ती त्या सगळया गोष्टींना दोषी ठरवते ज्यांच्यामुळें तिला हे भोगावे लागत आहे. नंतर ती विचार करते, माणसाला त्याच्या भाग्यात जे लिहीलेले आहे ते भोगावेच लागते हेंच खरे. परंतु, ती अखेरीस त्या निर्णयावर येऊन पोहोचते कीं, भिष्मच तिच्या परिस्थितीला सर्वस्वी कारणीभूत आहे व त्यासाठी त्याला शासन झाले पाहिजे. मी त्याच्या ह्या अतिरेकी वागण्यासाठी शिक्षा करणारच असे ती ठामपणे ठरवते. अंबाला प्रश्न पडतो कीं, ह्या बलदंड योद्ध्याला ती कशी शिक्षा करणार? ती ठरवते कीं, ती तपस्या करून देवतांची कृपा संपादन करून त्या जोरावर भिष्माला अद्दल घडवेल. ते ढरवल्यावर अंबा निर्धारपूर्वकपणे तेथील ऋषींच्या आश्रमांच्या दिशेने जाऊ लागते. तेथे ती एका आश्रमात त्या तपस्व्यांबरोबर राहू लागते व त्यांचे विधी विकार समजून घेण्यास सुरूवात करते. तिच्या मनात सुडाची भावना उत्कट असते. व भिष्माचा नाश करणे हे एकच ध्येय तिच्यापुढे असते. तेथे एका आश्रमात ती एका मोठ्या तपस्व्याला विविध प्रश्न विचारून तपस्या करावयाची म्हणजे काय करावयाचे व त्याचे नियम काय ते समजून घेऊ लागते. त्यात एक ऋषी होते, सैखवत्य. त्याना अरण्यकं लिहीली होती. त्यांचे ज्ञान विश्र्वसनीय होते. ते अंबाला आधार देऊन तिचे मनोबळ वाढवतात. त्यामुळें ती थोडी शांत होते परंतु, तिची भिष्माचा सूड उगवण्याची मनीषा कमी होत नाही. अशा माणसाला क्षमा करणे

म्हणजे पापाला उत्तेजन देण्यासारखे होईल हे सैखवत्यांचे सांगणे ती लक्षात ठेवून तिच्या पुढच्या योजना आखू लागते. त्यांनी सांगितल्या प्रमाणे अंबा तपस्या करू लागते. ती समजते कीं, जे तिला भोगावे लागत आहे ते तिच्या गत जन्मातील पापकृत्याचे फळ आहे त्यासाठी घोर तपस्या करून ते पाप प्रथम तिला धूवावे लागेल व नंतर तिच्या इच्छेनुसार पुढील गोष्टींची व्यवस्था करता येईल. अंबा तेथे राहून तपस्या करण्याचा निर्धार करते व परत आपल्या आप्तांकडे न जाण्याचे ठरवते. तेथील ऋषी तिच्या मनाची अवस्था समजतात व तिला तेथे राहून तपस्या करण्याची परवानगी देतात. त्याशिवाय ते तिला तपस्या कशी करावयाची त्याचे नियम समजावून देतात व तिची त्या बद्दलची पूर्व तयारी करण्यात तिला मदत करू लागतात.

ब्राह्मण तिला सांगतात कीं, तपस्या म्हणजे एकचित्ताने कसलाही विचार न करता कशावर तरी आपले ध्यान एकाग्र करावयाचे असते. त्याचे विविध पर्यायी प्रकार ते तिला समजावून देतात. अशारितीने तिला बांधून दिलेल्या पर्णकुटीत अंबा तपस्या करू लागते.

अंबा उपाख्यान पर्व भाग एकशे सत्याहत्तरावा संपला.

# अंबा उपाख्यान पर्व

## भाग एकशे अठ्ठ्याहत्तरावा

भिष्म पुढे सांगतात, तिची व्यवस्था केल्यानंतर तो ऋषी आपापल्या नित्यक्रमात गुंतून जातात. त्यांना तरीसुद्धा त्या कुमारीकेची काळजी वाटत असते. कांहींना वाटते कीं, पहिला रागाचा जोर कमी झाला कीं मग तिला तिच्या पित्याकडे घेऊन जाणे रास्त होईल. कांहीं समजतात कीं, सल्वाला समजावून व लोकांची भिती त्याच्या मनातून काढून टाकून त्याला त्याची अंबा स्वीकारावयाला सांगावे. कांहीं सांगतात की,तिला काय करावयाचे ते ती ठरवेल आपण त्यात लक्ष घालणे चुकीचे होईल. अशारितीने तो विषय तसांच रहातो व अंबा तिच्या ध्यान समाधीत उत्तरोत्तर प्रगती करत जाते. विचारशून्य अवस्थेत रहाण्यासाठी ती विविध गोष्टींवर तिचे ध्यान एकाग्र करू लागते व त्या मार्गाने ती तिचा अध्यात्मिक विकास करू लागते ज्यामुळे कधीतरी कोणी एक देवता तिच्यावर प्रसन्न होऊन तिला तिच्या सुडाच्या कामात मदत करील असे वाटत होते. कांहीं ऋषीतिला सांगतात, हे तिचे वय तपस्या करावयाचे नाही. ती तिच्या पित्याच्याकडे जाईल व त्याच्यावर तिच्या पुढच्या जीवनाचे निर्णय घेण्याचे सोपवेल तर ते इष्ट होईल तिच्यासाठी. ती राजकन्या आहे तिने असें बैराग्याचे जीवन जगणे योग्य नाही असा विचारप्रवाह त्या संन्याशांच्या समाजात आढळत होता. मुलीचा पती भाऊ किंवा मुलगा तिचा संरक्षक असतो. अशा बाईने रानात जगणे त्या ब्राह्मणांना मंजूर नव्हते. ते तिला सांगतात, तिला असें रातात पाहून राजे तिला मागणी घालण्यासाठी येऊ लागतील त्याचा आम्हाला त्रास होईल असें कांहीं सांगतात. ते ऐकून अंबा त्यांना सांगते, मी माझ्या पूर्वाश्रमी जाऊ शकत नाही. माझे नातेवाईक मला स्वीकारणार नाहीत त्यापेक्षा मी येथे एक संन्याशिनी म्हणून रहाणे पसंत करते. कोणाला तुम्ही माझ्या बद्दल सांगितले नाही तर कोणी राजासुद्धा येथे येणार नाही. तरी तुम्ही सगळे शांत व्हा व तुमच्या तपस्येवर लक्ष केंद्रीत करावे. मला तुमच्यात जास्त सुरक्षित वाटते येथे राहूनच मी माझे उद्दिष्ट साध्य करणार आहे. तसे केल्याने माझ्या भविष्यातील (पुढच्या जन्मातील) जीवनात असें प्रसंग येणार नाहीत. तपस्या करून मी जे तपोबळ प्राप्त करीन त्याच्या जोरावर मी त्या भिष्माला धडा शिकवणार आहे. त्यांच्या अशा गप्पा होत असतांना त्यावेऴी एक राजर्षी होत्रहवन तेथे पोहोचतात. ते पाहून सगळे संन्यासी. त्यांना बसण्यासाठी आसन देतात. त्याला पिण्यासाठी पाणी देतात, त्याचे हात पाय धुण्यासाठी पाणी दिले जाते. अशारितीने त्यांचे यथोचित स्वागत करतात. थोडी विश्रांती घेतल्यानंतर तेथील मंडळी त्यांना अंबाचा प्रश्न सांगतात. होत्रहवनांचे त्या बद्दल काय मत आहे ते त्यांना समजून घ्यावयाचे असते. काशीनरेशाच्या दुर्दैवी कन्येची कथा त्यांना समजते. ते तिच्याशी सुद्धा बोलतात. त्याना खूप वाईट वाटते तिच्या त्या परिस्थिती बद्दल. होत्रहवन अंहाच्या आईचे आजोबा असतात. ते अंबाला त्यांच्या मांडीवर बसवतात. त्यानंतर ते तिसा तिच्या शब्दात ते सगळे सांगावयास सांगतात. ते

ऐकल्यावर होत्रहवन तिला सांगतात कीं, ती तिच्या पित्याच्या घरी जाणार नाही. ते सांगतात कीं, ते तिच्या आईचे आजोबा आहेत. मी तुझे दुःख घालवीन माझ्यावर विश्र्वास ठेव. माझा तुला असा सल्ला आहे कीं, तू रामाकडे जा. तो जमदग्नीचा मुलगा अशा माजलेल्या क्षत्रियांना वठणीवर आणतो. त्या भिष्माला तोच चांगला धडा शिकवेल. तो तुझ्यावरील अन्यासाठी त्या माजोर क्षत्रियाला ठार मारील. त्यांने तुझा सुड पूर्ण होईल. आता वेळ न घालवता त्या रामाकडे जा. तो राम भृगुच्या वंशातील आहे व तो साक्षात अग्नीरुप आहे. तोंच तुला न्याय मिळवून देईल. ते ऐकून अंबा भावनाविवश होऊन रडू लागते. होत्रहवन तिला आशिर्वाद देतात कीं, त्यांची तपस्या तिच्या पाठीशी आहे. ते सांगतात, आत्ताच निघ रामाकडे जाण्यासाठी. ती त्या राजर्षीला विचारते, "मी त्यांना कोठे शोधू? ते माझे दुःख कसे निवारण करतील? मला ते सगळे सांगा म्हणजे मी त्यांना भेटून माझे दुःख सांगेन".

होत्रहवन तिला सांगतात, "मुली तुझे भले हो, जमदाग्नीचा मुलगा मोठा तपस्वी आहे, त्याची तपश्चर्या मोठी आहे. ते न्यायी आहे व क्षत्रियांपासून ज्यांना त्रास होतो त्या सगळयाना संरक्षण देण्याचे ब्रीद त्याने घेतले आहे. तो महेंद्र पर्वताच्या शिखरावर अथवा त्याच्या आसपास वावरत असतो. ते त्याचे वस्तीस्थान आहे. त्या पर्वताच्या भोवती अनेक ऋषी, गंधर्व, अप्सरा रहात असतात. तेथे तुला जावे लागेल. त्याला भेटल्यावर मी तुला पाठवले आहे ते सांग. म्हणजे तुला त्याच्याशी काम करण्यात सुविधा होईल. कारण त्याचे पिता ऋषी जमदाग्नी व मी मित्र आहोत. आमचे फार चांगले संबंध आहेत. ते त्यांचे संभाषण होत असतांना आणखीन एक ऋषी तेथे येतात. त्यांच नांव अक्रितव्रण होते. ते रामाचे खास मित्र होते. ते आल्यामुळे सगळे मुनी त्यांच्या भोवती जमा होतात. राजा श्रींजय होत्रहवन उभे राहून त्यांना अभिवादन देतात. त्यांचे यथोचित आदरातीथ्य होते.त्यानंतर ते सगळे त्याच्या भोवती बसतात. त्यानंतर त्यांच्यात विविध प्रश्नांवर चर्चा सुरू होते. ती पुष्कळ अभ्यासपूर्ण होती. त्यानंतर अक्रितव्रण रामाबद्दल चौकशी करतात. "त्याना हल्ली पाहिले आहे कां"? असें विचारतात. अक्रीतव्रण सांगतात कीं, उद्या राम तेथेच येणार आहेत तुम्हा सगळयांना भेटण्यासाठी. त्यानंतर अंबाचा विषय निघतो. होत्रहवन सांगतात अक्रितव्रणला कीं, ही काशीनरेशाची कन्या आहे. तिच्यावर भिष्माच्या अरेरावीमुळें घोर अन्याय झाला आहे. त्यानंतर जे स्वयंवराच्या प्रसंगी जे घडले व त्यानंतर हस्तिनापुरात जे घडले ते व त्यां नंतर जे सल्वाकडे घडले ते सगळे सविस्तरपणे ऋषीला सांगितले जाते. ते सगळे सांगून झाल्यावर अंबा त्या आश्रमात कां आली तेसुद्धा त्यांना सांगितले जाते. तिचा तपस्या करण्याचा उद्देशाबद्दल सुद्धा चर्चा होते. त्यानंतर ती माझी मुलीची नात आहे हे मला समजले असे होत्रहवन अक्रीतव्रणाला सांगतो. ते सांगतात कीं, भिष्माचा उद्धटपणा, अरेरावी ह्या प्रसंगाला कारणीभूत आहे व त्यासाठी तिला रामांकडून न्याय मिळावा अशी माझी अपेक्षा आहे असे होत्रीहवन सांगतात. ते झाल्यावर अंबा त्यांना सांगते, "मी त्या प्रसंगामुळे माझ्या घरी जाऊ

शकत नाही. त्यासाठी येथे तपस्या करून मी अध्यात्मिक सामर्थ्य जमा करून भिष्माला धडा शिकवण्यासाठी येथे तपस्या करण्यासाठा आले आहे. येथे असलेले मुनी मला संरक्षण आणि ज्ञान देण्यास तयार आहेत. माझे पणजोबा सांगतात कीं राम मला मदत करू शकतात म्हणून मी त्यांना भेटू इच्छिते.

अंबा उपाख्यान पर्व भाग एकशे अठ्ठ्याहत्तरावा संपला.

# अंबा उपाख्यान पर्व

## भाग एकशे एकोणऐंशीवा

अक्रितव्रण बोलतात, "मुली तुझ्या ह्या दुःखासाठी तुला इलाज पाहिजे कां? तुला काय अपेक्षा आहे, तुला सौभच्या राजाने तुझ्याशी लग्न केले पाहिजे असें वाटते कां? मला सांग तुला काय पाहिजे. महाबली राम तुझी इच्छा पूर्ण करून देईल. तुझे भले करण्यासाठी राम ते अवश्य करून घेईल. दुसरे असें कीं, तुला भिष्माला धडा शिकवणे जास्त जरूरीचे वाटते"? अंबा बोलते, "अहो पवित्र मुनी, मला भिष्माने पळवून नेले म्हणून हे सगळे झाले त्यासाठी त्याला सजा झाली पाहिजे म्हणजे कोणी क्षत्रिय त्याच्या माजोरपणाने कोणाही स्त्रीला अशारितीने पळवण्याचे धाडस करणार नाही". "राम (भार्गव) भिष्माला पराजित करून तुझी ती मनीषा पूर्ण करील. त्याबद्दल निश्चिंत रहा", अक्रितव्रण बोलतात. अंबा ते ऐकून बोलते, "भिष्माला माहीत नव्हते कीं माझे मन सल्वाला मी दिले आहे. अशा परिस्थितीत काय करावयाचे ते करावे म्हणजे कोणावरही अन्याय होणार नाही. तुम्हाला माझ्या दुःखाचे कारण भिष्म आहे हेसुद्धा मी तुम्हाला सांगितले आहे. तुम्हाला त्यातून जे योग्य वाटते ते करावे म्हणजे मला शांती मिळेल".

अक्रितव्रण सांगतात, "मुली तुझे भलो हो, तुझे जे सांगणे आहे किं, न्यायाने काम झाले पाहिजे ते सुद्धा रास्त आहे. तरी आता ऐक मी काय सांगतो ते, माझ्या मते, तुला भिष्माने त्याच्या नगराला नेले म्हणून सल्वाने तुझ्या चारित्र्यावर शंका व्यक्त केली हे खरे आहे. भिष्म त्याच्या मर्दानकीच्या जोशात तुला पुढचा पाठचा विचार न करता उचलून नेतो हे सरासर चुकीचे आहे असें स्पष्टपणे दिसते. म्हणून तू भिष्मालाच दोषी ठरवले पाहिजेस. त्यांने शिष्टाचाराची मर्यादा ओलांडली कारण त्याला त्याच्या क्षात्रतेजाची मग्रुरी झाली आहे. स्वयंवराचे नियम भिष्माने धुडकावून लावले हा त्याचा गुन्हा झाला". ते ऐकल्यावर अंबा बोलते कीं, तिचे मनसुद्धा तेच सांगत आहे. माझी इच्छा आहे कीं, मी भिष्माचा पराभव करून त्याला ठार मारून शिक्षा करावी पण मी ते आत्ता करू शकत नाही. भिष्म कां सल्व जो तुमच्या दृष्टीने माझ्या ह्यान अवस्थेला कारणीभूत आहे व म्हणून गुन्हेगार ठरेल त्याला तुम्ही शिक्षा करावी एवढीच माझी इच्छा आहे.

भिष्म पुढे सांगतो, अशा प्रकारच्या संभाषणात तो दिवस गेला. त्यानंतर दुसऱ्या दिवशी राम तेथे उपस्थित झाले. त्यांच्या केसाच्या जटा डोक्यावर बांधलेल्या होत्या. अंगावर हरणाच्या कातड्याचे वस्त्र होते. त्याच्या बरोबर त्याचे शिष्य सभोवार उभे होते. एका हातात धनुष्य होते, कमरेला कुर्हाड व तलवार लटकवलेली होती. तो श्रींजय राजा होत्रहवनाला नमस्कार करत त्याचे क्षेमकुशल विचारतो, अंबासुद्धा रामाला हात जोडून नमस्कार करून उभी असते. इतर सगळे बैरागी रामाचे स्वागत करतात. रामाला मध व दह्यांने अर्घ्य दिले जाते. त्याची पुजा झाल्यावर राम त्याच्या आसनावर बसतो. इतर त्याच्या भोवती रिंगण करून बसतात. ते सगळे बसल्यावर

विषयावरून चर्चा करू लागतात. चर्चा संपल्यावर होत्रहवन रामाला मधूर वाणीने विनती करतो कीं, "अहो महाबली राम, ही माझी नात आहे, काशीनरेशाची मोठी कन्या, तिची एक इच्छा आहे ते तिच्याकडूनच आपण ऐकावे. आपण असे प्रश्न सोडवण्यात कुशल अहात". ते ऐकल्यावर राम अंबे कडे पहात तिला विचारतो, "मुली, सांग मला तुझी काय इच्छा आहे". ते ऐकल्यावर अंबा रामाचे पाय पकडून मोठ्या मोठ्याने रडू लागते. बोलते, "मला तुमच्या कडून संरक्षणाची अपेक्षा आहे. आपण सगळया त्या लोकांना संरक्षण देता जे अशा भ्रष्ट क्षत्रियांपासून पिडले जात आहेत".

राम तिला बोलतात, "मला सांग तुझे नेमके काय दुःख आहे. मी त्याप्रमाणे कार्य करीन". रामाच्या त्या उद्गारामुळें उत्तेजित झालेली अंबा बोलते, "मला माझ्या दुःखातून आपण बाहेर काढावे".

भिष्म सांगतात, तिचे सौंदर्य व तारुण्य पाहून राम विचार करू लागतो, त्याला तिच्या त्या परिस्थितीची किंव येते. तो मनात विचार करतो, ही कन्या मला काय सांगू इच्छित असेल बरे? नंतर बोलतो, बोल मी तुझ्यासाठी काय केले पाहिजे ते स्पष्ट शब्दात सांग. ती गप्प उभी असते. थोडावेळ थांबून तो महाबली राम तिला बोलतो कीं, तो भिष्माला बोलवणे धाडणार आहे व त्याचे काय म्हणणे आहे ते समजून घेणार आहे. कुरु लोक मला ओळखतात, ते माझे म्हणणे मान्य करतील. परंतु, तो गंगापुत्र कधी माझ्या बोलण्याला महत्व देत नाही. तसे झाले तर मी त्याला द्वंद्वात जाळून टाकीन. कांहीं काळजी करू नकोस मुली त्याची मी लवकरच खबर घेणार आहे. मी सल्वला सुद्धा तुझा पुन्हबा विचार करावयाला सांगतो. ते त्यांचे ऐकून अंबा जोराने बोलते अहो भृगू कुळीन, त्या भिष्माचा नाश करा त्याचाच त्रास होत आहे. त्यानंतर सौभच्या राजाला बोला. माझा त्याने अपमान केला आहे कारण नसतांना अशा माणसाबरोबर मी जाणार नाही. भिष्मच ह्या सगळया प्रकरणाची जड आहे,त्याचाच काटा काढा. त्याला मारून टाका. अंबा जोरांने बोलते. तोंच माझ्या ह्या अवस्थेस जबाबदार आहे. त्याला त्याच्या ताकदीचा माज आहे, असा क्षत्रिय समाजाला धोका करू शकतो. त्याला शिक्षा झालीच पाहिजे. मला तो नेत असतांना माझ्यामनात हेच विचार येत होते कीं, त्याचा गळा आवळू. माझ्यामुळे तो मेला पाहिजे. हिंच माझी इच्छा आहे. जसे पुरंदराने वृत्राचा वध केला तसा आपण भिष्माचा करावा.

अंबा उपाख्यान पर्व भाग एकशे एकोणऐंशीवा संपला.

# अंबा उपाख्यान पर्व

## भाग एकशे ऐंशीवा

भिष्म पुढे सांगतात, त्याप्रमाणे अंबा रामाला पुन्हा पुन्हा भिष्माला मारून टाकण्याची विनंती करत असते ते ऐकून तो भार्गव तिला सांगतो कीं, हल्ली मी शस्त्र हातात घेत नाही पूर्वीसारखा. भिष्म आणि सल्व दोघे मला चांगले ओळखतात. त्याना मी समजावून तुझा प्रश्न मार्गी लावीन ह्याबद्दल निश्चिंत रहा. जर ब्राह्मणांचे कारण असेल तरच मी क्षत्रियांवर वार करतो एरव्ही नाही. असा माझा नियम आहे. ते ऐकल्यावर अंबा बोलते, "माझे दुःख आपल्याला कशातरी मार्गाने संपवावे लागेल. माझ्या दुःखास हा भिष्मच जबाबदार आहे हे आपण समजता, म्हणून कशातरी प्रकारे तो मारला गेला तरच मला शांती मिळेल". राम ते ऐकून बोलतात, "काशीनरेश कन्या, तुझ्या कारणाने तो मारला जाईल हा माझा शब्द आहे पण आज ते होणार नाही". अंबा मात्र सारखी त्याला मारा मारा असें बोलत रहाते. तिला एकच ध्यास असतो कीं तिचे जीवन बरबाद करणारा भिष्म मेलाच पाहिजे. त्याला आपण आव्हान देऊन मारा त्याचा आवाज मोठा आहे त्याची घमेंड मोठी आहे असां माणूस मारला गेला पाहिजे. आपण मला वचन दिले आहे तेव्हां ते पूर्ण करणे आपले कर्तव्य होते. अंबा रामाला आर्जव करत असते.

भिष्म पुढे सांगतो, अशारितीने राम आणि अंबा एकमेकांशी संवाद करत होते, ऋषी अक्रिताव्रण बोलतात, "अहो भार्गवा, आपल्याला अशा अबलेला निराश करणे शोभत नाही. तिची मागणी आपण पूर्ण केली पाहिजे, तिच्यावर एक असा अन्याय झाला आहे कीं, तिला मृत्यूशिवाय दुसरा मार्ग भिष्माने ठेवलेला नाही. अशा बेजबाबदार माणसाला जाब विचारला गेला पाहिजे कारण, ब्राह्मणांवर अन्याय व स्त्रीवर अन्याय ह्यात फरक करू नका, ते समसमान असतात. भिष्माला द्वंद्वासाठी आपण बोलावले पाहिजे व हा प्रश्न निकालात काढला पाहिजे. तसे केल्याने ब्रह्मदेवसुद्धा तुझ्यावर प्रसन्न होतील. तुम्ही पूर्वी अशाप्रकारची शपथ घेतली होती तिचा आपल्याला विसर पडला आहे कां? ज्यात सगळ्या भ्रष्ट क्षत्रियाना अद्दल घडवण्याचे तू बोलत होतास त्याचे काय झाले? तू शपथ घेतली होतीस कीं, तू तशांना ठार मारशिल. तू दुसरे वचन दिले आहेस की, जो कोणी निरपराध तुझ्याकडे न्याय मागील त्याला तू न्याय मिळवून देशिल, त्या सगळ्या गोष्टी तू कसा विसरलास? तू त्या मस्त झालेल्या योद्ध्याचा वध कर व ह्या मुलीला न्याय मिळवून दे. त्या भिष्माने सुद्धा सगळ्या क्षत्रियांवर मात केलेली आहे. त्याला जाब विचारण्यासाठी तू बोलाव आणि द्वंद्वाचे आव्हान दे".

राम त्यावर बोलतो, अहो ऋषीवर्य, मला माझी वचन चांगलीच आठवतात जी त्याकाळी मी दिली होती. परंतु ह्यावेळी मी तेंच करीन जे सारासार विचार करण्याचे सांगेल. जे ह्या मुलीच्या डोक्यात आहे ते भयंकर आहे. तरी आपण सांगता म्हणून मी हिला घेऊन भिष्माकडे

जातो व त्याच्यापुढे खरेखोटे काय ह्याची शहानिशा करून मग निर्णय घेतो., जर भिष्म चुकीचा आहे असें समजले तर मी त्याला आव्हान देईन व त्याला मारून टाकीन. आपण जाणता कीं, मी मारलेले बाण देहापुरते रुतत नाहीत तर ते आत्म्याला भिडतात हे आपण जाणताच.

असें बोलून राम अंबेला घेऊन भिष्माकडे जाण्याचे ठरवतो. त्यांनतर तो भार्गव त्याच्या आसनावरून उठतो. त्यानंतर ते संन्यासी रात्री होम करतात. त्यांच्या प्रार्थना करतात. त्यानंतर ते पहाटे भिष्माकडे निघतात. ते माझे आयुष्य कमी करण्याच्या निर्धाराने हस्तिनापुरी जातात. ते कुरुक्षेत्री येतात. त्यांच्या बरोबर अंबासुद्धा असते. तेथे सरस्वती नदीच्या किनारी ते मुक्काम ठोकतात.

अंबा उपाख्यान पर्व भाग एकशे ऐंशीवा संपला.

# अंबा उपाख्यान पर्व

## भाग एकशे एक्याऐंशीवा

भिष्म पुढे सांगत असतात, कुरुक्षेत्री तीन दिवस रहातात. त्यानंतर तो जमदाग्नीचा मुलगा भिष्माकडे संदेश पाठवतो. त्यात तो सांगतो कीं, राम येथे आला आहे त्याच्या सांगण्याप्रमाणे भिष्माने वागावे नाहीतर परिणामांना सामोरे जावे. राम आमच्या राज्यात येऊन मला आव्हान देत होता. मी त्वरीत तेथे गेलो. मला त्याला भेटण्याची उत्सुकता होती परंतु, त्याचा उद्देश मला माहित नव्हता. मी भार्गवाला भेटावयाला गेलो. माझ्या बरोबर त्यांच्यासाठी एक चांगली वाढलेली गाय त्यांना दान म्हणून देण्यासाठी घेतली होती. माझ्याबरोबर अनेक ब्राह्मण सुद्धा होते. कांहीं पुरोहीत सुद्धा होते. इतर नोकर चाकर होते असा जामानिमा घेऊन मी त्यांच्या भटीसाठी गेलो. त्यांना भेटण्याच्या खूषीत मी होतो. तेथे पोहोचल्यावर त्यांनी माझे स्वागत रिवाजानुसार केले. त्यानंतर ते मला म्हणाले, "अरे गंगापुत्रा तू निरिच्छ म्हणून ओळखला जात असतांना काशीच्या एका कन्येला तू तिच्या मनाविरुद्ध कसे पळवलेस ते सांगशिल. ते पुरे झाले नाही म्हणून तिला परत पाठवून तिचा तू उपमर्द सुद्धा केलास ह्यावर कांहीं तुझ्याकडे स्पष्टीकरण आहे कां?

तुझ्या अशा वागण्यामुळे ह्या कुलीन मुलीची बेइज्जती झाली त्याचा तू विचार केला होतास कां? त्या कुमारिकेला पळवतांना तू त्यांना हस्तस्पर्श केला होतास ते तुझ्या ध्यानात आले कां? आपल्यामध्ये कुमारिकेला कोणी पुरूष स्पर्श करत नाही हे माहीत नव्हते असे तू मला सांगू नकोस. तुझ्या ह्या अमर्याद वागण्यामुळे तिचा ठरलेला विवाह जो राजा सल्वाबरोबर होणार होता तो झाला नाही. त्यामुळे तू तिचा अपराधी आहेस हे तुझ्या ध्यानात आले कां? त्याच्या बद्दल तू अंबाला तुझी पत्नी म्हणून स्वीकार व त्या प्रकारे प्रायश्चित्त करावे असले मी सुचवत आहे. त्या मुलीचे जे स्त्रैण अधिकार (हिंदू विचाराप्रमाणे स्त्रीचे जे अधिकार आहेत त्यात हा अधिकार महत्वाचा मानला जातो व त्या प्रमाणे तिला लैंगिक सुख तिच्या मर्जीने घेण्याची मुभा होती) आहेत ते तिला तू प्रदान करशिल. तुला तिचा अशारितीने अपमान करण्याचा अधिकार स्वयंवराच्या नियमानेसुद्धा दिलेला नव्हता हे लक्षात घे".

त्या अंबाच्या अपत्तीमुळें बेचैन झालेले भार्गव पाहून मी त्यांना म्हणालो, "अहो भार्गव, मी कोठल्याही सबबी खातर माझे ब्रह्मचर्य सोडू शकत नाही. तिला माझ्या भावाला द्या. त्यांने आधीच तिच्या दोन बहिणी पत्नी म्हणून स्वीकारल्या आहेत. अहो भृगूवंशी, मी तिला सल्वाकडे जाण्याची परवानगी दिली होती. त्याप्रमाणें तिला सोबतीला ब्राह्मण आणि पुरोहीतसुद्धा धाडले होते. मी शपथ घेतली आहे कीं, मी क्षत्रिय वर्णाचे पालन करणार आहे, आणि आजन्म ब्रह्मचर्य पालन करणार आहे. कोणत्याही कारणांने ते मी सोडणार नाही".

माझे ते स्पष्ट बोलणे ऐकल्यावर रामाचा राग अनावर झाला,त्याचे डोळे लाल झाले व तो इकडे तिकडे अस्वस्थ झाल्यासारखा पाहू लागला. ते रागाच्या भरात बोलले, "हे बघ जर तू माझ्या आज्ञेचे पालन केले नाहीस तर मला तुझा वध करावा लागेल, आणि तुझ्याबरोबर तुझ्या सगळया सल्लागारांनासुद्धा मी यमाकडे पाठवीन. राम मला पुन्हा पुन्हा ती ताकीद देत होते. मी माझ्या व्रतासाठी त्यांना विनंती करत होतो. मी वाकून त्याना प्रणीपात करून ते सांगत होतो कीं, मी अंबाला पत्नीम्हणून स्वीकारू शकत नाही. नंतर मी त्यांना विचारले कीं, त्याना माझ्याशी द्वंद्व करण्याचे काय कारण? मी त्यांना आठवण करून दिली कीं, जेव्हां मी लहान होतो तेव्हां त्यांनीच मला त्या चार प्रकारच्या शस्त्रांची (धनुर्वेदात मुक्ता, अमुक्ता, मुक्तामुक्त आणि यंत्रमुक्ता असें चार प्रकार दिले आहेत. मुक्ता चक्राकार असते, अमुक्ता तलवारीसारखे असते, मुक्तामुक्त कधी फेकून व कधी तसेंच वापरले जाते आणि यंत्रमुक्ता शत्रुघ्नासारख्या यंत्राच्या मदतीने फेकले जाते. सगळी मुक्ता शस्त्रं आयुध ह्या प्रकारात येतात. अमुक्ता मात्र शस्त्रात गणली जातात. शस्त्रांबरोबर मंत्र प्रयोग असेल तर त्याला अस्त्र म्हणतात.) ओळख करून दिली होती. म्हणून मी आपला शिष्य आहे. राम जास्तच रागावलेले दिसले. ते बोलतात कीं, त्याना मी अजून ओळखलेले नाही. ते बोलतात, "अरे भिष्मा तू मला तुझी शिक्षक मानत असूनही माझ्या आज्ञेचे पालन करत नाहीस, त्या काशीनरेशाच्या मुलीशी तू जोवर विवाह करत नाहीस तोवर माझे समाधान होणार नाही. तिच्याशी लग्न करून तू तुझ्या स्वताच्या वंशाचा विस्तार करावास असे मला वाटते. तू तिला तिच्या विरुद्ध पळवलेले आहेस. त्यांमुळें तिला आता कोणीही स्वीकारणार नाही. तुझे हे वागणे कुलिन क्षत्रियाला न शोभणारे आहे हे तुझ्या कधी लक्षात येणार आहे कीं नाही? मी त्याना ठामपणे सांगितले कीं, ते शक्य नाही. तुम्हाला, मला ते करण्यास भाग पाडता येणार नाही. तुमचे सगळे प्रयत्न त्या बाबतचे व्यर्थ जातील. आपल्या जुन्या संबंधाला आठवून मी सांगतो कीं, हा आग्रह करू नका. मी तुम्हाला प्रसन्न करण्याचा प्रयत्न करतो ह्याचा अर्थ असा काढू नका कीं मी तुमच्या सगळया इच्छा पूर्ण करीन. त्या मुलीबद्दल सांगावयाचे म्हणजे मी तिला आधीच नाकारले आहे. ज्या बाईने तिचे मन दुसऱ्याला दिले आहे ती कधीच इतर कोणाला तिचा जीवनसाथी म्हणून स्वीकारू शकत नाही. अशा बाईला मी काय. कोणीही स्विकारू नये असे माझे मत आहे. अशी बाई एकाद्या नागीणीसारखी असेल त्या पुरूषासाठी. मी कोणाला तरी शब्द दिला आहे कीं मी ब्रह्मचर्य पाळीन व तो शब्द मी मोडू शकत नाही हे जरा समजून घ्या भार्गवा. असें मी त्यांना बोललो. इंद्रसुध्दा मला माझ्या शब्दापासून दूर करू शकणार नाही. पुराणात एक श्लोक आहे, त्यात म्हंटलेले आहे मरुताने कीं, जो गुरू शिष्याला त्याचे वचन मोडावयाला लावतो तो भ्रष्ट अहंकाराने पिडलेला असतो. त्याचे योग्य अयोग्यचे ज्ञान भ्रष्ट झालेले असते. पुढे मी भार्गवाला बोललो, मी तुमचा मान ठेवत आहे ह्याचा अर्थ तुम्ही मला वाटेल ते करावयाला सांगू शकता असा कृपया करू नका. मी अजून तुमचा मान ठेवत आहे. त्यानंतर भिष्म बोलतो, मी तुम्हाला गुरूच्या कर्तव्याची जाण नाही म्हणून आता तुमच्याशी द्वंद्व करणार आहे. त्यात मी तुम्हाला ठार मारणार

नाही. कारण तुम्ही ब्राह्मण अहात. विशेष म्हणजे आपण संन्याशी सुद्धा अहात. म्हणून मी आपल्याला माफ करणार आहे. शास्त्रात सांगितले आहे कीं जर कोणी ब्राह्मण अस्त्र घेऊन लढावयाला आला तर त्याला ठार मारण्याची परवानगी आहे. मी क्षत्रिय वर्गाचा असून त्या कर्तव्यात बांधलेला आहे. जशास तसे वागण्याचे आदेश त्यात दिले आहेत हे आपण जाणता. अयोग्य कारणासाठी जर कोणी लढत असेल तर त्याला मारण्याने पुण्य प्राप्त होते म्हणून, अहो राम आपण अयोग्य कारणासाठी माझ्यावर जबरदस्ती करणार असाल तर मी आपल्याशी लढणार आहे. ते पुण्याचे कार्य होईल माझ्यामते. माझी ताकद पहा, माझे हात पहा, ते अतिमानवी आहेत हे लक्षात घेऊन मला आव्हान द्या. तरी आपल्याला माझ्याशी द्वंद्व करावयाचे असेल तर मी तयार आहे ह्या कुरुक्षेत्री. आपल्याला लढण्याची एवढी हौस आहे तर ती हौस पुरी होऊ द्या. माझ्या आयुधांच्या मदतीने मी आपल्याला त्या जगात पाठवीन ज्या जगात आपण तपस्या करून सुद्धा जाऊ शकणार नाही. त्या कुरुक्षेत्री आपण लढू जेथे तुम्ही तुमच्या पूर्वजांना क्षत्रियांच्या रक्ताने अर्घ्य दिले होते. चला राम, आपण लढावयाला निघू. तुमचा गर्व मी ह्या लढाईत हरण करणार आहे ज्याबद्दल ब्राह्मण लोक मोठ्या कौतुकाने इतकी वर्षे बोलतात. तुम्ही घमेंडीत नेहमी सांगता कीं, तुम्ही एका हाताने सगळे क्षत्रिय मारले त्या हाताने काय तुम्ही मला मारू शकता कां ते पाहू. त्यात क्षत्रियात कोणी भिष्म नव्हता म्हणून ते आपल्याला शक्य झाले! त्या लढाईनंतर खरे क्षत्रिय जन्मू लागले आहेत. आपण खऱ्या क्षत्रियांना भेटलाच नाहीत. तुमचा गर्व नष्ट करण्यासाठी माझ्यासारखा क्षत्रिय जन्मला आहे. ह्या युद्धात मी तुम्हाला चीत करून दाखवीन. त्यानंतर तुम्ही पुन्हा कधी क्षत्रियांबद्दल गौण बोलणार नाही. ते माझे बोलणे ऐकून राम हसू लागले. ते मला बोलले तुला माझ्या शुभेच्छा आहेत. आपण लढूच. चल आत्ताच आपण कुरुक्षेत्री जाऊन युद्ध करू. राम म्हणतो, तेथे तुझी माता जान्हवीसुद्धा असेल भिष्मा, तुझा पराक्रम पहाण्यासाठी. परंतु, तेथे माझ्या बाणांने भंगलेले तुझे शरीर गिधाडं खातांना ती पाहिल. सगळे देव सिद्ध आणि शरण सुद्धा ते पहाण्यासाठी येतील गंगेबरोबर. तुझी माता नदीच्या रुपातच तुझा अहंकार कसा चुरडला जातो ते पहाणार आहे. अरे कुरुकुळीन, तू तुझ्याबरोबर तुझा रथ व इतर सगळी सामुग्री घेऊन निघ. ते भार्गवाचे ऐकल्यावर मी मान वाकवून त्यांना वंदन करत तथास्तु असें बोललो. ते बोलल्यानंर राम कुरुक्षेत्री माझ्याबरोबर लढण्याच्या इराद्याने निघाला. त्यानंतर मी घरी गेलो व सत्यवतीला सगळे जे झाले ते सांगितले. त्यानंतर युद्धाला जाण्या आधीच्या विधी मी उरकल्या. ब्राह्मणांना माझ्यासाठी प्रार्थना करण्यास सांगितले. मी माझ्या खास रथात स्वार झालो. जो चांदीच्या वर्खाने सजवलेला होता. त्याचे घोडे शुभ्र होते. त्याची रचना भक्कम होती. त्यात अनेक शस्त्रं आणि आयुध तयार ठेवलेली होती. माझा सारथी हुशार होता. त्याचा युद्धातील अनुभव मोठा होता. मी जिरोटोप आणि चिलखत घालून तयार झालो होतो. माझे सगळे कपडे पांढऱ्या रंगाचे होते. ब्राह्मण माझ्यासाठी प्रार्थना करत माझ्या रथाबरोबर चालत होते. अशारितीने मी कुरुक्षेत्री प्रयाण केले त्यावेळी. मोठ्या वेगाने मी रणक्षेत्री पोहोचलो. दोघे पोहोचलो तेथे

लढण्याच्या इराद्याने. प्रत्येक त्याची हिम्मत दाखवण्याच्या तयारीत होतो. मी रामाला व त्याच्या बरोबर अंबाला पाहिले. अंबा दूर एका ठिकाणी ध्यानस्थ बसलेली होती. ते तिचे रुप पाहून मला पहिल्या प्रथमच एका स्त्रीची भिती वाटली. माझे मन क्षणभर विचलित झाले. आयुष्यात मी कधी घाबरलो नव्हतो, मला त्याचे आश्र्चर्य वाटले. साक्षात माझा मृत्यू तेथे बसला आहे असे तिला पाहून मला वाटले. तेथे मी दुर्लक्ष करून माझे शंखू फूंकण्यास सुरूवात केली. ते ऐकून स्वर्गातून इंद्र व इतर देव खाली आले ते युद्ध पहाण्यासाठी. त्या ठिकाणी स्वर्गीय वाद्ये ऐकू येऊ लागली. अनेक ऋषी सुद्धा ते पहाण्यासाठी आले. त्यावेळी माझी माता जी सगळयांचे भले करत असते ती मूर्त स्वरुपात तेथे अवतरली. तिने विचारले, "अरे भिष्मा, तू हे काय आरंभले आहेस"? त्यानंतर ती रामाला बोलते अरे तू भिष्माशी लढू नकोस तो तुझा शिष्य आहे. त्यानंतर ती मला रागावून बोलली. राम शीवाच्या योग्यतेचे आहेत जे क्षत्रियांचे जनक आहेत, त्यांना आव्हान देणे योग्य नाही. तुला हे सगळे माहित असून तू असे कसे त्यांना आव्हान देत आहेस. ते ऐकल्यावर मी तिला हात जोडून वंदन केले. त्यानंतर मी तिला जे घडले ते सगळे सांगितले. त्यात काशीच्या मुलीची व्यथासुद्धा सांगितली. रामाला युद्ध टाळण्यासाठी मी परोपरीने विनंती केली असें सांगितले. माझे ऐकल्यावर गंगा वहात रमाकडे गेली व त्याला बोलली, तू भिष्माशी लढू नकोस तो तुझा आवडता शिष्य आहे. रामाने तिला सांगितले कीं तो नाही तर मी, भिष्म त्याला आव्हान देत आहे.

वैशंपायन पुढे सांगतात, रामाचे ते ऐकल्यावर गंगा पुन्हा भिष्माकडे पुत्रप्रेमापोटी जाते व पुन्हा विनंती करते की लढू नका. परंतु, तो गंगापुत्र फार रागावलेला होता तिच्या विनंतीकडे दुर्लक्ष करतो. त्याच सुमारास भार्गव भिष्माच्या बाजूला दिसू लागले व त्यांना अंतिम आव्हान दिले व युद्ध सुरू झाले.

अंबा उपाख्यान पर्व भाग एकशे एक्याऐंशीवा संपला.

# अंबा उपाख्यान पर्व

## भाग एकशे ब्यांऐंशीवा

भिष्म सांगतात, रामाला जमिनीवर उभा पाहून मी त्याला छद्मीपणे हसलो व बोललो कीं, मी रथातून लढतो आपणसुद्धा रथातून या लढण्यासाठी. तसेंच आपणसुद्धा चिलखत घालावे. माझ्याबरोबर लढावयाचे तर तसे करावे लागेल, मी त्यांना सांगितले. ते ऐकल्यावर भार्गव हसले. ते म्हणाले, ही पृथ्वी माझा रथ आहे. वेदज्ञान माझे घोडे आहेत, वारे माझे सारथी आहेत, वेदातील माता (गायत्री, सावित्री आणि सरस्वती) माझे चिलखतं आहेत. त्यांच्या मदतीने मी अरे कुरुपुत्रा तुझ्याशी लढणार आहे. त्यानंतर दुर्योधना, त्यांनी माझ्याभोवती त्यांच्या बाणांचा एक घट्ट असा पट्टा रचला ज्यात मी अडकलेलो होतो. त्यातून मी पाहिले कीं, राम एका सज्ज रथात बसलेले होते. त्यांच्या रथात सगळया प्रकारची आयुध आणि शस्त्र तयार होती. त्या रथाचा रुबाब विलक्षण होता. असा रथ मी आधी कधी पाहिलेला नव्हता. तो त्यांच्या इच्छेतून उत्पन्न झाला होते हे मी समजलो. त्याला दैवी अश्व जोडलेले होते. त्यांची संरक्षक व्यवस्था अप्रतिम होती. ते पाहून मला नवल वाटले. त्या रथाला विविध प्रकारचे दागिने जडवलेले होते. त्याच्याकडे धनुष्य व बाणाने भरलेले भाते होते. त्यांच्या दोनही हातात हातमोजे चामड्याचे होते. हे सगळे कधी त्यांच्याकडे आले ते मला समजलच नाही. सगळे इच्छेतून आले होते. कृतयुगात असें होत होते ते मी ऐकले आहे पण आज द्वापारात ते मी प्रथमच पहात होतो. मला दिसले कीं, भार्गवांचे जवळचे स्नेही अक्रितव्रण त्यांचे सारथी होते. जे वेदांचे ज्ञानी होते. ते मला सारखे आव्हान देत होते. बोलत होते, चल ये, चल ये लढ माझ्याबरोबर. ते सगळे दृष्य पाहून मला विलक्षण असा आनंद होत होता. मी कोण्या दुसऱ्या युगात गेलो आहे असेंच वाटत होते. माझा प्रतिस्पर्धी माझ्यापेक्षा कितीतरी पट मोठा असल्याचे मला जाणवू लागले. मी अजून माझ्या धनुष्याला बाण सुद्धा लावला नव्हता. तो अजिंक्य यमाचा दूत जणू, सूर्यासारखा चमकू लागला. त्याने आकाशातून बाणांचा वर्षाव माझ्यावर सुरू केला होता. त्यातून मला लांब बसलेली अंबा अंधूकपणे दिसत होती व तिचे ते भयंकर स्वरुप मला बेचैन करत होते. त्या मारामुळें माझे घोडे बसले. मी समजलो कीं, त्या ऋषीला आव्हान देण्याचा मूर्खपणा मी केला आहे. मी रथातून उतरलो व त्यांच्याकडे जाऊ लागलो. त्यांच्या रथापुढे उभा राहिलो, त्या महान ब्राह्मणांला मी वंदन केले. मी त्यांना बोललो, आपण माझ्यापेक्षा श्रेष्ठ अहात. त्याना नमस्कार केला हात जोडून. मी पुढे त्याना बोललो, "अहो गुरू, मी तुमच्याशा आता लढण्यास सुरूपात करणार आहे त्यासाठी मला आपल्या शुभेच्छा द्या. मला जय मिळेल असे बोला".

भार्गव मला सांगतातकीं, ज्याला यश पाहिजे तो सतत लढत राहिल भीक मागून ते मिळत नाही. जे त्याच्यापेक्षा वरचढ योद्ध्याला आव्हान देतात त्यांना आणखीन जास्त कष्ट करावे

लागतात. जर  तू आता आलास तसा नम्रपणे आला नसतास तर मी तुला शाप देणार होतो. जा आणि लढून दाखव तुझी हिम्मत आणि धाडस. परंतु, मी तुझ्या जयाची अपेक्षा करणार नाही कारण आपण दोघे प्रतिस्पर्धी आहोत. मी तुला हरवण्यासाठी तुझ्यापुढे उभा आहे. चल निघ युद्धाला तयार हो. त्यानंतर एक शेवटचा सलाम करून मी त्वरित माझ्या रथाकडे धांवत गेलो. पुन्हा माझे शंख फुंकले. त्यानंतर आमची लढाई सुरू झाली. ती कितीतरी दिवस होत होती. त्या काळात मी पहात होतो, अंबा तेथेच ध्यानस्थ बसून होती माझ्या नाशाची प्रार्थना करत होता ब्रह्माकडे. रामाने माझ्यावर  प्रथम हल्ला केला. ते नउशे साठ मोठे बाण होते. त्यांना घिधाडाचे पंख होते. त्या मारामुळें माझे घोडे व सारथी कायमचे जायबंदी झाले होते. माझा रथ अडकलेला होता, तरी मी लढत होतो. मनात मी देवांना व ब्राह्मणांना याचना करत होतो. लढत असतांना मी रामाना हसत बोललो, आपण माझ्याबद्दल किंचितही सहानुभूती दाखवली नसली तरू मी मात्र आपला चांगलाच मान राखला आहे जसा गुरूचा शिष्याने ठेवला पाहिजे. अरे ब्राह्मणा, पुण्य कमावण्यासाठी मी ते करत आहे. तुमच्या देहात वेद भरलेला आहे, आपण पूर्ण बैरागी अहात, संन्यासी अहात, अशांवर मी जीवघेणे हल्ले करू शकत नाही कारण ते कुलीन क्षत्रियाला शोभत नाही. मी तरी त्या क्षात्रतेवर हल्ला करत आहे जो आपण आता अंगिकारला आहे त्या मुलीसाठी. जेव्हां एक ब्राह्मण शस्त्र हातात घेतो, तो क्षत्रिय होतो. आता पहा माझ्या धनुर्विद्येची प्रचिती. मी तुमचे धनुष्य तोडून टाकतो ते पहा. असें बोलून मी एक बाण सोडला. त्याच्या रुद पात्यामुळें भार्गवाच्या धनुष्याटे एक टोक तुटून पडले. त्यानंतर मी शंभर बाण त्यांच्या रथावर फेकले, त्या बाणात सुद्धा गिधाडाची पंख होती. ते बाम रामाच्या अंगात गेले. त्यामुळें ते रक्त ओकू लगले. रामांचे शौर्य अद्भूत होते. त्यांचे लगळे अंग रक्ताने माखलेले होते कारण त्यांच्या अंगावर योग्य संरक्षण देणारे चिलखत नव्हते. त्या मारामुळें क्रोधीत झालेले भार्गव त्यांचे दुसरे धनुष्य घेतात. त्याने ते फार तीक्ष्ण असे असंख्य बाण माझ्यावर फेकले. त्यात नागाचे वीष होते. त्यामुळे मला भोवळ आली. मी थरथरू लागलो. तरी धीर करत मी रागावून शंभर बाण मारले. त्या बाणांमुळे ते सुद्धा बेहोष होणार होते. त्याची मला दया आली व मी तो मारा थांबवला. ते झाल्यावर मला आमच्या क्षत्रिय कर्माची लाज वाटू लागली कारण त्यामध्ये हत्या करण्या व्यतिरिक्त दुसरे कांहींच नसते. फक्त ठार मारणे हेंच कार्य क्षत्रिय करत असतात. माझ्या क्षत्रिय कर्मातून मी एक मोठे पाप केले आहे, कारण मी एका ब्राह्मणाला जखमी केले होते. मी माझ्या गुरूला इजा केल्या होत्या. मी त्या विचाराने रामांवर मारा करण्याचे थांबवले. त्यावेळी संध्याकाळ झाली होती, सूर्य मावळतीकडे झुकला होता. मी माझ्या व ते त्यांच्या विश्रांतीसाठी निघून गेलो.

अंबा उपाख्यान पर्व भाग एकशे ब्यांऐशीवा संपला.

# अंबा उपाख्यान पर्व

## भाग एकशे त्र्यांऐशीवा

पुढे भिष्म सांगतात, युद्ध संपल्यावर माझ्या सारथ्याने त्याच्या, माझ्या आणि घोड्यांच्या अंगात घुसलेले बाण चपलखपणें काढले. त्यात तो तरबेज होता. दुसऱ्या दिवशी पुन्हा युद्ध सुरू झाले. माझे घोडे मातीत लोळून तयार झाले होते. त्यांचा दाणापाणी झाले होते. त्यामुळें त्यांच्यात बळ आले होते. मला चिलखत व जिरोटोप घालून आलेले भार्गव पहातात. ते त्यांचा रथ त्यांच्या सिद्धीने तंदुरूस्त करतात व युद्धासाठी सज्ज होतात. त्यांना येतांना पाहून मी रथातून उतरलो व त्यांच्याकडे जाऊन त्यांच्या पाया पडलो. त्यानंतर पुन्हा रथात चढलो. मी न भिता त्यांच्यापुढे लढण्यासाठी तयार झालो होतो. द्वंद्व जसे सुरू झाले मी पहिल्या प्रथम बाणांचा मोठा मारा करत राहिलो. त्यामुळें त्यांनीसुद्धा कांहीं जोरदार बाण माझ्या अंगावर मारले. ते सापासारखे बाण होते व त्यांच्या मुखातून ज्वाळा येत होत्या. मीसुद्धा तसेंच बाण फेकले. दोनही बाजूंनी शेकडो हजारो बाण फेकले जात होते. त्या बाणांच्या माराचा आवाज मोठा होत होता. तो आकाशात गेला. त्यावेळी मी रामावर वायव्य नांवाचे शस्त्र फेकले. ते रामाने बाद केले. त्यानंतर आयुध गुह्यक मी फेकले. त्यानंतर मी मंत्राने भारलेले बाण वापरावयाचे ठरवले. त्यात अग्नेय होते. परंतु, रामन ती सगळी मंत्राची आयुध बाद करत होते कारण त्यांच्या कडे त्या मंत्राला बाद करणारे मंत्र वरुण होते. जसे ते माझी आयुध बाद करत होते त्याप्रमाणे मीन त्याची आयुध बाद करत होतो. ते युद्ध जास्तकरून मंत्रांचे होते. माझ्या मंत्रविद्येची एकाप्रकारे परीक्षा ते घेत होते असें मला वाटले. त्या न संपणाऱ्या लढाईने चिडलेले जमदाग्नीचे पुत्र अचानक माझ्या जवळ आले व त्यांच्या भाल्याने मला जबर जखमी केले. तो हल्ला अचानक होता. मला भोवळ आली. मी बेहोष होऊन पडलो माझ्या रथात. मला बेशुद्ध झालेले पाहून माझ्या सारथ्याने मला रणक्षेत्रातून बाहेर नेले व माझ्यावर उपचार करू लागला. मी बेशुद्ध पडलो आहे हे पाहून रामाचे साथीदार ज्याच ऋषी अक्रितव्रण होते आनंदाने टाळ्या वाजवू लागले. त्यात अंबासुद्धा विशेष आनंदीत झालेली होती असें मला माझ्या सारथ्याने नंतर सांगितले. ते सगळे जोरांने ओरडून त्यांचा विजय झाला आहे अशाप्रकारे वागू लागले. मी माझ्या सारथ्याला बोललो, राम जेथे आहे तेथे मला ने मी त्याच्यावर बाणांचा पर्षाव करणार आहे. ते ऐकून तो मला त्यांच्यात घेऊन जातो. तेथे मी मारलेल्या प्रत्येक बाणाच्या बदल्यात राम तीन बाण मारत होते. माझे सगळे बाण मोडून तोडून टाकले जात होते. जसे माझी बाण फोडले जात होते रामाच्या बाजूची मंडळी हर्ष भरून नाचत होती. अंबेचा आनंद तर विचारू नका असा होता. मी जेवढा मार खात होतो तेवढा तिला आनंद होत होता. त्यामुळें संतापलेला मी रामावर त्यालाठार मारण्याच्या इराद्याने त्याच्या डोक्यावरच फेकला. तो वर्मी लागला व राम स्वतः बेशुद्ध झाले. त्यावेळी रामाच्या बाजूचे एकदम गप्प झाले होते. सगळीकडे गोंधळ पसरला. असें वाटावे कीं, सूर्य आकाशातून खाली कोसळला आहे. त्यावेळी तेथे असलेले

सन्यासी, ऋषी, रामाला धरून बसले होते. अरे कौरवा, ते रामाला बरे वाटावे म्हणून कांहीं उपाय करू लागले होते. अंबा निराश झाल्यासारखी मला दिसली. ती सगळया प्रकाराला केंद्रबिंदू होती. थोड्या वेळानी राम उठले. ते मला चिडक्या आवाजात बोलले, अरे भिष्मा, आता तू मेल्यात जमा आहेस. असा हल्ला तू करशिल असें मी समजलो नाही पण जर तेंच करावयाचे असेल तर मीसुद्धा कांहीं कमी नाही. त्यांच्या हिसक्याने मी कोसळणाऱ्या झाडासारखा कांपू लागलो. त्यांने माझे घोडे मारून टाकले. त्यानंतर खरी धुमश्चक्री युद्ध सुरू झाले, खेळ संपला होता व मरण्या मारण्याची लढाई सुरू झाली. त्यांची बाण मारण्याची चपळाई विलक्षण होती. आमच्या दोघांच्या बाणांनी आकाश भरून गेले होते. इतके कीं, सूर्य झाकला गेला होता. त्या बाणाच्या घर्षणाने आकाशात अग्नी उत्पन्न झाला व ते जळणारे बाण खाली पडत होते. सगळीकडे आगी लागल्या होत्या. राम आता खरोखरच फार संतापलेले दिसत होते. त्यांना असंख्य बाणाने मला घेरले. मी सुद्धा तसेंच करत होतो. माझ्या सर्पीण बाणामुळें त्यांचे बाण फोडले जात होते. अरे दुर्योधना अशाप्रकारे आमचे युद्ध चालू होते. जसे संध्याकळ होत आली, माझ्या गुरूने त्या दिवसाचा केला युद्ध विराम.

अंबा उपाख्यान पर्व भाग एकशे त्र्यांऐंशावा संपला.

# अंबा उपाख्यान पर्व

## भाग एकशे चौऱ्यांऐशीवा

भिष्म पुढे सांगतात, तिसऱ्या दिवशी आमची लढाई फार भयंकर होती. माझे गुरू त्यांची दैवी आयुधं नवनवीन बाहार काढत होते. जीवाची बाजी लावून आम्ही लढत होतो. मीसुद्धा माझी शस्त्र वापरू लागलो ज्यांमुळें त्यांची आयुध निष्प्रभ होत होती. ती लढाई आता चुरशीची झाली होती, ती आता त्या अंबासाठी राहिली नव्हती. राम स्वतः त्यात गुंतले होते कारण तो त्यांच्यासाठी एक प्रतिष्ठेचा प्रश्न होता. आपल्या शिष्याकडून हरणे कदाचित त्यांन मंजून नसेल. त्यांची आयुध निष्काम होत असल्याचे पाहिल्यावर त्यांना माझ्यावर एक भाला फेकला, त्यातून ज्वाळा येत होत्या. तो साक्षात मृत्यू होता माझ्यासाठी. परंतु, मी प्रसंगावधान राखून त्या जळत्या भाल्याचे तीन तुकडे केले व त्याची ताकद नष्ट केली. त्यावेळी सुगंध घेऊन येणारे वारे वाहू लागले. त्याचा भाला व्यर्थ गेल्याचे लक्षात आल्यावर रामाने अनेक छोटे शर माझ्यावर फेलण्यास सुरूवात केली. त्यांचे मी तुझ्यासाठी वर्णन करू शकणार नाही. ते इतक्या जोराने माझ्याकडे येत होते त्यांना मी नीटपणे पाहू शकत नव्हतो. तरी मी सांगतो थोडक्यात कीं, ते लवलवत्या जीभेसारखे लांबलचक होते. ते पाहून मी प्रथमच घाबरलो, ते बाणांचे जाळे माझ्या अंगावर येत होते. तो खाली दाबण्यासाठी मी माझे बाण फेकण्यास सुरूवात केली. त्यानंतर आणखीन बाण फेकून मी रामाच्या त्या बाणांच्या जाळयाचा नाश केला. त्यानंतप जमदाग्नीच्या मुलांनी आणखीन बरेच बाण माझ्यावर फेकले. त्या सोनेरी बाणांतून आग बाहेर पडत होती. त्यांपासून माझे संरक्षण मी माझ्या ढालीने करत होतो. त्यामुळें ते बाण त्यावर आपटून खाली पडत होते. त्यानंतर मी बाणांचे ढग तयार केले व त्यात रामाचे घोडे आणि सारथी ह्यांना बंद केले. ते पाहून त्याने पुन्हा दैवी आयुधांचा वापर करण्यास सुरूवात केली. त्या कार्तवीर्यार्जुनाचा वध करणारा माझा गुरूने माझ्यावर त्याची खास शस्त्र वापरण्यास सुरूवात केली. त्याने टोळासारख्या दिसणाऱ्या छोट्या बाणांचा उपयोग करणऩ्यास सुरूवात केली. त्यामुळे माझे घोडे, सारथी आणि रथ सगळे भरून गेले. ते लहान बाण रथाच्या चाकात, त्याच्या आंसात, घुसल्याने रथ हलेनासा झाला. ते पाहुन मी मोठे बाण त्याच्यावर थेट मारण्यास सुरूवात केली त्यामुळे माझा गुरू रक्ताने घायाळ झाला. त्याच प्रमाणे मी त्याच्या बाणाने बेजार झालो होतो. त्यानंतर संध्याकाळ झाली. सूर्य पश्चिमेकडे खाली सरकू लागला तेव्हां रिवाजानुसार आम्ही त्या दिवसाचे युद्ध थांबवले.

अंबा उपाख्यान पर्व भाग एकशे चौऱ्यांऐशीवा संपला.

## अंबा उपाख्यान पर्व

## भाग एकशे पंच्याऐंशी

भिष्म पुढे सांगत असतात, चौथ्या दिवशी आमचे द्वंद्व पुन्हा सुरू झाले. त्यांच्या चपळ रथावर स्वार झालेले माझे गुरू राम, पुन्हा बाणांचा वर्षाव सुरू करतात. माझा सारथी त्यामुळें बावचळून जातो. त्याचा तोल जातो, त्यामुळें मला काळजी वाटू लागते. तो पूर्णपणे बेशुद्ध झाला होता. त्या मुळें त्याचा मृत्यू होतो. मला भिती वाटू लागली होती. मी त्याच्या मृत्यूमुळें खच्ची झालो होते तेव्हां  रामाने माझ्यावर पुन्हा हल्ला केला. त्याचे बाण म्हमजे साक्षात मृत्यू होते. त्याच्या बाणांने मला खोल जखमा झाल्या होत्या. मला क्षणभर वाटले आता माझा मृत्यू येऊन ठेपला आहे. रामाने विजयाच्या आरोळया ठोकण्यास प्रारंभ केला. मी त्या मारामुळें जमिनीवर पडलो. भार्गावाच्या आनंदाला पारावार नव्हता. पुन्हा अंबा जोरजोरांने टाळया वाजवायला लागली. मला पडलेला पाहून माझ्या बरोबर आलेले कौरव (कुरु घरातील माणसे) अस्वस्थ झाले होते. मी जमिनीवर आडवा पडलो होते, मी पाहिले कीं, आठ ब्राह्मण ज्यांचे तेज सूर्यासारखे होते, माझ्या भोवती रिंगण करून उभे होते. मला त्यांचा आधार मिळाला होता. मला त्यांनी पकडल्यामुळें मी जमिनीवरून उचलला गेलो होतो. मला ते हवेत धरून होते. ते माझ्या डोळयांवर पाणी शिंपडत होते. ते मला पुन्हा पुन्हा सांगत होते, घाबरू नकोस. तुझा अंती जय होईल. त्या त्यांच्या वागण्यामुळे मला पुन्हा जोर आला. मी चटकन उठलो, मी पहात होतो कीं, माझी आई भागिरथी जिने माझे सारथ्य केले होते जेव्हां माझा सारथी मेला होता, मी तिची प्रार्थना करु लागलो. मी माझ्या पितरांची आठवण करत राहीलो. त्या परिस्थितीत मी मला सावरत रथात चढलो. माझी आई त्या रथाचे संरक्षण करत होती. त्यातील सगळी आयुध आणि शस्त्रं तिने संरक्षित केली होती. मी हात जोडून तिला विनंती केली कीं आता तिने जावे. त्यावर ती निघून गेली. त्यानंतर मी स्वतः माझे घोडे हाकू लागलो. त्या अवस्थेत मी रामाबरोबर लढत राहीलो. तो दिवस संपत आला होता. त्यान त्वेषात मी रामावर एक जबरदस्त वार केला. त्याच्या फटक्याने त्याची धनुष्यावरील पकड सैल झाली. तो जमिनीवर गुडघ्यांवर पडला. बेशुद्ध झाला होता. तो सोन्याची नाणी उधळणारा भार्गव अशारितीने पडल्यावर आकाशात काळी ढग जमू लागली आणि जोराचा रक्ताचा पाऊस सुरू झाला. अशनि कोसळू लागले. सगळी पृथ्वी हादरून गेली होती. आकाशातील सुर्या ढगांनी झाकला होता. वारे जोरांने वाहू लागले, गिधाडं, कोल्हे ओरडू लागले. क्षितीजावर कोल्हे ओरडतांना दिसू लागले. माणसांने वाजवलेली ढोलकी ऐकू येऊ लागली. त्यांचे न सहन होणारे कर्कश्य आवाज कानात भिडू वागवे. रामाने पृथ्वीला कवटाळले होते. तो अजून बेशुद्धच होता. ती सगळे अशुभ लक्षणं मला जाणवत होती. ते मी अनिभवत असतांना अचानकपणे राम उठले. माझ्या जवळ आले, त्याने माझ्याशी पुन्हा युद्ध सुरू केले. मी त्याना अडवत राहीलो. त्यांचा क्रोध विलक्षण होता. तो महान ब्राह्मण उभे होते, त्यांची हालत

फारच वाईट झाली होती. त्यांचा राग मात्र आवरला नव्हता. ते पहात असतांना मी एक बाण घेतला, त्यांच्यावर फेकला पण रामाने तो वार उलटवला. ते पूर्ण शुद्धीत होते. सूर्याची तबकडी हवेतील धुळीमुळें अंधूक झालेली होती. हवेत मंद वारा वहात होता. संध्याकळ होणार होती. संध्याकळचा सुखद करणारा वारा वहात होता. त्या दिवशीची लढाई संपली होती. पुन्हा उद्या सुरू होण्यासाठी. असें तेविस दिवस चालू होते.

अंबा उपाख्यान पर्व भाग एकशे पंच्याऐंशीवा संपला.

# अंबा उपाख्यान पर्व

## भाग एकशे श्यांऐंशीवा

भिष्म पुढे सांगत होते, झोपण्या आधी मी सगळया ब्राह्मणांना, ऋषींना, देवतांना आणि रात्री संचार करणाऱ्या शक्तींना वंदन करून माझ्या शय्येवर आडवा झालो. त्या एकांतात मी विचार करत होतो. बरेच दिवस हा संग्राम चाली आहे माझ्यात आणि रामात, मी त्यांना हरवू शकत नाही. जर मी समर्थ असेन तर देव मला ह्या रात्री मार्गदर्शन करतील. माझे शरीर बाणांच्या जखमांनी भरलेले होते. त्या रात्री ज्या दिव्य ब्राह्मणांनी मला आधी उचलून धरले होते ते सगळे ब्राह्मण मला दिसू लागले. अरे दुर्योधना, ते एक स्वप्न होते. ते त्या स्वप्नात येऊन मला म्हणाले, "अरे कुरु घराण्याच्या वारसा, अरे गंगापुत्रा, तू घाबरू नकोस, आम्ही तुझे संरक्षण करत आहोत. तो जमदाग्नीचान मुलगा तुला कधींच पराजित करू शकणार नाही. तू भरत वंशाच्या त्याला अखेरीस हरवणार आहेस. तुझ्याकडे एक आयुध आहे ज्याचे नांव आहे, प्रस्वप, ते ब्रह्माचे आहे. ते फक्त दैवी उर्जेनेच कार्यरत होते. त्याची माहीती तू ह्या जन्मात विसरला आहेस पण आमच्या कृपेने त्याचे ज्ञान तुला आता होईल. प्रस्वप ह्या आयुधाचे ज्ञान कोणालाच आज नाही, अगदी रामालासुद्धा नाही. त्या आयुधाची आठवण करत रहा. म्हणजे ते तुला आठवेल. त्याचा उपयोग कर लढतांना. तुझ्या तपस्येमुळें ते तुला आपसुकपणे प्राप्त होईल. तरी रामाला तू ठार मारू शकणार नाहीस. तरी त्याचा उपयोग केल्याने तुला पापसुद्धा लागणार नाही. मात्र तो प्रस्वपाच्या प्रभावामुळे घाढ निद्रेत जाईल. जसा मेला आहे. त्यामुळे तो हरेल तुझ्यापुढे. त्यानंतर दुसरे एक आयुध आहे ज्याचें नांव आहे, संवोधन, त्याचा उपयोग करून तू रामाला शुद्धीवर आणू शकशिल. आता जे सांगितलेते लक्षात ठेव आणि त्याचा उपयोग उद्याच्या लढाईत कर. आमच्या दृष्टीने झोपलेला अथवा मेलेला सारखेच असते. असें सांगून ते एकसारखे दिसणारे तेजस्वी आठ जण अदृष्य झाले.

अंबा उपाख्यान पर्व भाग एकशे श्यांऐंशीवा संपला.

# अंबा उपाख्यान पर्व

## भाग एकशे सत्त्याऐंशीवा

भिष्म पुढे सांगत असतो, ती रात्र संपली, मी उठलो, मी त्या स्वप्नाचाच विचार करत होतो. आमच्यात हरदिवसाप्रमाणे पुन्ही लढई सुरू झाली. ती भयंकर होती, ते युद्ध पहाणाऱ्यांच्या अंगावरील केस उभे राहीले होते. नेहमी प्रमाणे तो भाणांचा वर्षाव करत होता व मी ते परत करत होतो. रामांने रागात इंद्राच्या वज्रासारखा प्रभावी बाण माझ्यावर फेकला. तो यमाच्या गदे सारखा शक्तीमान होता. तो माझ्या अंगावर वेगांने आला, त्याच्या प्रभावामुळे सगळीकडे आग पसरली होती. त्याच्या फटक्याने मी खाली माझ्या खांद्यावर पडलो. माझ्या सर्वांगावर रक्त पसरले होते. त्यानंतर उठून मी एक विषारी बाण त्याच्यावर मारला. तो त्याच्या कपाळाला लागला. त्यामुळें चिडलाल्या माझ्या गुरूंने एक भयंकर साक्षात मृत्यू असा बाण माज्यावर मारला. ते बाण माझ्या छाती वर लागले. त्यामुळें तो बेहोष झाला. राम थरथरा कापूं लागला. ते पाहून त्यांचा मित्र महान बैरागी, तपस्वी अक्रितव्रण त्याला मिठी मारतो. त्याचे सांत्वन करत असतो. त्याचा जोम वाढवण्याचा प्रयत्न करत असतो. भार्गवाला फार क्रोध आला होता. त्याला तो अपमान वाटला होता. त्यांने ब्रह्मास्त्र काढले, त्याला चुकवण्यासाठी मी त्याच ताकदीचे दुसरे अस्त्र काढले. ती दोन अस्त्र एकमेकांना टक्कर देत होती. ती चमकू लागली. ती माझ्या व रामाच्या पर्यंत पोहोचू शकत नव्हती. त्यांच्या प्रभावामुळें सगळे प्राणिमात्र ओरडू लागले होते. त्यांचा त्रास ऋषींना, गंधर्वांना, देवांना होऊ लागला होता. पृथ्वी हादरून गेली होती. आकाशात त्यांचे तेज दिसत होते. क्षितीजावर धूर पसरला होता. सगळे प्राणी त्यांच्या जागा सोडून बाहेर आले होते. जगातील देव, राक्षस, असुर, यक्ष असें सगळे काळजी करू लागले होते. त्यावेळी प्रस्वप वापरावे असें मला वाटू लागले. अरे दुर्योधना, मी प्रस्वप ब्रह्माच्या परवानगीने उपयोगात आणण्याचे ठरवलेसुद्धा. त्यांचे मंत्र अचानकपणे मला आठवू लागले.

अंबा उपाख्यान पर्व भाग एकशे सत्त्यांऐंशीवा संपला.

# अंबा उपाख्यान पर्व

## भाग एकशे अठ्ठ्यांऐंशी

भिष्म सांगत असतात, माझ्या मनाने निश्चित केले कीं, ते प्रस्वप वापरावयाचे, आकाशातून खोल असा आवाज मला ऐकू येऊ लागला. तो आवाज मला बोलला, अरे कुरीलाच्या वंशजा, ते वापरू नकोस. ते ऐकत असतांना सुद्धा मी प्रस्वप रामावर नेम धरून ठेवले होते. तेव्हां नारद तेथे मला बोलले, ते पहा देव तेथे तुझ्याकडे पहात आहेत. तेसुद्धा तुला प्रस्वपाचा वापर रू नकोस असें सांगत आहेत, ते तुला समजत नाहीं कां? त्याचा नेम लावू नकोस. भार्गव ब्रह्माच्या योग्यतेचे आहेत, त्यांच्यावर हे वापरावयाचे नसते. ते ऐकल्यावर मी ते न वापरण्याचे ठरवले. मग मी पुन्हा ब्रह्मास्त्र काढले. त्यावेळी राम ओरडून बोलले मी हे काय करत आहे, मी हरलो आहे. त्याना त्यांचे पितर दिसू लागले. ते रामाचे सांत्वन करत होते. ते त्याला बोलले, "अरे भिष्माशी लढण्याचा असा आततांईपणा तू करावयाला नको होतास. तो भृगूकुळाचा आहे ह्याचा तुला विसर पडला कां"? कांहीं कारणा साठी तुला शस्त्र हातात घ्यावयाला सांगितले होते, त्याची तू मर्यादा ओलांडली होतीस. ही तुझी भिष्मशी लढाई शेवटची असेल. ह्यापुढे तू शस्त्र हातात घेणार नाहीस. ह्यापुढे तू तपस्या करत असशिल कारण तेंच तुझे शस्त्र असेल. सगळे देवसुद्धा भिष्माला शांत करण्याचा प्रयत्न करत आहेत. ते त्याला सांगत आहेत की, राम त्याचा गुरू आहे व गुरूशी कोणी लढत नाही, ते शिष्टाचाराच्या व नैतिकतेच्या विरुद्ध आहे. अरे गंगापुत्रा जा आणि तुझ्या गुरूला वंदन कर व त्याची क्षमा मांग कारण तू तुझी मर्यादा ओलांडला आहेस. आई, पिता व गुरू ह्यांच्याशी लढणे नैतिकतेच्या मर्यादेत येत नाही. त्यांना फक्त मान द्यावयाचा असतो. कारण त्यात कोणी कमी अथवा ज्येष्ठ ठरत नाही. ते भार्गावाला सांगतात, अरे भिष्म शंतनुचा मुलगा एक वसु आहे, त्याला तू कसा हरवणार"? अशारितीने आम्हा दोघांना आमच्या जागा सांगितल्या गेल्या व ते द्वंद्व थांबवण्याचे इशारे दिले गेले.

त्याच प्रमाणे कुंतीची मुलं देव आहेत. त्यातील अर्जुन साक्षात इंद्र आहे. त्यांना कोणी मारू शकत नाही. पण तो भिष्माला मारू शकतो दुसरा कोणीही नाही असें संकेत आहेत.

भिष्म पुढे सांगतो, अशाप्रकारे रामाच्या पितरांनी सांगितल्यानंतर राम त्यांना बोलतो, मी हे युद्ध सोडू शकत नाही. कारण तसे माझे ब्रीद आहे. मी आता पर्यंत कधी द्वंद्व मध्येच सोडलेले नाही. तुमची तशी इच्छा असेल तर भिष्माला माघार घ्यावयाला लावा. ते ऐकल्यावर त्यांचे पितर ज्यांचे प्रमुख होते रुचीक माझ्याकडे आले. त्यांच्या बरोबर नरद सुद्धा होते. मला म्हणाले, युद्ध आत्ताच्या आत्ता थांबव. हा ब्राह्मणांचा हुकूम आहे. क्षत्रियानी तो मानावयाचा असतो. मी त्यांना बोललो, मीसुद्धा शपथ बद्ध आहे, माझी शपथ आहे कीं मी कधीही युद्धात माघार घेणार नाही. मी माझी शपथ कोणत्याही कारणासाठी मोडू शकत नाही. तो माझा हट्ट पाहून सगळे देव

व माझी आई त्या रणभूमीवर अवतरले. मी मात्र माझी आयुध धरून तसांच उभा राहिलो होतो. ते रामाला विनंती करतात की, खरा ब्राह्मण दयाळू असतो. म्हणून तू त्याला क्षमा कर व युद्ध सोड. मोठ्याने नेहमी लहानांना क्षमा करावयाची असते. ते बोलत असतांना अशारितीने रणभूमीवर उभे होते कीं, आम्ही दोघे लढू शकत नव्हतो. रामाच्या पितरांनी त्याला त्याची आयुध आवरावयाचा हुकून केला. तुम्ही दोघे एकमेकांना मारू शकणार नाहीत कारण ते विधीत दिलेले नाही. मला ते आठ वसु (ब्राह्मण) आकाशात दिसत होते त्यांचे तेज सुर्यासारखे होते. ते मला बोलले, "अरे भिष्मा, आता तू रामाला जाऊन भेट व सलोखा कर कारण गुरूच्यापुढे नमणे हेंच शिष्याचे कर्तव्य असते. स्वताच्या शब्दा पेक्षा जगाचे हित जास्त महत्वाचे असते ह्या तत्त्वाचा तुला विसर कसा पडला"?

मी जखमांने भरलेला होतो तरी कसा बसा रामाकडे गेले, त्याची पुजा केली. राम माझ्याकडे पहात स्मित करत बोलले, तुझ्या सारखा क्षत्रिय जगात दुसरा नाही. ह्या द्वंद्वाच्या निमित्ताने मला तुझ्या हिम्मतीचा अंदाज आला. मी तुझ्यावर प्रसन्न आहे. जा त्या काशीच्या राजकन्येस माझ्याकडे घेऊन ये. तिला पाहून ते बोलले, तेथे असलेल्या सगळयांच्या समक्ष, त्यांच्या बोलण्यात दिलगिरी व खेद जाणवत होते.

अंबा उपाख्यान पर्व भाग एकशे अठ्ठ्यांऐंशीवा संपला.

# अंबा उपाख्यान पर्व

## भाग एकशे एकोणनव्वदावा

राम तिला बोलतात, "अहो काशीनरेश कन्या, तुझ्या नजरेसमोर मी भिष्माशी तुझ्यासाठी लढलो. माझ्या कुवतीप्रमाणे मी माझी बाजी लावली ते तू पहात होतीस. मी उत्तमोत्तम शस्त्र, आयुधं आणि अस्त्र वापरून लढलो ह्याबद्दल तुला शंका करण्याचे कारण नसावे. परंतु, मी त्याला बाद नाही करू शकलो ते तू पाहिले आहेस. ह्यापेक्षा जास्त मी कांहीं करू शकणार नाही. माझा नाइलाज झाला आहे ते सुद्धा तू प्रत्यक्ष पहात आहेस. तू तुझ्या मार्गाने जावेस असे मला वाटते. तुला जे करावयाचे आहे ते तू कर. मी तुझ्यासाठी दुसरे कांहीं करण्यायोग्य असेल तर ते सांग. मला वाटते तू ह्या भिष्माच्याच आधाराने जगावे. कारण तुला दुसरा कोणताही आधार उरलेला मला दिसत नाही. भिष्माने एकापरीने मला हरवले आहे. ते बोलल्यानंतर तो महाऋषी गप्प बसला. ते ऐकल्यावर ती स्वामिनी रामाला बोलते, अहो पवित्र मुनी, तुम्ही म्हणता ते मला पटते कीं, हा भिष्म फार बुद्धीमान आहे व शस्त्रविद्येत प्रवीण आहे. तो देवांनासुद्धा हरलू शकतो. आपण मला मदत करण्याचा जो प्रयास केला आहे त्याबद्दल मी आपले कसे आभार मानावे ते मला समजत नाही. आपण विविध शस्त्र, अस्त्र आणि आयुधांचा उपयोग केला ते सगळे मी पाहिले. माझ्याबाबत बोलावयाचे तर मी ठरवले आहे कीं, मी पुन्हा माझ्या पित्याकडे जाणार नाही अथवा सल्वाकडेसुद्धा जाणार नाही. ह्या भिष्माचा आधार घेण्याचा प्रश्नच उद्भवत नाही. कारण हा मनुष्य नीच आहे. मी वैराग्य धर्माने माझे पुढील जीवन व्यतीत करणार आहे. असे वैराग्य की, ज्यामुळें मला एकदिवस ह्या हलकट माणसाचा वध करता येईल इतकी शक्ती प्राप्त होईल. तो कितीही सूर असला तरी मी त्याला मारणार आहे व माझे हे वचन मी तुम्हाला आज देत आहे. ते ऐकल्यावर राम त्याच्या साथीदारांसह निघून जातो. संतापाच्या भरात अंबा माझा नाश करण्याची प्रतिज्ञा घेते. तिचे म्हणणे असें कीं, मी तीला स्पर्श केला जेव्हां तिला तिच्या बहिणींबरोबर मी माझ्या रथात घेतले. असें करणे खऱ्या ब्रह्मचर्यास शोभत नाही. तिच्या मते मी ब्रह्मचारी सुद्धा नाही कारण वेदांतील वचनांप्रमाणे जो पुरूष स्त्रियांबद्दल आत्यंतिक सन्मानाची व आदराची भावना बाळगतो तोंच ब्रह्मचारी समजला जातो परंतु, मी ज्या प्रकारे त्या तिघींना रथात घेऊन पोबारा केला हे ब्रह्मचर्याचे लक्षण नाही. खरा ब्रह्मचारी असे कधीच करणार नाही. माझे ते वागणे भ्रष्ट क्षत्रियासारखेच होते. म्हणून मी तिच्या दृष्टीत एक नीच माणूस आहे व माझा नाश होणे क्रमप्राप्त आहे. ती पुढे म्हणाली, भार्गवाला एक भ्रष्ट क्षत्रिय ठार मारता आला नाही ह्यांत त्यानीसुद्धा त्यांचे वचन पूर्ण केले नाही. अबा भार्गावाला सांगते कीं, मी दाखवतो तसा पवित्रसुद्धा नाही. कारण पवित्र पुरूष अशा वाह्यात गोष्टी कदापीही करणार नाही. अशारितीने ती तिची नाराजी मोठ्याने बोलत व्यक्त करते. भार्गव ते ऐकून कांहीं न बोलता तेथून निघून जातात, जेथून ते आले होते त्या महेंद्र पर्वताकडे प्रयाण करतात. मी माझ्या रथात चढतो, माझे

ब्राह्मण माझी स्तुती करत होते. त्यानंतर मी राजधानीकडे आलो. तेथे सत्यवतीला सगळे जे घडले ते सांगितले. तिने मला शुभेच्छा दिल्या. त्यानंतर मी माझे हेर लावले त्या अंबावर लक्ष ठेवण्यासाठी असें कीं तिला त्याची खबर लागणार नाही. ते माझे हितचिंतक हेर तिच्यावर पाळत ठेवून होते. तिच्या सगळया हालचाली मला समजत होत्या. ती कोठल्या अरण्यात काय करते ते सगळे मला समजत होते. ती साध्वी अंबा अरण्यात गेली तपस्या करण्यासाठी. घोर तप तिने आरंभले होते. ती एकटी, ब्रह्माच्या स्मरणात आपला समय घालवत होती. ते पाहून मला तिची काळजी वाटू लागली. मी तसेंच तप केले होते व म्हणून मला कोणीही क्षत्रिय हरवू शकत नव्हता, ते तप तिने आरंभलेले होते. ते पाहून अस्वस्थ झालेली मी नारदांना भेटतो. व्यासऋषीलासुद्धा भिटलो. तिच्या बद्दल बोललो. ते मला बोलले काशीनरेशाच्या कन्येसाठी मी शोक करू नये. ते तिचे प्राक्तन आहे. ती एक अप्सरा आहे. ती सामान्य स्त्री नाही. तिच्या घोर तपस्येने मी जास्त घाबरलो होतो जेवढा कधी युद्धाच्या गोष्टींने सुद्धा घाबरलो नव्हतो. स्त्रीची शक्ती साक्षात अंबेची असते हे मी जाणून होतो. यथावकाश तिने असें तप आरंभले जे फार अवघड असते. मी जाणतो कारण, ती सगळी मी एकेकाळी केली होती. उपाशी पोटी, कृश झाली होती, तिच्या डोक्यावरील केस अव्यवस्थित असें पिंजारलेले झाले होते, जटा झाल्या होत्या. अंग मातीने भरलेले होते. ती बहुधा हवा खाऊन रहात होती. एका जागी उभी राहून ती ध्यानस्थ रहात रहात होती. तसे एक वर्ष गेले. त्यानंतर ती यमुना नदीत उभी राहून ध्यान करू लगली होती. तिचा माझ्यावरील राग यत्किंचितही कमी झालेला नव्हता. नंतर एका पायाच्या बोटांवर उभी राहून ती ध्यान करत होती. दिवसातून फक्त एक पान खाऊन ती रहात होती. अशी बारा वर्ष गेली. तिच्या घोर तपस्येने स्वर्गसुद्धा तापला गेला. तिचे आप्त सुद्धा तिच्यावर नजर ठेवून होते परंतु ती त्यांचे एक ऐकत नव्हती. कोणत्याही मार्गाने तिला त्या तपस्येपासून दूर करू शकत नव्हते. त्यानंतर ती वत्सभूमी कडे गेली. जेथे सिद्ध आणि चरण रहातात. तेथे उच्च दर्जाचे पवित्र तपस्वी असतं. तेथील पवित्र पाण्यात स्नान ती करत असे. ती तिच्या मर्जीनुसार इतरत्र भटकत असें. त्यानंतर ती विविध ऋषींच्या आश्रमांना भेट देऊ लागली. त्यात नारद, उलुक, च्यवन ह्यांचे आश्रम होते त्याशिवाय ती ब्रह्माच्या तीर्थक्षेत्री सुद्धा जात होती. ती प्रयागला गेली होती. तेथे देवांचे यज्ञ होत असें ते ठिकाण होते. त्यानंतर ती त्या पवित्र वनात गेली ज्याला भोगवती म्हणून ओळखतात. तेथे कुशिकाचा मुलगा विश्वामित्र ह्याच्या आश्रमाला गेली. त्यानतर मांडव्य, द्विलिप, रम्हरद, गर्ग अशा ठिकाणी ती गेली. तेथे ती अर्घ्य वाहून पुजा करत होती. ते करत असतांना तिचे तप चालूच होते. एकदा माझी आई गंगा तिला बोलली कीं, "एवढे मनाला कां लावले आहेस माझ्या वागण्याचे? मला सांग तुला काय. सलते आहे"? अंबा तिला बोलली हात जोडून, "त्या भार्गवाला भिष्माने हरवले आहे, त्या भिष्माला मला ठार मारावयाचे आहे. असा क्षत्रिय मला घडवावयाचा आहे जो त्या भिष्माला ठार मारील. शस्त्र, अस्त्र आणि आयुधाने जो मरत नाही तो तपस्येने जरूर मारला जाईल. मी त्यासाठी पृथ्वीवर भटकत आहे. एक दिवस मी त्याला ह्या नाही तर त्या

स्वरुपात ठार मारणार आहे". ते ऐकून गंगा तिला बोलते, "अग मुली, तुझे हे वागणे विकृत आहे. तुझी ती इच्छा कधीच पुरी होणार नाही. तू आता फार अशक्त झाली आहेस. अशा ध्येयाचा सतत विचार करत तू जर मेलीस तर तू एक छरा होशिल ज्यात फक्त पावसाळयात पाणी असेल. त्या झऱ्याचा मार्ग वळणा वळणाचा असेल. तुला सगळे प्राणी घाबरतील, तुझ्या पर्यंत कोणी पोहोचू शकणार नाही. असें सांगून माझी माता हसली. ती म्हणाली तुझ्या भयानक हिंस्र प्राणी जसे मगरी, सुसरी वावरत असतील. असे सांगून गंगा निघून गेली. त्या गंगेच्या बोलण्या कडे दुर्लक्ष करत ती पुन्हा नवीन तप करण्यास प्रारंभ करते. ती संपूर्ण अन्न त्याग करते. कधी आठ महीने तर कधी दहा  महिने ती तसे उपवास करत होती. पुन्हा ती तीर्थयात्रा करू लागली. ती पुन्हा वत्सभूमीला येते. तेथे ती मरते व एक झरा बनते. गंगेने सांगितले तसेंच त्या झऱ्याचे स्वरुप होते. मला फार वाईट वाटले. त्या झऱ्यात भयंकर सुसरी होत्या. त्यात तिच्या घोर तपस्येमुळे फक्त अर्धी झरा झाली व उरलेली ती स्त्री रुपातच राहिली.

अंबा उपाख्यान पर्व भाग एकशे एकोण नव्वदावा संपला.

# अंबा उपाख्यान पर्व

## भाग एकशे नव्वदावा

भिष्म पुढे सांगतात, वत्सभूमीत तो झरा उत्पन्न झाल्यामुळें तेथे असलेले संन्यासी एकत्र होतात व तिला विचारतात कीं, तिला काय करावयाचे आहे. ते विचारल्यानंतर ती त्यांना सांगते, मी घोर तपस्या करत आहे कारण मला भिष्माचा वध करावयाचा आहे. त्याने माझे जीवन बरबाद केले आहे. माझी वैवाहिक जीवन त्याने उध्वस्त केले आहे त्यासाठी मी त्याला अद्दल घडवणार आहे, म्हणजे पुढे कोणीही पुरूष बाईशी अशाप्रकारे वागणार नाही. त्या पुरूषाला बायकांबद्दल आदर भाव नाही. तो बाईला उपभोग्य वस्तु समजतो म्हणून त्याला मी शासन करणार आहे, तो माझा निर्धार आहे. तो नीच पुरूष स्वताला कुलिन क्षत्रिय समजतो परंतु, प्रत्यक्षात तो भ्रष्टाहूनही भ्रष्ट क्षत्रिय आहे. त्याने त्याच्या गुरूचा अपमान केला आहे अशा पुरूषाचा नाश होणे आवश्यक आहे. त्याची चांगलीच खोड मोडणार आहे मी. त्यासाठी मी हे सगळे करत आहे. मी त्याच्या नाशासाठी अध्यात्मिक सामर्थ्य कमावण्यासाठी हे तप करत आहे, मला मोक्ष नको आहे आता त्याचे नंतर पाहीन. एकदा भिष्म मारला गेला युद्धात, त्याच्या क्षेत्रात, मग मला शांती मिळेल. हा माझा निर्धार आहे. त्याच्या मुळें माझे ध्येय माझी मनिषा, माझे जीवन बरबाद झाले त्याला मारण्याचा मला क्षत्रिय न्यायाने अधिकार पोहोचतो. मला त्यापासून कोणी अडवू शकणार नाही. त्याला मी मारणार हे निश्चित त्याची आई त्याला वाचवण्याचा प्रयत्न करते पण मी तिलासुद्धा जुमानत नाही. असेल मोठी गंगा, माझ्याकडे तिला गवताच्या काडी इतकीसुद्धा किमत नाही. हे सगळे स्वर्गातील पुंड आहेत, चुकून पृथ्वीवर आले आहेत. त्याने मला ना स्त्री ना पुरूष असें केले आहे. त्याची त्याला शिक्षा होणार मी काशीनरेशाची राजकन्या आहे व माझा तो न्याय असेल. त्याच्याशी लढण्यासाठी मला पुरूषपण हवे आहे. मला दुसरे कांहीं सांगू नका. जर तुम्ही मला कांहीं मदत करू इच्छित असाल तर ते कसे होईल ते पहा. तिचे बोलणे महादेवाची उमा ऐकते. ती तिच्या अर्धनारी रुपात तिच्या पुढे त्या सगळया ऋषींच्या समक्ष अवतरते. तिला पाहून अंबा तिच्या पाया पडते व तिच्याकडे वर मांगते कीं, ती कधीतरी पुरूष होईल व भिष्माचा वध करील. रुध्र तिला तसा वर देतो. त्यावर ती त्याला विचारते, ते कसे शक्य होईल? मी बाई असून पुरूषांशी युद्धात कशी जिंकेन? तरी मी मानते कीं ज्या अर्थी तुम्ही मला वर दिला आहे मी कोणत्या तरी प्रकारे त्याचा वध करणार हे मी समजले. तो वृषभदेव तिला बोलतो, "मी एकदा बोललो म्हजे तसे होणार. भिष्म तुला हातसुद्धा लावू शकणार नाही. तू त्याला मारणार हे निश्चित. तुला पौरुष्य प्राप्त होईल व त्या रुपात तू त्याला ठार मारशिल. त्या पुरूष अवतारात तू तुझ्या ह्या जन्माच्या सगळया गोष्टी स्मरू शकशिल. तुला नवीन शरीर मिळेल जे तुला त्याचा वध करण्यासाठी जरूरीचे असेल. तू द्रुपदाच्या घरात जन्म घेशिल. तू महारथ होशिल. तू युद्धकलेत निष्णात होशिल. तुझे भले होणार आहे, मुली तुझी कामना योग्य कारणासाठी आहे म्हणून तुला

माझे सहाय्य सदैव असेल. मी जे सगळे आता बलत आहे ते सगळे तसेंच होईल. तू जन्माने स्त्री असशिल परंतु, कांहीं काळानंतर तुझे रुप बदलून तू पुरूष होशिल. शंकराचा तो अवतार ज्याला कपर्दीन म्हणून ओळखतात, ज्याचे चिन्ह आहे वृषभ, तिच्या पुढून अंतर्धान पावतो. ते सगळे तेथील ऋषींच्या साक्षीने होत असते. तें ऐकल्यावर ती काशीनरेशाची कन्या मोठ्या निरधाराने वनातील लाकडे गोळा करते व त्यांची चिता बांधते. ते यमुना नदीच्या तीरावर होत असते. त्या चितेला ती अग्नी देते व त्यात शिरते. ती बोलते मोठ्याने कीं, "मी भिष्माचा नाश करण्यासाठी हे करत आहे".

अंबा उपाख्यान पर्व भाग एकशे नव्वदावा संपला.

# अंबा उपाख्यान पर्व

## भाग एकशे एक्याण्णवावा

दुर्योधन भिष्माला विचारतो, "अहो आजोबा, मला सांगा प्रथम मुलगी जन्मल्यावर मुलगा कशी होतो"? तो शूरवीर योद्धा सुद्धा कसा होतो.

भिष्म सागतात, द्रुपदाच्या ज्येष्ठ पत्नीला संतान नसते. त्या काळात राजा द्रुपद शंकराची मोठी भक्ती करत असें अपत्य वाहावे म्हणून. त्याच वेळी तो माझ्या नाशाचासुद्धा विचार करत असतो. त्यासाठी तो मोठे व्रत करत असतो. त्या कारणांने तो महादेवाला करुणा मागत असें कीं त्याला अपत्य व्हावे. ते अपत्य मुलगा असावा, ते मुलगी नसावे. देवाला ते विनंती करत असतो कीं, भिष्माचा पराभव करणारा पुत्र मला दे. तसे व्रत करत तो राजधानात असतो त्याच्या. त्याला महादेव प्रसन्न होतात व सांगतात तुला एक मुलगी होईल जी मुलगा होईल व तुझी इच्छा पूर्ण करील. द्रुपद त्याच्या पत्नाला सांंगतो महादेवाचा कौल काय आहे. त्यांना प्रथम मुलगी होईल व नंतर ती मुलगा होईल. ते ऐकून राणीला आश्र्चर्य वाटते. राजावराणीला सांगतो कीं, त्याने पुन्हा पुन्हा तशी विनंती केली की मला पक्त मुलगा हवा पण शंकर त्याला तेंच सांगत राहिले कीं, त्यांना प्रथम मुलगी होईल नंतर ती मुलगा होईल. यथावकाश प्रिशताच्या मोठ्या राणीला दिवस रहातात. भाग्यात जे दिले आहे तेंच होते त्याप्रमाणे तिला एक कन्या रत्न प्राप्त होते. मला ते नारदाने सांगितले. अरे कुरु वंशाच्या गंगापुत्रा तुझा मारेकरी जन्मत आहे द्रुपदाच्या वाड्यामध्ये. द्रुपद त्याच्या बायकोचे सगळे डोहाळे पुरवतो मोठ्या प्रेमांने. यथावकाश राणी एक सुंदर कन्यारत्न जन्माला घालते. कन्या झाले हे न समजल्यामुळें राणी पुत्र झाला असें समजून आनंदात राजाला सांगते कीं, त्यांना हवा असलेला पुत्र जनमला आहे. त्याप्रमाणे राजा शंकराचे आदेशानुसार त्या कन्येसाठी मुलाचे संस्कार करतो. ते असे केले जाते की ती मुलगी नसून खरोखरच मुलगा आहे. ती मुलगी आहे हे कोणालाही सांगितले जात नाही. ते एक गुपीत असते. राजाचा त्याच्या दैवतावर पूर्ण विश्र्वास होता व त्या प्रमाणे तो ते करत होता. ती मुलगाच आहे असे समजूनच सगळे व्यवहार त्या बालकाबाबतचे केले जात होते. त्या बालकाचे नांवसुद्धा शिखंडी असें ठेवले गेले. परंतु, मी फक्त जाणत हतो कीं ते मुल स्त्री आहे. बाकी कणाला ते माहीतक नव्हते. माझे हेर मला सगळी माहीती पुरवत होते. मला समजले कीं ती साध्वी अंबा, माझा मृत्यू जन्मला आहे.

अंबा उपाख्यान पर्व भाग एकशे एक्याण्णवावा संपला.

# अंबा उपाख्यान पर्व

## भाग एकशे ब्याण्णवावा

भिष्म सांगत असतो, द्रुपदाने फार काळजी पूर्वक सगळी व्यवस्था केली होती. तिला मुलांसारखे पेहेराव, शिक्षण दिले जात होते. तिला शस्त्रविद्या शिकवली जाते. ती द्रोणांची शिष्या होते. त्याशिवाय मुलींच्या कला जसे चित्र काढणे, रंगवणे सुद्धा शिकवले जात होते. त्यानंतर राणी द्रुपदाला सांगते कीं, आता आपला मुलगा मोठा झाला आहे तेव्हां त्याच्यासाठी उपवर कन्या शोधावी. द्रुपद राणीला सांगतो कीं, शीवाने दिलेल्या शब्दाप्रमाणे त्याने सगळे केले आहे आता तिच्यात केव्हां लिंगभेद होतो ते पहावयाचे आहे. त्यावर राणी त्याला बोलते, आपण सांगता ते खरेच असणार, त्रिनेत्र जे सांगतात ते खरे होते, त्या नंतर ती राजाला सांगते कीं, त्याने तिचे ऐकावे व नंतर जे त्याला योग्य वाटेल ते करावे. त्या विवाहाची व्यवस्था चोख करावी. देवांचे म्हणणे खरे होणार असेल तर जे व्हावयाचे ते त्यावेळी होईल. मला असा विश्वास वाटतो. त्यानंतर राजा व राणीने निश्चय केला, त्याप्रमाणे शिखंडीचा विवाह योजला गेला. ते दशरणाच्या मुलीशी तो विवाह ठरवतात. दशर्णाच्या राजाचे नांव होते हिरण्यवर्मन. तो त्याची मुलगी शिखंडीला देतो. तो एक अतिशक्तिमान राजा होता. तो कोणाच्याने ही जिंकला जाणारा नव्हता. त्याच्याकडे मोठे सैन्य होते. विवाह ठरल्यानंतर कांही वर्षानी हिरण्यवर्मनाची मुलगी वयात येते त्याप्रमाणे शिखंडीसुद्धा मोठा झालेला असतो. शिखंडी त्याच्या बाल वयात विवाह झाल्यानंतर तो कंपिल्यला येतो. तेथे हिरण्यवर्मनच्या मुलीला समजते कीं, शिखंडी तिच्यासारखी एक मुलगी आहे. ते ती तिच्या दास्याना सांगते. ते ऐकल्यावर हिरण्यवर्मनाला फार दुःख होते. तो पांचालनरेशाला बोलावतो. ते समजल्यावर दशर्णाच्या राजाला राग येतो. तो द्रौपदाला निरोप धाडतो व बोलावतो. मामला अजून गुप्त ठेवलेला असतो. त्यांची फसवणूक तुमच्या कडून झाली आहे हे त्यांना सहन होत नाही असें पांचालच्या राजाला तो सांगतो. तो द्रुपदाला लिहीतो कीं, तुम्ही आमचा अपमान केला आहे अशारितीने आपल्या मुलीचा विवाह माझ्या मुलीशी करवून. ते कांहीं शहाणपणाचे कृत्य नव्हते. त्या अपमानाचा मी बदला घेण्यासाठी तुझ्यावर चाल करून येणार आहे. तुम्हा सगळयांचा मी नाश करणार आहे.

अंहा उपाख्यान पर्व भाग एकशे ब्याण्णवावा संपला.

# अंबा उपाख्यान पर्व

## भाग एकशे त्र्यांण्णवावा

भिष्म पुढे सांगतात, ते समजल्यावर द्रुपदाला काय करावे ते समजत नाही. तो समजावणाचे लिहीतो परंतु, द्रुपदाची ती मुलगीच आहे मुलगा नाही असे सिद्ध होण्याची पाळी आलेली असते. राजा हिरण्यवर्मन त्याच्या मित्र राजांना निरोप धाडतो व त्याची झालेली फसवणून त्यांना सांगतो व त्याबद्दल काय करावयाचे त्याबद्दल सल्ला विचारतो. त्यानंतर मोठे सैन्य घेऊन तो द्रुपदाच्या राज्याकडे निघतो. असा गुन्हा केल्याबद्दल ते ठरवतात कीं, ते पांचाल देशात जाऊन द्रुपदाला खेचून काढतील व त्याच्या जागी दुसरा राजा नेमून द्रुपद आणि शिखंडीना ठार मारतील. त्याप्रमाणे ते निघतात. ते द्रुपदाच्या इतर नातेवाईकांना झालेला प्रकार सांगतात. अशा परिस्थितीत राजा द्रुपद स्वतः अंभ्रमावस्थेत असतो. त्याला कळत नाही काय करावे. त्याला येणाऱ्या आपत्तीची कल्पना त्याचे दूत देतात. तो घाबरून जातो. तो त्याच्या राणीला ते सांगतो. तो तिला सांगतो, माझा भाऊ हिरण्यवर्मन मोठे सैन्य घेऊन आपल्यावर चाल करून येत आहे. आपण मूर्ख ठरलो आहोत. देवांना आपला शब्द राखला नाही ह्याबद्दगल ते दोघे त्यांच्या दैवाला दोष देत असतात. तुझा मुलगा कन्या आहे असे ते सांगत आहेत. ते येऊन मला ठार मारण्याचे बोलत आहेत. त्यांना वाटते कीं, मी त्यांची फसवणूक केली आहे. ह्या मुलामुळे मी मोठ्या संकटात पडलो आहे. मला सांग काय करावे. आपल्यामुळें राजा दशर्णाची घोर फसवणूक झाला आहे. आता आपण काय करावयाचे ते ठरवावे लागेल. त्याला सगळे माहीत असून तो असा बहाणा करतो कीं, त्याच्या राणींने ती फसवणूक केली आहे, अशारितीने दोष राणीवर टाकून तो स्वताची सोडवणूक करण्याचे ठरवतो. ती मुलगी असून माझ्या राणीने तो मुलगा असल्याची बतावणी केल्यामुळे असे झाले असें सांगून तो स्वताची सुटका करणार असतो, दोष राणीवर गेल्यानंतर तो कारवाई पासून मुक्त होईल व राणीवर कारवाई होत नाही, असा युक्तिवाद करावयाचे ठरते. त्यावर त्याची राणी त्याला बोलते.

अंबा उपाख्यान पर्व भाग एकशे त्र्यांण्णवावा संपला.

## अंबा उपाख्यान पर्व

## भाग एकशे चौऱ्याण्णवावा

भिष्म सांगतो, द्रुपदाची ज्येष्ठ राणी सांगते कीं, तिने राजाला चुकीची माहीती दिली कारण तिला तिच्या इतर राण्यावर प्रभाव पाडावयाचा होता कीं, तिला मुलगा झाला आहे व म्हणून ती तसे खोटे सांगत आली, त्यात राजाचा कांहीं दोष नाही. तसे सांगून तिला तिची राणीवसातील जागा सुरक्षित करावययाची होती. मला मुलगी झाली तरी मुलगा झाला असें सांगत आले आतापर्यंत असे राणी स्पष्टीकरण देते. ते खरे मानून आपण त्याचा विवाह दशर्नाच्या मुलीशी लावला. त्यात राजा द्रुपदाचा कांहीं दोष नाही. दुसरे ती सांगते कीं, महादेवाच्या आशिर्वादाचा विचार करून केव्हातरी कांहीं घडेल व तिचा तो होईल अशी अपेक्षा त्यांच्या मनात होती. त्या देवावरील विश्वासामुळें आम्ही स्वस्थ बसलो होतो. ते स्पष्टीकरण राणीने दिल्यावर राजा यज्ञसेन थोडा शांत होतो कारण ती सगळी स्पष्टीकरणं पटण्यासारखी होती. त्यानंतर राजा द्रुपद त्याच्या मंत्र्यांना बोलावून राज्याच्या संरक्षणासाठी आवश्यक त्या सुचना देतो. द्रुपदाची नगरी सुरक्षित होती पण येणाऱ्या आक्रमणाच्या दृष्टीने तो ती आणखीन सुरक्षित करण्याच्या सुचना संबधित अधिकाऱ्यांना देतो. ते होत असतांना राजा व राणी ज्यांना वस्तुस्थिती माहित होती दोघे फार दुःखी होतात. त्याला त्याच्या भावाबरोबर युद्ध नको होते. त्यानंतर तो महादेवाची आराधना करू लागतो. देवाला त्याच्या दुव्याचा विसर पडला काय असें त्याला वाटू लागते. परंतु, तसे कधी होत नाही. तो सगळया पितरांना अर्घ्य देतो व विनंती करतो की त्यांनी त्याला मदत करावा. त्याच प्रमाणे महादेवाची करूणा भाकू लागतात दोघे पतीपत्नी. ब्राह्मणांना प्रार्थना करण्यास सांगतात, त्याना दानं केली जातात. जे कांहीं शक्य आहे ते सगळे होत असते. शिखंडीमुले राज्यावर आपत्ती येत आहे त्याचे त्यांना फार वाईट वाटत असते. शिखंडीचा सासरा दसार्णाला शांत करण्यासाठी सर्व प्रकारचे प्रयास होत असतात. देवाच्या कृपेने ह्यातून आपली सुटका होईल असा विश्वास ते बाळगत असतात. तरी माणसाचे प्रयत्न सुद्धा महत्वाचे असतात. मानवी प्रयत्न आणि दैवी हात अशा दोनाने सगळी काम यशस्वी होत असतात. त्या तत्त्वानुसार ते प्रयत्न करत असतात. शिखंडी फारच अस्वस्थ असते ती एका वनात जाते व तपस्या करण्याचे ठरवते. तेथे एक एकांतात घर असते त्या घरात ती शिरते. तेथे एक बलाढ्य यक्ष रहात असतो त्याचे नांव असते स्थुनकर्ण. त्याला भिऊन कोणी त्या घराकडे फिरकत नसे. शिखंडीला वाटत असते कीं आपण जीव द्यावा. त्याला शिखंडीच्या परिस्थितीची कल्पना त्याच्या अंतर्ज्ञानामुळें समजते. त्याला तिची दया येते. तो शिखंडीला मदत करण्याच्या उद्देशाने तिच्याशी बोलतो. ती त्याला सांगते कीं, तिचा काका हिरण्यवर्मन आक्रमण करून येत आहे जर ते दिसले कीं ती मुलगी आहे, मुलगा नाही, त्याच्या बरोबर शिखंडीचा सासरा दसार्ण सुद्धा येत आहे खरे खोटे करण्यासाठी त्याकरता ती लपत आहे, त्यानंतर स्थुनकर्ण समजतो कीं, थोड्या काळासाठी शिखंडी मुलगा आहे असें आढळले

तर त्याची सुटका होईल ते समजल्यावर तो शिखंडीला सांगतो कीं, तो त्याचे पौरूष्य त्या थोड्या काळासाठी शिखंडीला देण्यास तयार आहे. ती विचारते ते कसे शक्य आहे, त्यावर तो सांगतो तो कुबेराचा सेवक आहे, तो कांहींही करू शकतो. त्या प्रमाणे ते दोघे मायावी सिद्धीच्या मदतीने एकमेकांची लिंग बदलून घेतात. त्यामुळे आता शिखंडी पुरूष झाला व यक्ष स्त्री झाला होता. असे ठरते कीं, जोवर ते दोन राजे हिरण्यवर्मन आणि दसार्ण द्रुपदाच्या घरी वास्तव्य करून असतील तोवर शिखंडी पुरूष राहिल व त्या नंतर म्हणजे ते गेल्यावर तो पुन्हा स्त्री होईल व यक्ष पुरूष. त्यामुळें शिखंडी त्या यक्षाचे फार आभार मानतो व परत घरी निघतो.

अंबा उपाख्यान पर्व भाग एकशे चैऱ्याण्णवावा संपला.

# अंबा उपाख्यान पर्व

## भाग एकशे पंच्यांण्णवावा

भिष्म पुढे सांगत असतात, त्या गुह्यकाला (यक्षाला) सगळी परिस्थिती समजते. महादेवाची कृपा होणार परंतु, ते दैवी लिला आहे असें तो समजतो व थोड्या काळासाठी बाईपण स्वीकारतो. त्याला ताकीद देतो कीं, ते गेल्यावर शिखंडी परत त्या घरात येईल व त्याचे स्त्रीत्व घेईल आणि यक्षाला त्याचे पुरूषपण परत मिळेल. तो करार ठरतो व शिखंडी मोठ्या आनंदाने त्याच्या घरी जातो. यक्षाचे पुरूषपण मिळाल्यामुळे शिखंडी मोठा शक्तीमान पुरूष बनलेला असतो. राजा दसार्ण परत गेल्यावर तो त्याचे पौरुष्य यक्षाला परत करणार असतो.

भिष्म पुढे सांगत असतो, पुरूषपण मिळाल्याने आनंदात शिखंडी पांचाल नगरीत येतो. तेथे पित्याला भेटतो व आपण कसे पुरूष झालो ते सांगतो. ते झालेले पाहून राजा फार खूष होतो. तात्पुरती अडचण गेली आणि राज्यावरील संकट ठळले त्याचे त्याला समाधान होते. पण ते तात्पुरते होते म्हणून राजाला चिंता खातच रहाते. तेथे राजा दसार्णाला आमंत्रण मिळते राज्यात येण्यासाठी त्याते स्वागत होते. ते शिखंडीच्या हातूनच केले जाते. त्याला खात्री करावयाची असते म्हणून कांहीं कसबीणी त्याच्याकडे पाठवल्या जातात. थोड्याच वेळांत त्या संतुष्ट झाल्यासारख्या येऊन सांगू लागल्या. त्या बोलतात, असा समर्थ पुरूष त्यांनी कधी पाहिलेला नाही. ते पाहिल्यावर राजा दसार्ण आणि हिरण्यवर्मन दोघे फार खजिल होतात. त्यांना वाईट वाटते कीं, ते द्रुपदावर अशा प्रकारचा हीन आरोप घेऊन आलो. ते द्रुपदाची व शिखंडीची आणि राणीची माफी मागतात. ते ऐकल्यावर राजा दसार्ण शिखंडीचा माफी मागतो व कांहीं दिवस तेथे पाहुणचार घेत रहातो. तो त्याच्या मुलीला दोष देतो. ती मुलगी मात्र आश्र्चर्य करत असते, कीं, हे कसे झाले. जातांना राजा दसार्ण शिखंडीला भरपूर भेठी देतो. ते सगळे मोठ्या आनंदात होत असतांना त्या यक्षाच्या घरात वेगळेच नाटक होऊ घातलेले होते, सगळा दैवाचा खेळ पहा दुर्योधना कसा असतो.

त्या सुमारास यक्ष त्याच्या घरात बाई बनून रहात होता. तेव्हा एके दिवशी त्यांचा राजा कुबेर ज्याला माणसे खांद्यावरून नेतात म्हणजे माणसे त्याचे वाहन असतात, ते त्या घराकडे येतो पृथ्वीची फेरी करण्यासाठी तो आकाशातून उतरलेला असतो. त्या घराचा रुबाब न्यारा असतो. त्या घरावर उत्तम तोरणं लावलेली होती. सुगंध सर्वत्र पसरलेला होता. त्या घरावर सुंदर कमानी असतात. पताका लावलेल्या असतात अशाप्रकारे स्थानुकर्णाचे गर फार सुशोभित असें होते. त्यात मेजांवर स्वादिष्ट पेये व खाद्य पदार्थ ठेवलेले होते. त्याच्या सभोवतीचे बगीचे सुंदर फुलांनी बहरलेले होते. विविध रत्न आणि माणकांनी त्याच्या भिंती सजवलेल्या होत्या. यक्षाचे ते घर पाहून कुबेर त्याच्या बरोबर असलेल्या यक्षांना बोलतो, "स्थुनकर्णाचा इमला फारच सुंदर आहे.

परंतु, तो माझे स्वागत करण्यासाठी बाहेर कां येत नाही"? मला आलेला पाहून जर तो माझे स्वागर करणार नसेल तर त्याला शिक्षा केली पाहिजे. ते ऐकून यक्ष कुबेराला सांगतो द्रुपदाला एक कन्या झाली तिचे नांव शिखंडी, त्या मुलीला कांहीं काळासाठी स्थानुकर्माने त्याचे पौरुष्य दिले आहे व तो त्यामुळे बाई झाला आहे व म्हणून कदाचित तो शरमेने तुम्हाला भेटावयाला येण्यास घाबरत असेल. कुबेर ते ऐकल्यावर त्याचा रथ थांबवतो. त्या स्थुनाला माझ्या समोर आणा. त्याला मी शिक्षा करणार आहे. असें तो धनदेव पुन्हा पुन्हा बोलतो. ते ऐकल्यावर स्थानुकर्ण घराच्या बाहेर येतो व कुबेरापुढे उभा रहातो. त्याला पाहून कुबेर त्याला रागांने बोलतो, अरे गुह्यका, तुझे हे स्त्रीरुप कायम राहो. आता पर्यंत कोणी गुह्यकांने असें बेशरमीचे काम केलेले नाही. ते तू केले आहेस. म्हणून तू ह्यापुढे त्या बाईच्या रुपातच रहाशिल व तो शिखंडा कायम पुरूष राहील. ते बोलल्या नंतर वैश्रावणाला स्थानुची दया येते. स्थानु विनंती करतो कीं मी केवळ दयेपोटी त्या मुलीच्या घरच्या लोकांना संकटातून वाचवण्याच्या चांगल्या उद्देशाने हे केले होते त्यात आपला उपमर्द करण्याचा अजिबात विचार नव्हता. म्हणून आपण आपल्या शापातून थोडी मुभा द्यावी. वैश्रावण ते ऐकल्यावर सगळया तेथे जमलेल्या यक्षांच्या समक्ष सांगतो, "ठिक आहे, शिखंडी मेल्यावर तुझे पौरुष्य तुला मिळेल". असे सांगून तो यक्षांचा राजा त्याला अभय देतो. त्यानंतर तो स्थानु कडून पुजा करून घेतल्यावर त्याच्या ठिकाणी वेगांने जातो. स्थानु त्यानवंतर तेथेच रहातो. कांहीं काळानंतर जसे त्याचे सासरे दसार्ण आणि हिरण्यवर्मन जातात शिखंडी स्थानुकडे जातो. स्थानुला सांगतो कीं, मी आलो आहे, आपण ठरल्याप्रमाणे लिंग फरक करून घेऊ. स्थानु त्याला सांगतो कीं, त्याला आनंद झाला कीं, शिखंडी दिलेल्या शब्दाप्रमाणे परत आला आहे. स्थानु त्याला त्याच्या जाण्यानंतर जे घडले ते कुबेराचे प्रकरण सांगतो. तो सांगतो कीं, त्या शापामुळें स्थानु आता कायम बाईच्या रुपात रहाणार आहे जोवर शिखंडी जीवंत आहे, तसा शाप आहे, तो अनिवार्य आहे. पुढे स्थानु सांगतो आता तू कायमच पुरूष झाला आहेस तेव्हां तुझ्या लोकांत खुषाल तसा रहा. शिखंडीला पौरुष्य देण्याची बुद्धी स्थानुला होणे व पुलस्त्याच्या मुलांने तसा शाप देणे हे सगळे विधीलिखीत होते व म्हणून तसे झाले, अरे दुर्योधना. भिष्म सांगतात.

भिष्म पुढे सांगतात, शिखंडी मोठ्या आनंदाने त्याच्या घरी जातो व जे झाले ते सांगतो. तो विविध फुलांनी, फुलांनी, पांचाल मधील ब्राह्मणांना, देवांना, देवतांना, रस्त्याच्या वळणांना पुजतो, दानं करतो. सगळे पांचालचे लोक फार आनंदात जातात. त्यानंतर शिखंडीला द्रुपद द्रोणांकडे शस्त्रविद्या शिकण्यासाठी पाठवतो. तो तुमच्या बरोबर सगळी शस्त्रविद्या शिकून घेतो. त्याच्या सह धृष्टद्युम्न सुद्धा तेथेंच शिकतो. ते सगळे माझ्या समक्ष होत आले आहे. माझे हेर मला सगळी बातमी देत होते म्हणून मी हे सगळे तुला सांगू शकतो. द्रोणांने शिखंडीला एक रथ तयार केले. द्रुपदाची मुलगी जी आधीच्या जन्मी अंबा होती ती महादेवाच्या कृपेने एका विलक्षण प्रकारे पुरूष झाली असली तरी मी शिखंडीला बाईच समजतो कारण त्याचे जे पौरुष्य आहे ते त्याचे

नाही. ते स्थानचे आहे. आत अंबाच आहे हे मी कधी विसरू शकणार नाही. म्हणून जर शिखंडी धनुष्य बाण घेऊन माझ्यावर वार करण्यासाठी आला तर मी त्याला प्रतिवार करून विरोध करणार नाही. कारण मी बायकांशी लढत नाही हे माझे ब्रीद आहे. म्हणून अरे दुर्योधना मी शिखंडीशी लढणार नाही, तिच्या हल्ल्यापुढे नमते घेईन. त्यामुळें तो मला मारू शकतो हे लक्षात घे. मी त्याला मारणार नाही.

अंहा उपाख्यान पर्व भाग एकशे पंच्याणणवावा संपला.

# अंबा उपाख्यान पर्व

## भाग एकशे श्याण्णवावा

संजय धृतराष्ट्राला बोलतो, ती रात्र संपली व दिवस उगवला, तुमचा मुलगा त्याच्या सैन्याच्या समक्ष भिष्माचार्यांना विचारतो, "अहो गंगापुत्र, आपले सैन्य पंडुच्या मुलांच्या सैन्याशा लढण्यासाठी सज्ज आहे. त्यात अनेक घोडेस्वार, हत्तीस्वार, पायदळ, रथदळ असे आहेत. त्यांचे सामर्थ्य मोठे आहे. त्यात कित्येक रथ, महारथ, अतिरथ आहेत. त्या समोर भिम, अर्जुन आणि धृष्टद्युम्न ह्यांच्या अधिकारात त्यांचे अफाट सैन्य उभे आहे. दोन सेना सागरासारख्या सर्वदूर पसरलेल्या दिसत आहेत. त्यांचे एकत्रित सामर्थ्य मोजता येणारे नाही. देवांनी भ्यावे असें हे आहे. आपल्याला काय अंदाज आहे ही लढाई किती दिवस चालेल? तुम्हाला व द्रोणांना त्यांचा संहार करण्यासाठी किती दिवस लागतील? कृपाना किती दिवस लागतील? कर्णाला किती दिवस लागतील? तुम्ही सगळे दैवी आयुधानी सज्ज अहात, मला ते समजून घेण्याचे कुतूहल आहे. माझ्या सैन्यात आपण अहात तेव्हां ती माहीती मला तुम्ही सांगितली पाहिजे".

भिष्म सांगतात, "तू तुझ्या शत्रूंचे बळ व कमजोरी समजून घेऊ पहात आहेस कां? ते समजून घेणे तुला जरूरीचे आहे. ते मी सांगतो, ऐक, अरे राजा, माझी अंतिम युद्ध क्षमता विचारशिल तर पांडवांचे सैन्य मारण्यासाठी माझ्या सगळया शस्त्र, अस्त्र आणि आयुधांनिशी सकाऴ पासून संध्याकाळ पर्यंत जो लढण्याचा समय ठरला आहे, दिवसाला दहा हजार होईल. म्हणजे प्रतिदिनी दहाहजार माणसे मी मारू शकतो. त्या शिवाय एक हजार रथी मारू शकतो. तो माझी हत्त्येचा वाटा असेल ह्या युद्धात. म्हंटल तर ते आणखीन जास्त योद्धे मी मारू शकतो माझ्या खास आयुधांनी जे मी सहसा वापरत नाही. त्याप्रमाणे पाहिले तर एका महिन्यात पंडुची सगळी सेना मी एकटा मारू शकेन".

संजय पुढे धृतराष्ट्राला सांगत असतो, त्यानंतर दुर्योधन तोंच प्रश्न द्रोणाचार्यांना विचारतो. ते ऐकल्यावर द्रोण हसत बोलतात, मी आता वृद्ध झालो आहे. माझ्यात आता ती ताकद उरलेली नाही. तरी माझ्या शस्त्रांच्या ताकदीचे पाहिले तर मी भिष्मासारखेच मारू शकेन. जर सगळे व्यवस्थित झाले तर. साधारणपणे एक महिना लागेल तेवढे मारून टाकावयाला. त्यानंतर दुर्योधन कृपाचार्यांना तोंच प्रश्न विचारतो. ते सांगतात कीं त्याना दोन महिने निदान लागतील. अश्र्वत्थामा बोलतो त्याला दहा रात्री पुरेशा आहेत. कर्ण मात्र सांगतो कीं, तो सगळे पांडव त्यांच्या सगळया सैन्यासकट फक्त पांच दिवसात उरकेल!

कर्माची ती वल्गना ऐकतांच भिष्म मोठ्याने हसून लागतात. भिष्म त्याला वैतागून बोलतात, अरे तू सुताच्या पोरा, अजुन तू अर्जुनाला भिडलेला नाहीस. म्हणून वल्गना करत आहेस.

त्याच्या साथीला साक्षात कृष्ण आहे ह्याचा तू विचार करत नाहीस व कांहींही बोलतोस, दुर्योधनाला खूष करण्यासाठी.

अंबा उपाख्यान पर्व भाग एकशे श्याण्णवावा संपला.

# अंबा उपाख्यान पर्व

## भाग एकशे सत्त्याण्णवावा

वैशंपायन सांगत असतात, ते संभाषण युधिष्ठीराला समजते, त्या बरोबर तो त्याचे सगळे भाऊ बोलावतो. त्यांना तो बोलतो, "माझ्या हेरांनी असें संभाषण तेथे होत असलेले मला आताच सांगितले आहे. तो त्या सगळया प्रमुख योद्ध्याना विचारत आहे कीं, त्यांना आपली सगळी सेना ठार मारण्यासाठी किती समय लागेल तर त्यावर भिष्म सांगतात कीं एक महिना, द्रोणसुद्धा सांगतात एक महिना, कृप म्हणतात दोन महिने अश्वत्थाना बोलतो फक्त दहा दिवस आणि कर्ण बोलतो फक्त पांच दिवस! तेव्हां मलासुद्धा समजून घ्यावेसे वाटते कीं, आपल्याला त्यांची सेना खतम करण्यासाठी किती काळ लागेल"?

अर्जुना तुला किती वेळ लागेल कौरवांची सेना ठार करावयाला ते सांग. अर्जुन कृष्णाकडे पहात सांगतो कीं, भिष्म आणि द्रोण ह्यांच्याकडे जी आयुध आहेत त्यामुळें ते आपले सैन्य एका महिन्यात मारू शकतील कदाचित. तुझ्या समाधानासाठी सांगतो माझ्या शस्त्रं, अस्त्रं आणि आयुधांच्या जोरावर मी कांहीं क्षणात सगळी पृथ्वी नष्ट करू शकतो कार कृष्ण माझ्या बरोबर आहे. महादेवांनी मला जी आयुध दिली आहेत त्यांची क्षमता विलक्षण आहे. महादेव जे हत्त्यार युगाचा अंत करण्यासाठी वापरतो ते माझ्याकडे आहे हे लक्षात घे. ते शस्त्र भिष्माला माहीत नाही. द्रोणालासुद्धा ते माहीत नाही. त्यामुळें ते सुताच्या मुलाला कर्णाला ते माहीत असणे केवळ अशक्य आहे. परंतु, खऱ्या क्षत्रियाने सामान्य माणसे, बायका मुलं मारावयाची नसतात. युद्ध फक्त योद्ध्यांत झाली पाहिजेत असें निती शास्त्र सांगते. मी समोर उभे असलेले कौरवांचे लष्कर एका रात्रीत नष्ट करू शकेन. त्याशिवाय आपल्याकडे असे योद्धे आहेत जे भिष्माच्या बरोबरीचे आहेत त्याशिवाय ते जवान आहेत. त्यांत शिखंडी, युयुधन, धृष्टद्युम्न आहेत जे दैवी आयुधानी व मंत्रानी संरक्षित असल्यामुळे सहजासहजी मरणारे नाहीत. त्याशिवाय युधमन्यू, उत्तमौजसी, विराट, द्रुपद, शंख, हिडींबाचा मुलगा घटोत्कच, त्याचा मुलगा अंजनपर्वन, अभिमन्यू, द्रोपदीची पांच मुलं असें आहेत ज्यांना कोणीही सहजासहजी ठार मारी शकणार नाहीत. ते पूर्णतया संरक्षित आहेत. त्याशिवाय अरे राजा आपण पांडव कोणाच्यानेही मारले जाणार नाहीत, हे तुला माहित आहेच. आणि तू जर रागावून पाहिलेस तर तो जागच्याजागी भस्म होऊन जाईल अशी आपली तयारी आहे.

अंबा उपाख्यान पर्व भाग एकशे सत्त्याण्णवावा संपला.

# अंबा उपाख्यान पर्व

## भाग एकशे अठ्ठ्याण्णवावा

वैशंपायन पुढे सांगतात, दुसऱ्या दिवशी निरभ्र आकाश असतांना दुर्योधनाच्या बाजूचे सगळे राजे पांडवांशी लढण्यासाठी निघाले. त्या आधी ते स्नान करून दागिने घालून तयार झाले होते. ब्राह्मणांनी अग्नीची पुजा करून त्यात साजूक तुपाचे अर्घ्य दिले होते. ब्राह्मण वेदातील स्तुतीसुमनं गात त्यांना आशिर्वाद देत होते. ते सगळे चांगले सुशिक्षित होते, युद्ध कौशल्यात प्रवीण होते. त्यांना त्याच्या हितचिंतकांच्या शुभेच्छा होत्या. असे ते योद्धे लढण्यासाठी निघाले होते. एकमेकांचा धीर वाढवत ते निघाले होते. त्या सर्वांचा एकच उद्देश होता तो पांडवांना पराजित करण्याचा होता. त्यात पुढे होते विंद आणि अनुविंद दोघे अवंतीचे होते. केकया, वल्हीक, द्रोणाचार्यांच्या बरोबर होते. त्या मागून होता अश्र्वत्थामा. त्यानंतर भिष्म, जयद्रथ, त्यानंतर डोंगराळ प्रदेशातील राजे होते, त्या मागोमाग शकूनी व त्याचा मुलगा उलूक होते. त्या मागून पूर्व प्रदेशातील होते. त्यांचा मागून शक, किराट, तवन, शिवी, वस्त, त्यांचे महारथ, आपापल्या फौजांच्या मधून जात होते. त्या मागून कृतवर्मन, त्रिगर्त शेवटी होते. दुर्योधनाच्या भोवती त्याचे भाऊ त्याला संरक्षण देत होते. त्यानंतर साल, भुरिश्र्वर, सल्य, वृहद्रथ हे सगळे मागून येत होते. त्यांच्या अग्रणी दुर्योधन दिसत होता. ते चांगले सैनिकी वस्त्र, चिलखत आणि जिरोटोप घालून असे होते. सगळे हस्तिनापुर सैन्याच्या अवतारात संचलन करत कुरुक्षेत्री येत होते. त्यांच्या छावण्या कित्येक योजने पसरलेल्या होत्या. त्या बरोबर सैन्याला लागणारे इतर लोक जसे वैद्य, चांभार, व्यापारी, खाद्य पुरवणारे असें ज्यांना बाजारबुणगे म्हणतात ते सामील झाले होते. त्या बरोबर नाचणाऱ्या बायकासुद्धा सैनिकांच्या मनोरंजनासाठी त्यात फिरत होत्या. कौरवांना अशाप्रकारे सगळया सोयी सैनिकांसाठी तयार ठेवल्या होत्या.

अंबा उपाख्यान पर्व भाग एकशे अठ्ठ्याण्णवावा संपला.

# अंबा उपाख्यान पर्व

## भाग एकशे नव्याण्णवावा

वैशंपायन पुढे सांगतात, दुर्योधनाप्रमाणेच राजा युधिष्ठीर व त्याचे बंधू लढण्यासाठी त्यांच्या छावण्यांतून निघाले होते. त्यांच्या सैन्याचा सरसेनापती दृष्टद्युम्न प्रमुख म्हणून पुढून चालला होता. त्यांच्या बरोबर छेड्डी, कासीस, करुश, त्यांचा प्रमुख धृष्टकेतू, त्या मागे विराट, द्रुपद, युयुधन, शिखंडी, हे पांचालांचे होते. त्यात युधमन्यू, उत्तमौजस, होते. ते योद्धे सूर्यासारखे चमकत होते. त्यांच्या जेवणाची उत्तम व्यवस्था केलेली होती. त्यांचा यजमान युधिष्ठीर त्या राजांचे अभिवादन करत त्यांना लढण्यासाठी उत्तेजन देत होता. त्यांच्या सैन्यात घोडदल, हत्तीदल, पायदल, रथदल असे सगळे होते. पांडवांपैकी अभिमन्यू, द्रौपदीची पांच मुलं, वृहंत दृष्टद्युम्नाच्या मागोमाग येत होते. त्यांचे रथ सजवलेले होते. त्यांच्या मागून भिम त्याच्या फौजे सह येत होता. त्यांच्या चालण्याचा आवाज आकाशापर्यंत जात होता. इतर सामुग्री घेऊन हत्ती त्यांच्या मागोमाग होते. त्याशिवाय बाजारबुणगे होते सैनिकांच्या गरजा पुरवण्यासाठी ते त्यांच्यात फिरत होते. योद्ध्यांच्या ओरडण्याचा आवाज गगनाला भिडत होता. सगळे सैनिक शिस्तीत संचलन करत होते. सगळ्यात शेवटी युधिष्ठीर व त्याच्या बरोबर राजा विराट आणि द्रुपद होते. दृष्टद्युम्नाच्या मार्गदर्शना खाली त्यांची सेना विशिष्ट रचनेत सज्ज रहात होते. आघाडीची फौज म्हणून द्रौपदीची पांच मुलं, अभिमन्यू, नकूल, सहदेव, प्रभाद्रक दहाहजार पायदळ, दहा हजार घोददळ, दोन हजार हत्तीदळ असे घेऊन कौरवांच्या सैन्याला घेरण्यासाठी सज्ज केले होते. त्यांच्या मागून भिम त्याचे दळ घेऊन तयार होता. चक्राकार रचना केली होती त्याच्या मध्ये विराट जयत्सेन, युधमन्यू, उत्तमौज, पांचालाचे दोन होते. मधल्या भागात अर्जुन वासुदेवा सह होते. ते सगळे लढण्यासाठी उत्सुक होते. त्यांच्या मध्ये घोडदळ होती. हत्तीदळ होती. रथदळ युद्धा होती. त्यांच्यात पायदळ होती. ते तलवारी, ढाली, भाले घेऊन तयार होते. कांहींच्या कडे धनुष्य बाण होते. त्यांचे भाते भरलेले होते व त्यांना जास्त बाण पुरवण्याची व्यवस्था गाड्याने केली होती. युधिष्ठीराच्या बरबर अनेक राजे होते लढण्यासाठी तयार. त्यांच्या मदतीसाठी अनेक हत्ती, घोडे इतर शस्त्र साठा ठेवलेला होता. त्याचे काम पायदळातील सैनिक करत होते. राजाचेकीतन, धृष्टकेतू, सत्यकी आणि वृश्नींचे बरेच योद्धे होते. त्यांच्या दिमतीला अनेक गाड्या सामुग्री घेऊन जात होत्या, त्यांच्या बरोबर क्षेत्राहन आणि क्षेत्रदेव त्यांच्या रथातून येत होते. त्यांच्या फौजांसाठी अनेक घोडे, हत्ती होते. सैनिकांना लागणाऱ्या गोष्टी पुरवणारी फिरती दुकानं त्यात होती. युधिष्ठीर सावकाश चालला होता, त्याच्या बरोबर जरूरीचे सामान घेऊन गरीब लोक येत होते. त्यांच्या बरोबर महायोद्धा सौचित्ती, श्रीनेमत, वसुदेव, विभू काशीचा राजा वीस हजार रथ, दहालक्ष घोडेस्वार होते. ते सगळे सुंदर रीत्या सजवलेले होते. विस हजार हत्ती ज्यांच्या गंडस्थळातून मध वहात आहे ते होते. एकेक हत्ती डोंगरासारखा प्रचंड होता. अशाप्रकारे कुंतीच्या मुलांची फौज कुरुक्षेत्री

लढण्यासाठी जात होती. त्यांच्या बरोबर लोक जे सैनिक नाहीत ते सुद्धा निघाले होते. ते सगळे ओरडून सैन्याला उत्तेजन देत होते. त्यांचा उत्साह उतू जात होता. ते पांडवांसाठी लढणार होते. ढोलकी, ताशे, तुताऱ्या, शंख अशी वाद्ये वावली जात होती.

दोनही बाजूच्या फौजा कुरुक्षेत्राकडे जात होत्या.

अबा उपाख्यान पर्व भाग एकशे नव्याण्णवावा संपला.

# -उद्योग पर्व संपले –

## भाषांतरकाराचा परिचय -

मी अशोक कोठारे, माझ्या वयाची ७६ वर्षे झाली आहेत. गेली कित्येक वर्षे मी विविध प्राचीन ग्रथांचा एक कुतुहल म्हणून अभ्यास करत असतो. त्या काळात मला समजले कीं, आपल्या प्राचीन शिक्षण पद्धतीत चार ग्रंथांचे महत्व होते. त्यात मनुस्मृती, महाभारत, रामायण आणि योगवासिष्ठ हे महत्वाचे होते. आपल्या पूर्वीच्या शिक्षण पद्धतीत ह्या ग्रंथांचे वाचन करण्याची प्रथा होती. नंतरच्या काळात इंग्रजांनी त्यांची शिक्षण पद्धती येथे रुजवली व आपली पाठशाळा पद्धती संपुष्टात आली. आपल्या शिक्षण पद्धतीत अक्षर ओळख, नितीशास्त्र, गणित एवढेच शिकवले जात. त्याशिवाय शिकतांना घोकंपट्टी करण्याचे महत्व होते. ते सगळे आता इतिहास जमा झालेले असले तरी त्याची उपयुक्तता नाकारता येणार नाही. म्हणून एक प्रयत्न मी करावयाचे ठरवले. मी एक अतिसामान्य अभ्यासक आहे तरी व्यासंग मोठा आहे. त्या प्रमाणे, मनुस्मृती प्रथम ई-साहित्यच्या माध्यामाने तुम्हाला दिली. त्याचे चांगले स्वागत झाले आहे. त्यामुळें माझा उत्साह वाढला आणि महाभारताचे, 'जसे आहे तसे', अशाप्रकारचे भाषांतर आता देत आहे. त्याचे साधारणपणे ४० खंड होणार आहेत. संपूर्ण महाभारत येण्यास बराच अवधी लागणार आहे. इतर मंडळी महाभारताचे भाषांतर करतांना त्याचा आकार आटोपशीर करण्यासाठी त्यातील शिकवणूकीचा भाग व्यर्थ समजून सोडून केवळ कथाभागाचेच भाषांतर करतात त्यामुळे एक शैक्षणिक पुस्तक म्हणून असें भाषांतर रहात नाही. मी सगळया नितीशास्त्र शिकवणाऱ्या कथा जशाच्या तशा ठेवल्या आहेत. कांहीं जागी विषय समजणे सोपे व्हावे म्हणून मी टीपा दिल्या आहेत कांही कंसात दिल्या आहेत, कारण मला माहित आहे किं, ह्याचे वाचन करणारे मराठी भाषिक सामान्य आहेत. कोणी विद्वान वाचक असेल तर त्याला त्या टीपांची गरज वाटणार नाही.

आता थोडे माझ्याबद्दल लिहीत आहे. तसे पाहता अशा कामात कोणी संस्कृतचा प्राध्यापक असला पाहिजे असें कोणाला वाटेल मग मी एक इंजिनीअर कां हे काम करत आहे असा प्रश्न पडेल पण त्याचे उत्तर असें आहे किं, एवढे मोठे काम करण्यास कोणी तयार होत नाही आणि ते सुद्धा फुकट करणारा विद्वान मला मिळाला नाही. ज्या कोणाला मी त्याचे महत्व सांगितले ते सगळे त्या कामासाठी भरपूर मानधन मागू लागले मग मी ठरवले आपणच ते करावे. गेली २५ वर्षें मी निवृत्त

जीवन जगत आहे, बराच समय माझ्याकडे आहे मग आपणच हे करावे अशा विचारांने ते करावयास घेतले व प्रथम मनुस्मृती दिली आता महाभारत देण्याचा प्रयत्न चालू आहे. त्यासाठी दैवयोगांने ई-साहित्य सारख्या ध्येयवादी मंडळींची साथ मिळाल्यामुळें माझा उत्साह द्विगुणित झाला.

१९८५ पर्यंत मी माझा उद्योग करत होतो. कारखाना भाईंदरला व रहाणार चेंबूरला त्यामुळें येण्याजाण्याची दगदग माझ्या प्रकृतीला झेपली नाही व मी हृदयाच्या झटक्याने आजारी झालो. त्यानंतर डॉक्टराच्या सल्ल्याने मी सगळे उद्योग बंद करून घरात बसलो. थोडी बचत केली होती त्याच्या जोरावर आज मी माझे साधे जीवन जगत आहे. पैशापाठी लागण्याचा स्वभाव माझा मुळातच नाही. सुरुवातीपासून वाचनाचा छंद होता त्यात कथा कादंबऱ्या वाचण्यात रस नव्हता. मी कांहीं माहिती देणारे ग्रंथच वाचत असें. त्यामुळें अनेक विषयांचा व्यासंग झाला त्यात ही चार पुस्तक पुढच्या पिढीस विशेष उपयुक्त ठरतील असे मला जाणवू लागले तेव्हा त्यांची भाषांतरे करण्याचे ठरवले. त्या व्यतिरीक्त माझे लिखाण शेती विषयांत बरेच आहे. कॉंटिनेंटलचे कै. रत्नाकर कुलकर्णी ह्यांनी आग्रहपूर्वक माझ्या कडून 'सेंद्रिय खत निर्मिती उद्योग', नांवाचे पुस्तक लिहून घेतले, मराठीतील हे पहिले खतविषयक पुस्तक आहे. त्याच्या चार आवृत्या झाल्या आहेत. बळिराजा मासिकाचे संपादक भोसले ह्यांच्या आग्रहामुळें त्यांच्या मासिकांत मी १९९२ ते २००५ पर्यंत शेतकऱ्यांना शेतीचे पद्धतशीर शिक्षण एका लेखमालेच्या द्वारा दिले आहे. त्यात ६५ लेख लिहीले. त्या शिवाय संपादक भोसल्यांच्या आग्रहामुळें निसर्गशेतीचे तंत्र शिकवणारा एक अभ्यासक्रम, 'व्यावहारिक निसर्गशेती अभ्यासक्रम' तयार करून तो स्वखर्चांने शेतकऱ्यांसाठी १९९४ साली उपलब्ध केला. त्यामुळें आपल्या महाराष्ट्रात निसर्गशेतीचा प्रचार झाला. आता ह्या उतारवयात जेव्हां शरीर साथ देण्यात कुचराई करू लागले आहे, माझे सगळे लक्ष आपल्या हिंदू मान्यतांचा मराठी माणसाला परिचय करण्यावर आहे. त्यासाठी महाभारत, रामायण व योगवासिष्ठ ह्यांचे 'जसे आहे तसें' अनुवाद करण्यावर भर आहे. माझे ज्योतिष शास्त्राचे ज्ञान चांगले आहे. त्याप्रमाणे जर गोष्टी होणार असतील तर मी २०२० नंतर नसेन. त्यासाठी हे सगळे उपक्रम लवकरात लवकर उरकण्याचा मानस आहे.

आता कोणाला प्रश्न पडेल कीं, हा इंजिनियरींगचा माणूस शेतीवर कसें लिहीतो? त्या बद्दल थोडे लिहीतो. माझ्या कारखान्यात बहुतेक कामगार उरण, अलिबाग, वसईचे होते. शिक्षण बेताचे पण एकादे अवजार कसें वापरावयाचे ते शिकवले किं, ते त्यात लवकरच निष्णात होत होते. त्या मुलांना मी विचारले किं, ते एवढे हुशार असूनही शेती कां करत नाहीत? त्यांचे एकच उत्तर असें, मालक शेतीत भागत नाही. मग मी ठरवलें शेतीशास्त्राचा अभ्यास करावयाचा. अभ्यासाचाच छंद असल्यामुळें तो सुरु झाला. त्यात मला लवकरच समजले कीं, शेतीचा संबंध बॉटनी पेक्षा मायक्रोबायॉलॉजीशी जास्त आहे. मग मी त्या विषयाचा अभ्यास करून त्यात लवकरच पारंगत झालो. त्या अभ्यासाप्रमाणे मी कांहीं तंत्र विकसित केले व ते अजमावण्यास सुरुवात केली. त्यात अपेक्षेप्रमाणे परिणाम मिळू लागले त्याप्रमाणे एक शेतीतंत्र विकसित होत गेले. माझ्या कामगाराच्या शेतावर माझे प्रयोग होत होते, त्यात माझा पैसा लागत होता व त्यांचे कुटूंबिय काम करत होते. त्यावेळी मी चांगला तरुण होतो व उत्साहसुद्धा होता. माझ्या तंत्राने शेती उत्तम होते हे मी समजलो व ते सगळे तेथेच संपले. ते सगळे १९८२ ते १९८५ अशा सालात झाले होते. मीसुद्धा ते सगळे विसरून गेलो. परंतु, १९९२ साली मोठा दुष्काळ पडला होता महाराष्ट्रात त्यावेळी मी एक दृष्य टीव्हीवर पाहिले, त्यात एक ग्रामीण महिला एका खोल विहीरीत उतरून वाटीने पाणी काढून बालदीत भरत होती. त्यावेळी मला रहावले नाही व विचार केला, माझ्या ज्ञानाचा जर उपयोग होणार नसेल तर काय कामाचे ते ज्ञान. मी एक लेख लिहीला व दैनिक नवशक्तिला पाठवला. तो लेख त्यांनी प्रसिद्ध केला नाही. मग मी तो लेख बळीराजा मासिकात पाठवला. त्यात तो छापून आला. तसे पहाता नवशक्तिनेसुद्धा तो प्रसिद्ध केला. त्यानंतर बळिराजाच्या वाचकांची प्रश्न विचारणा सुरु झाली व मी माझे शेतीचे ज्ञान त्यांना त्या मासिकात लेख लिहून देऊ लागलो. अशारितीने माझे शेतीत लिखाण भरपूर झाले. त्याबद्दल आधी लिहीले आहे.

आता थोडे माझ्या ब्लॉगपोस्ट बद्दल लिहीतो. हिंदूस्तानात २००८ साली इंटरनेटवर ब्लॉग सुरु झाले व मी त्यात माझे ब्लॉग सुरु केले. माझ्या ख्रिस्ती धर्माबद्दलच्या वादग्रस्त परंतु शास्त्रशुद्ध विवेचनामुळें पहिले ब्लॉग बंद झाले. माझे पूर्वी पांच ब्लॉग होते. त्यात मी अभ्यासांने जे संशोधन

करून शोधून काढत असें, ते लिहीतो. त्यात अनेक विषयावरील माझे संशोधित साहित्य प्रसिद्ध करत असतो. त्यात ब्राह्मण धर्म, जैन धर्म, ख्रिस्ती धर्म, इस्लाम, अर्थ, न्याय, नितीशास्त्र, राजकारण अशा विषयांवर बरेच लिहीत असतो. ते तुम्ही वाचू शकता. एकच ब्लॉग मराठी आहे बाकीचे इंग्रजीत आहेत. सिलीकॉन मधील ब्लॉग इस्लाम बद्दलच्या माझ्या संशोधनाचे शास्त्रशुद्ध लिखाण आल्यानंतर बंद झाला आहे. गुगलवरील ब्लॉग मात्र जोरात चालू आहेत. माझे अशा विषयावरील विचार नाकारता येणार नाहीत असें सत्याला धरून असल्यामुळे जेव्हां मला कोणी विरोध करतो तेव्हां त्यांना मी नम्रपणे सांगतो, कृपया माझ्यावर अब्रुनुकसानीचा दावा करावा, ते झाले किं, ते लोक गप्प होतात. कारण, जर ते तसा दावा करतात तर त्यात तेंच हरण्याचा संभव जास्त असतो. एवढेच नाही तर त्यांच्या खोटेपणाचा जाहिर बभ्रा होईल ते त्यांना परवडण्यासारखे नसते. मी प्रचारकी थाटाचे लिखाण करत नाही. जे समजते ते विज्ञानाच्या आधाराने सिद्ध करूनच लिहीतो, आजच्या काळात असें लिखाण बऱ्याच गटांना आवडत नाही. बऱ्याच लोकांचे खूनसुद्धा झाले आहेत हे आपण जाणताच, म्हणून मी शक्यतर माझ्याबद्दल कांहीं लिहू इच्छित नाही. सत्यापेक्षा सोइस्करचा आज जमाना आहे. माझे जीवनातील अनुभव लिहीले तर ते एक वाचनीय पुस्तक होईल पण त्यात सर्व वादग्रस्त विषय पुढे येतील. मी मांडलेला कोणताही मुद्दा आजवर कोणालाही खोटा ठरवता आलेला नाही. जाता जाता, जैन धर्माबद्दलचा वाद सांगतो एक उदाहरण म्हणून, १९०२ मध्यें सर जगदीशचंद्र बोस ह्यांनी वैज्ञानिक पुरावे देऊन जे सिद्धांत मांडले त्याचा पुरावा देऊन मी लिहीले कीं, हल्ली जो जैन धर्म प्रचारात आहे तो तीन हजार वर्षापूर्वीच्या अडाणीपणावर आधारित आहे, त्यातील सगळेंच विचार अज्ञानाधारीत म्हणून खोटे आहेत. एवढेच नाही तर व्यवहारिक जीवनात तो धर्म पाळणे केवळ अशक्य आहे. त्यामुळें जैन उखडले पण सुदैवाने ते खूनखराबा करणारे नसल्यामुळें वाचलो.

शेवटी माझ्या तब्यती बद्दल लिहीतो. मुळातच माझी प्रकृती तोळामासा असते त्यात २०१० साली बेस्टच्या बसने मला ५० फूट लांब फेकल्यामुळें पुरता जायबंद झालो होतो. मेंदूला आघात झाल्यामुळें माझी स्मरणशक्ती गेली होती. दोन बरगड्या तुटल्या होत्या. माझे शौंच व मुत्र ह्यांवर नियंत्रण राहिले नव्हते. दीड वर्ष तसेंच गेले. त्यावेळी माझे वय ६८ होते. केवळ दैव बलवत्तर

म्हणून आज मी पूर्ववत झालो आहे तरी कोठल्याही वाहनाने प्रवास करण्यास परवानगी नाही. म्हणून मी कोठेही जात नाही. गेलेली स्मृति पुनः आली व आता सगळे बरे चालले आहे. त्या काळातील अनुभव विशेषकरून माझ्या ज्ञान साधनेचे, मोठे रोचक आहेत. तूर्तास एवढे पुरे.

ई-साहित्यच्या पदाधिकार्यांच्या आग्रहामुळें ही माझ्याबद्दली खरी माहिती सविस्तरपणे दिली आहे. जर शक्य असेल तर त्यातील मजकुरात बदल न करता तो प्रसिद्धीस घ्यावा.


अशोक कोठारे,

२३- २ -२०१८

ashokkothare@gmail.com ,

ashokkothare@yahoo.co.in

## ई साहित्य प्रतिष्ठान -

मराठी भाषा आता झेप घेण्याच्या मूड मध्ये आहे. रडणाऱ्याकडे लक्ष नका देऊ. मराठीत कधीच नव्हते इतके वाचक आहेत आता. पुर्वी पुस्तकाच्या एका आवृत्तीच्या हजार न हजार प्रती छापल्या जात. पांच हजार म्हणजे डोक्यावरून पाणी! आता ई पुस्तकांच्या जमान्यात एक एक पुस्तक पाच लाख वाचकांपर्यत जात आहेत. वर्षाला अर्धा कोटी डाऊनलोड होतात. वाचक एकमेकांना परस्पर ऑर्डर करतात. व्हट्स अप, ई मेल, ऍप्प, ब्ल्यु टुथ, वेबसाईट, पेन्ड्राईव्ह, सिडी अशा असंख्य मार्गांनी पुस्तकं व्हायरल व्हायला लागली आहेत. सुसाट सुटल मराठीचं वारु. खेड्यापाड्यांच्या गल्लीबोळांपासून ते जगाच्या पाठीवरील प्रत्येक देशात. रॉकेटच्या वेगांने सुसाट सुटलेल्या मराठीच्या गाडीला आता कोणी थांबवू शकत नाही. या धूमधडक क्रांतीत साहभागी व्हा. आपल्या ओळखीच्या मराठी साक्षरांना यात ओढा. त्यांचे ई मेल पत्ते, व्हाट्सप नंबर आम्हाला पाठवा. तुम्ही कितीही वाचक आणा. ते शंभर आणतील आणि ते हजार आणतील. तुमच्या व्हाट्सप ग्रुपमधून याची जाहिरात करा. आपल्याला कुठली पुस्तकं वाचकांपर्यंत पोहोचवायची आहेत ते आपल्याला टिव्ही, पेपरची जाहिरात परवडत नाही. आमचे वाचक हेच आमचे जाहिरात एजंट. तेच आमची ताकद. मराठी भाषेची ताकद जगाला दाखवून  देऊ.

ई साहित्यची पुस्तके www.esahity.com वरून डाऊनलोड करा.

esahity@gmail.com ला कळवून ई-मेलने मांगवा. किंवा 7710980841 हा नंबर सेव्ह करून ठेवा, या नंबरला तुमचे नांवाने Whatsapp करून पुस्तके whatsapp मार्गे मिळवा.

लिंक ई साहित्यचे app.https://play.google.com/store/apps/details?id=com.
esahity.www.esahitybooks ह्या लिंकवर उपलब्ध आहेत. ते download करा. हे सर्व मोफत आहेत.

धन्यवाद